# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २४/०२/२००९**

आज मंगळवार दि. २४/०२/२००९ रोजी दि. २१/०२/२००९ रोजीची मिरा भाईंदर महानगरपालिकेची तहकुब झालेली मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १६ दि. ०६/०२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ५) | चंद्रकांत सिताराम वैती | विरोधी पक्षनेता |
| ४) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १२) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १६) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २२) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २३) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २४) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २६) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २९) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३०) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३१) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३२) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३३) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३४) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३६) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३७) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३८) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३९) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४०) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४१) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४२) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४४) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४५) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४६) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४७) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ४८) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ४९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५०) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५१) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५२) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५३) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५४) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५५) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५६) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५७) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५८) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ५९) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६०) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६१) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६२) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६३) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६४) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६५) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ४) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ५) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ६) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ७) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ८) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ९) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| १०) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ११) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| १२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| १३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १४) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| १४) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| १५) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| १६) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज – निरंक</u>**

**नगरसचिव :-**

दि. २१/०२/२००९ ची तहकुब सभा आज सुरू होत आहे. पान क्र. २ पासून सुरूवात होत आहे.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, श्री. परब यांची आवश्यकता नाही का?

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, ठराव मांडायचा आहे. (दिनांक २३ फेब्रुवारी २००९ हा भारताच्या दृष्टीने ऐतिहासिक दिवस ठरला असून मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवरील स्लमडॉग मिलेनिअम या चित्रपट सर्वात्कृष्ठ चित्रपटासह तब्बल आठ ऑक्सर पुरस्कार पटकावले आहेत) दि. २३ फेब्रुवारी २००९ हा भारताच्या दृष्टीने ऐतिहासिक दिवस ठरला असून मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवरील स्लमडॉग मिलिनियर्स ह्या चित्रपटास सर्वोत्कृष्ट चित्रपटासह तब्बल आठ पुरस्कार पटकावले आहेत. त्यापैकी दोन पुरस्कार या चित्रपटाचे संगितकार ए.आर. रहमान यांना मिळाले आहेत. स्लमडॉग मिलिनिअर्सला मिळालेल्या आठ पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन, सर्वोत्कृष्ट गीतरचना, सर्वोत्कृष्ट संगित, सर्वोत्कृष्ट साउंड मिक्सींग, सर्वोत्कृष्ट संकलन, सर्वोत्कृष्ट पटकथा या साठीच्या पुरस्काराचा समावेश आहे. या चित्रपटात छोटा जमालची भूमिका साकारणारा आठ वर्षाचा बालकलाकार कु. आयुष खेडेकर हा मिरा भाईंदरचा रहिवासी असून तो जेसलपार्क मध्ये लक्ष्मीनाराण इमारतीत राहतो. करोडो भारतीयांच्या स्वप्नांची पूर्ती स्लमडॉगने केली आहे. या देशाचे तसेच या शहराचे नाव उज्वल केल्याबद्दल मी मिरा भाईंदरच्या सर्व नागरीकांतर्फे, सभागृहातर्फे तसेच माझ्या बीजेपी पक्षातर्फे गीतकार गुलजार, संगीतकार ए.आर. रहमान, रसुल पुकुट्टी तसेच या चित्रपटातील बाल कलाकार कु. आयुष खेडेकर यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. कु. आयुष खेडेकर यांचा महानगरपालिकेतर्फे यथोचीत जाहिर सत्कार करुन त्यांना रु. १ लाख इतकी रक्कम देउन त्यांचा सन्मान करण्यात यावा.

**प्रशांत पालांडे:-**

मा. महापौर साहेब, त्या स्लमडॉगच्या पिक्चरमध्येच मधुर मित्तल नावाचा आणखीन एक सहकलाकार होता. म्हणजे जो हिरो होता. त्याचा मोठा भाऊ. तो देखील गोल्डन नेस्टमध्ये राहायचा. त्याचा देखील या ठरावामध्ये सहभाग करून घ्यावा.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब त्या कलाकरांना आपण नेहमीप्रमाणेच सभागृहात बोलवून सन्मान करतो. ते कलाकार आल्यानंतर सभागृहात बोलवून त्यांचा सन्मान करावा आणि जेव्हा महापालिकेचा जाहीर मोठा कार्यक्रम असेल तेव्हा देखील त्यांना त्या जाहीर व्यासपीठावर बोलवून सन्मान करावा व आपल्या महापालिकेच्या वतीने त्या कलाकाराला बक्षिस म्हणून एक लाख रूपये पुढील शिक्षणासाठी द्यावे अशी सुचना मी या ठिकाणी मांडतो.

**मा. महापौर :-**

सध्या ते ऑस्करला गेलेले आहेत. तरी त्यांच्या पालकांना आपण आज बोलावलेले आहे. त्यांना साडे अकराची वेळ दिलेली. ते येतील

**अभिनंदन ठराव क्र. ९३ :-**

दि. २३ फेब्रुवारी २००९ हा भारताच्या दृष्टीने ऐतिहासिक दिवस ठरला असून मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवरील स्लमडॉग मिलिनियर्स ह्या चित्रपटास सर्वोत्कृष्ट चित्रपटासह तब्बल आठ पुरस्कार पटकावले आहेत. त्यापैकी दोन पुरस्कार या चित्रपटाचे संगितकार ए.आर. रहमान यांना मिळाले आहेत. स्लमडॉग मिलिनिअर्सला मिळालेल्या आठ पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन, सर्वोत्कृष्ट गीतरचना, सर्वोत्कृष्ट संगित, सर्वोत्कृष्ट साउंड मिक्सींग, सर्वोत्कृष्ट संकलन, सर्वोत्कृष्ट पटकथा या साठीच्या पुरस्काराचा समावेश आहे. या चित्रपटात छोटा जमालची भूमिका साकारणारा आठ वर्षाचा बालकलाकार कु. आयुष खेडेकर हा मिरा भाईंदरचा रहिवासी असून तो जेसलपार्क मध्ये लक्ष्मीनाराण इमारतीत राहतो. करोडो भारतीयांच्या स्वप्नांची पूर्ती स्लमडॉगने केली आहे. या देशाचे तसेच या शहराचे नाव उज्वल केल्याबद्दल मी मिरा भाईंदरच्या सर्व नागरीकांतर्फे, सभागृहातर्फे तसेच माझ्या बीजेपी पक्षातर्फे गीतकार गुलजार, संगीतकार ए.आर. रहमान, रसुल पुकुट्टी तसेच या चित्रपटातील बाल कलाकार कु. आयुष खेडेकर यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. कु. आयुष खेडेकर यांचा महानगरपालिकेतर्फे यथोचीत जाहिर सत्कार करुन त्यांना रु. १ लाख इतकी रक्कम देउन त्यांचा सन्मान करण्यात यावा.

**सुचक :- सौ. कल्पना महेश पाटील** **अनुमोदन :- सौ. सिसीलीया बावीघर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

पान क्र. ०२

**मा. महापौर :-**

तो विषय होता. एस्कॉर्ट किंवा टोल?

**भगवती शर्मा :-**

साहब, मेरी एक सुचना है की, उस दिन साहब ने भी बताया थी की, एस्कॉर्ट की वसुली करने के हम हकदार नही है। क्योंकी वहा पर हायवे के अंदर अपने पास कोई जगह नही है। उस दिन दुसरी बात हो रही थी की, हम एस्सेल वर्ल्ड के अंदर वह चीज करे। लेकिन कानून के दृष्टी से वह भी नही कर सकते। मेरा एक सुझाव है की, जैसे कोई खाजगी वाहतुक अपने यहा एन्ट्री करती है। उत्तन एस्सेल वर्ल्ड जानेवाले रस्ते पर जो एन्ट्री होती है। उसके उपर हम लोग टोल लगाए तो कुछ रेव्हेन्यु ......

**मा. महापौर :-**

वही तो बात चल रहा था। एस्सेल वर्ल्ड, उत्तन के बाहर मतलब जहा से बॉम्बे लिमीट शुरू होती है, वहा लगाने का।

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मार्गस्थ फीच्या ठिकाणी आपण इथे टोलचा उल्लेख करायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त(मु.) सो.,) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. मार्गस्थ दाखला अंमलबजावणीसाठी अडचणी येत असतील. समजा तो रद्द करत असाल. नियमात आहे पण करता येत नाही. म्हणून सभागृह रद्द करत आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याला ऑब्लीक करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

परंतु, टोल सहज लावता येत नाही. टोलचे उद्देश क्रिएट करावे लागते. आणि टोल कशासाठी वसुल करतो त्यावर मा. महासभेने काहीतरी विशेष निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी लागते. म्हणजे आपण एखादी मोठी योजना, शहरामध्ये विशेष काही करत असाल आणि त्याच्यातून उत्पन्नाचे साधन म्हणून त्याला टोल हा पर्याय आपण करत असाल तर तो वेगेळा विषय होऊ शकतो. मला एवढेच म्हणायचे आहे.

**जयंत पाटील :-**

रस्ते आपले आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

आपण टोल हा विशेष प्रबंधासाठीच घेऊ शकतो.

**जयंत पाटील :-**

मी टोलबद्दलच म्हणतो. तुम्हाला मार्गस्थ दाखला जो आहे, म्हणजे तुमची फी ती तुम्हाला घेता येणार नाही. कारण ते आपले रस्ते नाही. नॅशनल हायवे ऑथरेटीची परवानगी आपल्याकडे नाही. आहे का? एस्कॉर्टसाठी आपल्याकडे ती परवानगी मिळत नाही. कारण रस्तेच आपले नाहीत. रस्ते केंद्र सरकारचे आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

तो विषयच नाही. आपण तो रद्दच करतो.

**जयंत पाटील :-**

मी तेच तर म्हणतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

त्याच्या बदली जो टोल लावतात...

**जयंत पाटील :-**

तुम्ही टोल लावा. टोलचा निर्णय घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, जर मिरा भाईंदर रस्ता गोराई पर्यंत आपण डेव्हलप करतो. तो आपल्या अंडर आहे ना?

**जयंत पाटील :-**

आपल्याला टोल लावता येणार नाही का? प्रोजेक्ट म्हणजे आपण रस्तेच बनवतो. आपलेच आहेत. आणि आपल्या रस्स्तायवरूनच एस्सेल वर्ल्डला जातात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

साहेब विकासाचा एक विशेष प्रस्ताव पाहिजे आणि त्यावर महापालिका किती खर्च करते? आणि ते वसुल कसे करू शकतो? याचे एक धोरण व्हायला पाहिजे. आपण आत्ता उड्डाणपुल बांधला. असा काहीतरी महत्वाकांक्षी प्रोजेक्ट पाहिजे. ते आपण किती वर्षे रिकलेक्ट करू याचे एक धोरण पाहिजे.

**जयंत पाटील :-**

त्याचे काय नियम आहेत ते बघून घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

तो खुलासा जर शहर अभियंत्यांनी केला तर चांगले होईल.

**मा. महापौर :-**

ठराव करू या. नंतर गव्हर्नमेंटकडून मंजुरी घेऊन आपण ते करू.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, याची अमाऊन्ट किती ठेवायची? अडीज करोड ठेवायची?

**मा. महापौर :-**

एस्कॉर्टच्या जागेवर टोल.

**अनिल सावंत :-**

एस्कॉर्टचा प्रॉब्लेम काय आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण तिकडे अडीज करोड दिलेले आहेत.

**मा. महापौर :-**

जागेचा प्रॉब्लेम आहे.

**अनिल सावंत :-**

असे कोणी सांगितले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

शासनाचे धोरण निश्चित केल्यानंतर ....

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण हे अडीज करोड ठेवले तीच अमाऊन्ट ठेवायची की, त्याच्यामध्ये अमाऊन्ट बदली करायची? ॲज इट इज.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही हा जो टोल म्हणता तो लोकांना भुर्दंड आहे. जे एस्कॉर्ट आहे. त्याचे प्रोव्हीजन आहे. ज्या महानगरपालिकांमध्ये ऑक्ट्रॉय आहे. आणि त्यांच्या रिजनमध्ये इतर महानगरपालिकांचा माल येत असेल आणि त्याच्यावर ऑक्ट्रॉय लागू नसेल त्याला तो ऑक्ट्रॉय. म्हणजे महानगरपालिका हद्दीतील लोकांना तो भुर्दंड नाही. ज्यावेळी स्टॅंडींग कमिटी समोर हा विषय आला त्यावेळी एक्झीक्युटीव्ह ऑफीसर श्री. खतगांवकर साहेब होते आणि त्यांनी सांगितले....

**मा. महापौर :-**

श्री. अनिल सावंतजी, आपण जे बोलता ते सगळे बरोबर आहे. फक्त तेवढाच विषय आहे की, जो रस्ता आत्ता आयआरबी सिक्स लाईन करणार आहे. त्यानंतर आपल्याकडे तिकडे गाडी थांबवून पैसे वसुल करायला जागा कुठे आहे?

**अनिल सावंत :-**

त्याच्यासाठी जर ठेका पध्दतीने देता येत असेल तर आपण करू शकतो. तो नंतरचा लुकआऊट आहे. तुम्ही प्रोव्हीजन तर करून ठेवा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, ठेकेवाला आकाशात हेलिकॉप्टरने पैसे वसुल करणार काय? स्टॅंडींगने प्रोव्हीजन केलेली आहे ना? त्यांनी म्हटले आहे की, कॉन्ट्रॅक्टर करा. त्याला आऊटसोर्सींग करा. ते त्यांचे लुकआऊट आहे. तशीच्या तशी मंजुरी द्या. स्टॅंडींगच्या लोकांना कशाला नाराज करता? त्यांनी किती मॅरेथॉन मिटींग घेतल्या. त्यांना हॉनर करून तो विषय आहे तसा राहू दया. तो बदलू नका. आत्ता टोल लावू नका. एस्कॉर्ट राहू दया. ते म्हणतात की, होईल. आमचे मत आहे की, त्या कॉन्ट्रॅक्टरला हेलिकॉप्टर घ्यावे लागेल. कारण एवढ्या स्पीडने गाड्या जातील त्यामध्ये थांबवणार आहेत का? त्याला आपण हेलिकॉप्टरचापण खर्च देऊ. स्टॅंडींगने तो विषय घेतला आहे, त्याला विरोध कशाला करता?

**अनिल सावंत :-**

तो तसाच ठेवून द्या.

**मा. महापौर :-**

मग तुम्ही जे टोल बोलले ते रद्द करायचे?

**जयंत पाटील :-**

दोन करोड पन्नास लाख वसुल करण्याची जबाबदारी स्टॅंडींगने घ्यावी. तुमच्याकडे हायवेच्या ऑथोरीटीची त्याला परवानगीच मिळत नाही.

**मा. महापौर :-**

आत्ता ते सन्मा. सभागृहाने ठरवायचे आहे.

**जयंत पाटील :-**

ज्या गोष्टी होऊच शकत नाही. त्या त्यांनी जर मान्य केल्या असतील तर तुम्ही करा, हे माझे मत आहे. इटस् नॉट पॉसीबल. मागे गाड्या अंगावर घातल्या गेल्या. आणि आपल्याला जेवढे उत्पन्न आले नाही. त्याच्यापेक्षा जास्त आपण हॉस्पीटला खर्च केलेला. याचाही तुम्ही विचार केला नाही.

**मा. महापौर :-**

आत्ता शेवटी सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे की, आपण ते ठेवायचे आहे की, वगळायचे आहे. तो सभागृहाचा निर्णय आहे. स्टॅंडींगने आपल्याकडे पाठवलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठलेपण निर्णय घेताना पहिले ते व्हायेबल आहेत का हे बघितले बघितल्याशिवाय स्टॅंडींग करते कशी?

**जयंत पाटील :-**

शक्यता बघून घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेव्हा तुमचे एस्कॉर्ट बद्दल अनुभव चांगले नाहीत. तुम्ही ते प्रपोजच नाही करायचे. केले तर ते अडीच करोड.

**जयंत पाटील :-**

मला एक सांगा, मागे जेव्हा आपण ते चालू केले. तेव्हा उत्पन्न किती मिळाले?

**प्रफुल्ल पाटील :-**

तेहतीस हजार.

**जयंत पाटील :-**

आणि तुमचा खर्च किती झाला? आत्ता तिकडे सहा लाईन होत आहेत. सहा लाईन होत असताना तो आयआरबी वाला तुम्हाला करून देईल का?

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त प्रशासन किंवा शासनाकडून मंजूरी घेऊन तिथे टोल लावू शकतात का? प्रशासनाने क्लीअर करावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

नियमाप्रमाणे मार्गस्थ दाखला वसूल करायला शासनाची परवानगी लागत नाही. आपल्याला कायद्यामध्ये तरतुद आहे. मा. महासभेने त्याला मंजुरी दिलेली आहे. तिथे फक्त वर्किंग प्रॉब्लेम आहे. आपल्या मालकीची जागा नाही. मी मुद्दाम सांगतो आणि आपल्या मालकीची जागा नसल्यामुळे मा. महासभेने मान्यता देऊनसुध्दा गेल्यावर्षी आपण फक्त ३१ लाख आपल्या कर्मचाऱ्यांकडून वसुल केले. त्या कर्मचाऱ्याला त्रास झाला आणि सर्व नाक्यावर आपण वसूल करू शकलो नाही. ही बाब स्टॅंडींग कमिटीसमोर चर्चेला आली असता, स्टॅंडींग कमिटी आपले उत्पन्नाचे साधन आहे. यामध्ये ह्या अडचणी विचारात घेता आपण हे करू शकत नाही. तर मार्केटमध्ये हे वसूल करायला कोणी ठेकेदार उपलब्ध होईल का? आणि त्याने स्वतःची जागा स्वतः क्रिएट करावी. असे विचारात घेईन याला मान्यता दिली होती. आपण वसुल करावे हे अपेक्षित नाही. कारण तिथे प्रॅक्टीकल नाही.

**प्रकाश दुबोले :-**

शासनाचे धोरण आहे की, महापालिका सक्षम करायची. आपण जर प्रोसीजर होत असेल तर तुम्ही शासनाला मध्यस्थी करून आयआरबी ने जर नॅशनल हायवेला सांगितले.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

टेंडर काढून निविदा आल्या तर ते होऊ शकते. त्यांनी जागा उपलब्ध केली तर.

**मा. महापौर :-**

आयआरबी ने जरी परवानगी दिली तरी जागा लागणारच आहे.

**प्रकाश दुबोले :-**

रस्त्यावर तेवढी ॲडजेस्टमेंटकरता येईल. आयआरबी करू शकतो.

**मा. महापौर :-**

सिक्स लाईन झाल्यानंतर रस्ता कुठे अलाऊ करणार?

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, आपण परवा चर्चा करताना या विषयावर आपली अशी प्रकारे चर्चा चाललेली की, त्या रस्त्याची मालकी आपली नाही. तर आपल्या परिसरामध्ये आपल्याला कुठे करता येईल का? श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी सुचना केली होती की, एस्सेल वर्डच्या रस्त्याचा फार मोठा उपयोग होतो आणि तो आपल्या मालकीचा रस्ता आहे. त्या रस्त्याची डागदुरूस्ती आपण करत असतो, एकतर आपल्याला दोन जागा आहेत, नॅशनल हायवे नं. ०८ तिथून येणाऱ्या किंवा ठाण्याकडून येणाऱ्या. पण ह्या चेकनाक्याला एक टोल

आणि दुसरा डाक बंगल्याजवळचा टोल. त्याच्यापुढे त्या टोल व्यतिरिक्त हा टॅक्स भरायला कोणी तयार नाही का? आणि याच्यामध्ये आपल्याला शासन मान्यता देईल का? अशा प्रकारची चर्चा आपण केली होती की आपल्याकडे एखादा कॉन्ट्रॅक्टर अशी वसुली करायला तयार आहे का ? कारण आपण मागे जेव्हा पाच करोड रूपयांची तजवीज केली होती आणि उपकर लागला. उपकर लागणार म्हणून एस्कॉर्टच्या माध्यमातून वसुलीला सुरूवात केली. त्यावेळी आपल्याला यातून पाच करोड बावीस लाख पन्नास हजार रूपये अपेक्षित होते. आणि तेव्हा आपल्यामध्ये चार करोड सत्त्याहत्तर लाख त्रेपन्न हजार ही तफावत आपल्याला आली. आणि तेव्हा आपल्या हिस्साला ४४ लाखाची रक्कम आली होती. ४४.९७ हजार एवढी रक्कम आल्यानंतर त्यावेळेला आपण तीन पाळ्यांमध्ये महापालिकेचे कर्मचारी तिथे लावले. कर्मचाऱ्यांवर हल्ले झाले. कर्मचाऱ्यांना मारहाण झाली. अगदी हातपाय तोडेपर्यंत, जीव जाईपर्यंत प्रकार झाले होते. याची फीजीबीलिटी नाही. आणि तुम्ही जर हा आकडा ५ करोड २२ लाख ५० हजाराच्या ऐवजी आत्ता आपण तो अडीज करोड रूपये पकडला आहे. पण ह्याचा उपयोग फक्त हे बजेट फुगवण्यासाठी होणार आहे. आपल्याकडे प्रॅक्टीकली जेवढे पैसे येतात. तेवढे पैसे आपण घेतो. पण तुम्ही बजेट करताना आज मा. महासभा किती बजेटचा निर्णय घेते? मा. स्थायी समितीने ४५६ करोड रूपयांचा घेतलेला आहे. पण मग खर्चाची तजवीजपण प्रशासन तशीच करते. मग प्रशासन असलेले पैसे एक-दोन महिन्यात संपवून टाकते. आणि मग सांगते की, बजेटमधील तरतुद संपलेली आहे. मग हे काम तुम्ही कुठून करणार? तुम्ही इथे बजेट बनवले ते ब्लॅक-ॲन्ड व्हाईट झाले. खर्चाची तजवीज तेवढीच करून ठेवता. मग रिॲप्रोप्रिएशनच्या मागे लागता. म्हणजे असलेली कामे तशीच ठेवायची आणि करायचे. तर ते बजेट फुगविण्यासाठी जर हा आकडा असेल. इथे या सभागृहामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने विचार करणारी नगरसेवक मंडळी, अधिकारीही तेवढेच तज्ञ आहेत. तर तुम्हाला असे वाटत असेल की, याच्यात आपण नक्की एवढी रक्कम प्राप्त करू शकतो. अडीच करोड ऐवजी आपण एकच करोड प्राप्त करू शकतो. मग तो आकडा कमी करा पण ते येण्यासारखे असतील तर नाहीतर उगाच हे ठेवून तुम्ही कशाला बजेटची प्रोव्हीजन वाढवता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

साहेब, रद्द करू द्या. ते अनप्रॅक्टीकलच आहे. टेंडर काढून सुद्धा जर जागा उपलब्ध नाही झाली तर ते होणारच नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग प्रोव्हीजन ठेवा. आली नाही तर काढा. मग काय करणार? परत तुम्ही सांगणार की, आम्ही एक्सरसाईज केला नाही. कारण तुम्ही प्रोव्हीजन केली नाही. आपण एकच धेय्य ठरवले पाहिजे की, हे होउ शकत नाही. मग प्रोव्हीजन का? मग प्रोव्हीजन करायची तर अटेम्ट तरी करणार का?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपण मान्यता दिली तर १०० टक्के निविदा काढणार. आम्ही करणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

जशा त्या सहा पे ॲन्ड पार्कच्या निविदा काढल्या. दोन ठिकाणी चालू. चार ठिकाणी बंद. तसे आहे ना. आणि काय होईल माहिती आहे का? तो निविदा घेणारा माणूस आहे. त्याला आपण...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

त्याला आपणच राहणार आहे. जागा उपलब्ध झाली नाही तो वसुल करू शकणारच नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याला आपण निविदा मंजुर करून दिली नाही तरी निविदा भरल्यावरच तिकडे पैसे जमा करायला सुरूवात होईल. आपल्याकडे अशी पद्धत फार वाईट आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

ठिक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण जो टॅक्सेशनला विषय घेतला होता. तुम्ही.

**जयंत पाटील :-**

त्यापेक्षा टोल पत्करेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

टोल पत्कारेल. एस्सेल वर्ल्ड नाक्यावर टोल टाकला तर आपल्याला उत्तनकडे जाणाऱ्या गाड्यांना टोल भरावा लागणार नाही. तिथे तुम्ही टोल लावा.

**मा. महापौर :-**

मग ते वगळून टोल करू या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

टोल साठी शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

शासनाची मान्यता घ्या. शासनाने दिले नाही तर गोष्ट वेगळी आहे. आणि ते टॅक्सेशनचे जे आहे ते टॅक्सेशनचा विषय मगाशी तुमच्याशी बोलताना तुम्ही असे सांगितले की, चार करोड रूपये आपल्याला २००८-०९ चे येणे आहे. आणि तुम्ही नवीन वर्षात सहा करोड सांगितलेले आहे. तर सहा करोड न घेता नवीन वर्षात दहा करोड घ्या. कारण मागची सगळी प्रकरणे आत्ता काढायला लावलेली आहेत. ज्यांना सी.सी. दिलेले आहेत. बऱ्याचशा नवीन मोठ्या प्रोजेक्टचे बाकी आहे. आणि टॅक्सवाले बोलतात की, आम्ही तुम्हाला ०९-१० चे टार्गेट दहा करोड तुम्हाला देउ.

**मा. महापौर :-**

मग दहाच आहे ना? दहा प्लस चार करायचे? चौदा कोटी? ठिक आहे. पेज क्र. ०१ वर मोकळ्या जागेवर कर १४ कोटी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही मोकळ्या जागेवर टॅक्स आकारणी दहा नाही, चौदा नाही, वीस करा. पण शेवटी ह्या टॅक्सचे तुम्ही जर नगररचनाला सोपवले. कारण विकासकर्ता घेतो आहे. ही जबाबदारी त्यांना दिली तर व्यवस्थित होईल. उद्या तुम्ही सर्व टॅक्सेशनवर टाकणार असाल तर तुम्हाला वसुल होणार नाही. हे पण नक्की करा. विकासकर्ता वसुल करतो. जो प्लान पास करतो. त्याच्यावर ही जाबाबदारी द्या. मग नक्की चौदा कोटी वसुल होणार आहेत. पण जर तुम्ही परत ते टॅक्स डिपार्टमेंटवर टाकले तर एक रूपया वसुल होणार नाही. कारण कुठेही त्यांचे को - ऑर्डीनेशन नाही.

**मा. महापौर :-**

या विषयावर सन्मा. सभागृहाला एक विनंती आहे की, हे बजेट मंजुर झाल्यानंतर जी उत्पन्नाची बाब आहे. त्यासाठी कुठल्या प्रकारे कोणी करावे यासाठी पदाधिकारी आणि गटनेत्यांची बैठक लावून आपसात आपण ते ठरवू. माझे म्हणणे आहे की, प्रत्येक नगरसेवकाने ती भावना व्यक्त केली तर खुप टाईम जाईल. त्यावर प्रत्येक पक्षाचे गटनेता आणि पदाधिकाऱ्यांनी बसुन आपण त्यावर निर्णय करू की, हे कुठल्या प्रकारे वसुल करायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, दहा कोटींचे चौदा कोटी केले. संबंधित अधिकाऱ्यांचे पण जरा ऐकून घ्या. फक्त आपण आकडे वाढवले म्हणून होणार नाही. ज्या डिपार्टमेंटशी संबंधित आहे. त्याच्याकडे याबाबतची किती माहिती आहे? आत्ता मा. आयुक्त साहेबांनी किती दिलेले आहे? फक्त आपणच सर्व ठरवायचे असेल तर ज्या गोष्टी आपण ठरवायच्या त्या बाबतीमध्ये कोणी बोलत नाही. आज महापालिकेचा एनओसी द्यायचा विषय आहे. आत्ता तो विषय पुढे येणार आहे. त्याबाबत चार वर्षे झाली या मा. महासभेमध्ये काय निर्णय झाला? तुम्ही प्रत्येकवेळी बजेटमध्ये वाढवत चालले. आत्ता दहा कोटी दिलेले आहेत. चालू वर्षामध्ये काय निर्णय झाला तो तुम्ही मला सांगा. मग फक्त चौदा कोटी हा निर्णय पण तुम्हाला आत्ता टेन्टीटीव्ह नक्की करावा लागेल. की, नगररचनाकडे ही जबाबदारी देउ. यासाठी व्यवस्थित प्रोसिजर आणू. फक्त तुम्ही आकडे लिहिणार. ते आकडे किती दिवस चालणार आत्ता एन.ओ.सी. चे फक्त ३३ लाख रूपये वसुल झाले. १ टक्के पण नाही. तुम्हाला फक्त आकडेच लिहायचे आहेत का?

**मा. महापौर :-**

आपण अजुन ती कर आकारणी केली नव्हती. नगररचना ने पुर्ण माहिती दिली नव्हती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

का केली नाही?

**मा. महापौर :-**

हे काम तुम्हाला टॅक्स डिपार्टमेंटकडेच द्यायला...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टॅक्स आकारणी का केली नाही? एक बाजु, अरूंद बांधकाम आहे म्हणून केली नाही? एक बाजु, त्याच्याकडे सातबारा नाही म्हणून केली नाही? एका बाजुला व्यापाऱ्याला जास्त रेट आहे म्हणून नाही? हे को ऑर्डीनेशन नाही. लिगल इलिगल ठरवण्याचे काम कोणाचे आहे?

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी ज्यावेळी एखाद्या मोकळ्या जागेवर कर आकारणी झालीच नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग मोकळ्या जागेवर मा. आयुक्तांनी दहा करोड ठेवले आहेत. तोच आमचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी चारच ठेवले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तिकडे तेच ठेवा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**अनिल सावंत :-**

ठिक आहे काय? चार, दहा की चौदा?

**मा. महापौर :-**

दहाच ठेवू. चौदा आले तर चांगले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही जर टार्गेट दिले नाही. तर टाउन प्लानिंग डिपार्टमेंट आत्तापर्यंत टारगटपणा करते ते सोडून देतील. हे बदमाश लोक एका छोट्या छोट्या माणसाला पन्नास वेळा चकरा मारायला लावतात. आणि ह्यांचे दलाल संध्याकाळी बरोबर, तुम्हाला किती प्रकरणे दाखवू. मा. महापौर साहेब, डी.सी. रूलमध्ये सरळसरळ अशा प्रकारची तरतुद केली आहे की, ज्या बिल्डींगचे टेरेस गळतात. त्या बिल्डींगच्या टेरेसना ताबडतोब एन.ओ.सी. द्या. त्यांचे फॉरमेट डी.सी. रूलमध्ये फायनल आहे. फक्त हजार रूपये फी आहे. हे गेले की, जन्मदाखल्यापासुन त्याची माहिती मागवतात. बिल्डरच्या जन्म कधी झाला? तो पाकीस्तानमध्ये गेला होता की नाही? त्याने लढाईला गेला होता की नाही? काय तुम्हाला १७६० भानगडी? ज्याच्याशी लग्न करायचे आहे त्याच्याशीच बोला ना. सतराशे साठ नकटेपणाची नाटके करायची तुम्हाला गरज काय? अशा पद्धतीने टाउन प्लानिंग डिपार्टमेंटला काम चालते. म्युनिसिपाल्टीच्या विरोधात कोर्टात जायला लावतात. चांगले धंदे लावतात. त्यांच्या ऑफिसमध्येच जाउन बसतात. साहेब सहानंतर बघा त्यांच्या ऑफिसमध्ये कोण असतात. सर्वसाधारण नगरसेवक गेला की, तुम्ही हे असे एक सर्टीफिकेट घेउन या. तुझ्या जन्माच्या अगोदर इथे बिल्डींगची कामे चालू आहेत. तेव्हा ग्रामपंचायत होती. ग्रामपंचायतीच्या काळात तुम्ही म्युनिसिपाल्टीची सी.सी. मागणार आहात? त्यांच्यानंतर त्यांना कसलीच गरज पडली नाही. आज जिथे जिथे टेरेस रिपेअरींग आहे, लिकेज आहे. तिथे ग्रामपंचायत काळातील बिल्डींग आहेत. त्यांना तुम्ही सांगतात की, आत्ता त्यांचे सी.सी. आणा. ओ.सी. आणा. तुम्हाला कशी मिळणार? वन विंडो क्लीअरन्सने या पालिकेत एकपण काम होणार नाही. होत नाही. खाली लोकांचा जाहिरनामा लावला आहे, तो खरे म्हणजे जाळून टाकायला पाहिजे. त्याला आग लावायला पाहिजे. तो जाहिरनामा आग लावण्याच्याच कामाचा आहे. त्याचा पंचनामा करा की, या जाहिरनाम्याप्रमाणे कामे झाली नाहीत आणि त्या पंचनाम्यावर स्वाक्षरी करून त्याला आग लावा. कसली कामे? जेव्हा आम्ही प्रामाणिकपणे हा ठराव केला की, अनधिकृत बांधकामे, ज्यांनी परमिशन घेतले आहे, जास्तीचे बांधकाम केले आहे. त्या प्रस्तावाची माहिती पाठवत नव्हते. त्यासाठी दोनदा मी स्वतः आयुक्त साहेबांना भेटलो की, मा. आयुक्त साहेब, तुमचे टाउन प्लानिंग डिपार्टमेंट काही करत नाही, माहिती पाठवत नाही. शेवटी त्यांनी लेखी ऑर्डर काढली. तरी या लोकांनी दोन महिने पाठवले नाही. पुन्हा एकदा गेलो. त्याच्यानंतर आत्ता ती माहिती पाठवली. ती पण त्रोटक पाठवली. यांना तुम्ही इतका स्टाफ दिलेला आहे. हा स्टाफ काय करतो? एका स्टाफचे त्या दिवशी श्री. वैती साहेबांनी मस्त सांगितले. एक स्टाफ पहिल्यांदा काय केले तर तो शासकिय कामासाठी इलेक्शनला गेला. नंतर आला तर सेस करला गेला. सेस संपला तर ऑक्ट्रॉयवर गेला. ऑक्ट्रॉयवरून आता तर त्याला काही काम नाही तर मेडीकलवर गेला. असे ४०-४० इंजिनिअर हि पालिका दोन इंजिनिअरवर सुद्धा चांगल्या पद्धतीने चाललेली आहे. ४०-४० इंजिनिअर एका एका डिपार्टमेंटला आहेत. कशाला आहेत? फक्त यांची वसुली करायला आहेत. सर्वसामान्य माणसाचे एकपण काम होत नाही. यांना दहा कोटीचे नाही, पंधरा कोटीचे टार्गेट द्या. तेव्हा ते लोक काम करतील. जेव्हा टॅक्स डिपार्टमेंटरचे लोक काम करायला तयार आहेत. मग ह्यांना काय आहे? यांना फक्त माहितीच द्यायची आहे ना? तुम्ही कशाला कमी करता?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही दहा कोटीचे चार करोडवर लगेच बोलायला तयार झालात. श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी जी सुचना मांडली त्यात चुकीचे काय आहे? तुम्ही टॅकसवर देउ नका तुम्ही नगररचना विभागालाच त्याची जबाबदारी द्या. कसे वसुल होणार नाहीत? कुठलीच गोष्ट वसुलीला दिली नाही. कुठच्याही गोष्टीचे टार्गेट दिले नाही तर ते टार्गेट होणार नाही. आत्ता फक्त खर्चाची बाजु चालू होउ द्या. मग बघा आम्हाला एवढेच करा, तेवढेच करा म्हणून बोलायला सगळे बरोबर उभे राहतील. वसुली करतांना त्यांना बोलता येत नाही की, आम्ही एवढी वसुली करू. आमच्याने एवढे होणार आहे. श्री. प्रफुल्ल पाटील साहेब चुकीचे बोलत नाहीत.

**मा. महापौर :-**

हे काम दोन्ही डिपार्टमेंटला करावे लागेल. एका डिपार्टमेंटला हे काम होउ शकत नाही.

**शरद पाटील :-**

सगळी कामे दोन्ही डिपार्टमेंटनेच करावी लागतात. पण आपले दोन्ही डिपार्टमेंटचे सांगतात कुठच्या ठिकाणी आहे का? एक लहान भावाला विचारत नाही. तर मोठा भाउ बोलतो की, आम्ही कशाला पाया पडायला जायचे, अशी परिस्थिती या महापालिकेत चाललेली आहे.

**मा. महापौर :-**

काय करायला पाहिजे ते तुम्ही सांगा.

**शरद पाटील :-**

काय करायचे? एक एकाला होत नसेल तर सस्पेंड करा.

**मा. महापौर :-**

आपण सांगता की, कर आकारणी टाउन प्लानिंगने करायची.

**शरद पाटील :-**

होय.

**मा. महापौर :-**

ते प्रॅक्टीकल आहे?

**शरद पाटील :-**

प्रॅक्टीकल आहे म्हणजे काय?

**मा. महापौर :-**

कारण ती कर आकारणी केल्यानंतर परत त्याचा हाउस टॅक्स आकारायचा आहे. ती बिल्डींग तयार झाली की, परत तो डिपार्टमेंट चेंज करायचा आहे. मी एक उदाहरण सांगतो समजा टाउन प्लानिंगने एखादी कर आकारणी केली. समजा त्याचे पैसे कोणी भरले नाहीत आणि ज्यावेळी बिल्डींग तयार झाली. हाउस टॅक्सने कर आकारणी केली . मग इकडचा डेटा परत इकडे कसा आणायचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आत्ता परमिशन कोण देते? परमिशन एटीपी देते. एटीपीने परमिशन देताना मोकळ्या जागेचा संपुर्ण कर, त्याचा लेखाजोखा तयार करून आणि नगररचनाला पाठवत नाही. मागच्या वेळी यांच्याकडे १६८ लोकांची आणि ७५ लोकांची यादी होती.

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, त्या दिवशी आपले स्पष्ट झाले की, प्लींथ सर्टीफिकेटच्या अगोदर कर आकारणी झाली पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्लींथ सर्टीफिकेट कोण घेते?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आकारणीचे काम टाउन प्लानिंग करणार नाही. कर निर्धारक व संकलक, कर विभागाचे करायला तयार आहेत. त्यांच्याकडून फक्त सहकार्याची अपेक्षा आहे. ती कार्यवाही होईल.

**शरद पाटील :-**

ते करायला पाहिजे ना? ते कुठे होते. तिथे ते लोक पैसे घेउन त्याचे सर्टीफिकेट देउन तयार होतात.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

दोन्ही डिपार्टमेंटचा ताळमेळ करून जे काही उद्दीष्ट मा. महासभा ठरवेल, ते फुलफीत करायला प्रशासन प्रयत्न करेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही सभागृहात ठराव मांडतांना ज्या काही छोट्या मोठ्या जबाबदारीच्या गोष्टी आहेत ते या ठरावामध्ये आले पाहिजे. पुढल्या बजेटच्या वेळी बसतांना या ठरावाची आपण नोंद घेउ. तुम्ही ठरावामध्ये सर्व गोष्टींचा उल्लेख करा. एटीपी ने सहाकार्य केले पाहिजे. ह्यांनी सहकार्य केले पाहिजे. नंतर बघू कोण काय बोलतो. इकडे चार चार दिवस आम्ही असेच बसलेले नाही.

**मा. महापौर :-**

पेज नं. ०३ ते टोल केले. एस्कॉर्ट रद्द केले.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना तुम्ही सुट देणार का?

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदरचे नाही. भाईंदरच्या बाहेर.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर मधील जे नागरिक एस्सेल वर्ल्डला जातील त्यांना तुम्ही सुट देणार का?

**मा. महापौर :-**

आपण ती पॉलिसी ठरवू या.

**अनिल सावंत :-**

माझा व्यक्तीशः टोलला विरोध नोंदवा.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

पेज क्र. ०२(क) सुरु होत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, पान नं. ०२(क)

**मा. महापौर :-**

बाजार लिलाव बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वाचनालयाची फी काय केली? वाचनालय फी......

**मा. महापौर :-**

बाजार लिलाव तर होउ द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, टोल आणि एस्कॉर्ट याच्यामध्ये काय नक्की झाले?

**मा. महापौर :-**

टोल झाले.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मार्गस्थ दाखला आपण रद्द केला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक तर ही गोष्ट आता लक्षात घेतली पाहिजे की, जेव्हा स्टॅन्डीगमध्ये आमचे सभासद असायचे त्यावेळी हे सत्ताधारी आणि दोघे बसलेले असतात. त्यावेळी सांगायचे की, तुमचा सदस्य तिकडे होता. झोपले होते काय? आत्ता झोपले होते का?

**अनिल सावंत :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, अजुनही मी विरोध केला आहे. एस्कॉर्टला माझा सपोर्ट आहे. टोलला विरोध आहे. मी अजुनही सांगितले की, रोडची हालत बघितली का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमचा एकट्याचा चालणार नाही. तुम्ही पक्ष म्हणून निर्णय घ्या. जर तुमच्याकडे एवढी पॉवर आहे तर पक्ष म्हणून निर्णय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टोलला आमचा विरोध आहे. पहिले, यांची भुमिका स्पष्ट होउ द्या. आम्ही बोललो की, एस्कॉर्ट वसुल करत नाही तर रद्द करा.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगावकर साहेब, जसे दहिसरला फ्लाय ओव्हरसाठी मुंबई टोल घेते. यावेळी मिरा भाईंदरच्या लोकांनी आंदोलन केले होते की, आमचे काय? इथे आपण टोल घेउ तेव्हा मिरा भाईंदर शहरातील लोक जेव्हा जातील. त्याच्याबद्दल आपली काय भुमिका असेल ती जरा प्रशासनाने स्पष्ट करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पूर्ण टोल नाका तोडला होता.

**प्रशांत पालांडे :-**

बाहेरच्या लोकांचे ठिक आहे. आपल्या लोकांचे काय?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मार्गस्थ दाखल्याच्या ठिकाणी सभागृह जर टोल ठेवत असेल तर टोलपासून अपेक्षित उत्पन्न किती? आणि टोलची उत्पन्न होणारी रक्कम कोणत्या कामावर खर्च करणार आहोत? आणि टोल किती वर्षासाठी राहणार आहे? टोलचे दर काय राहणार आहेत? आणि टोल कोणाला लागले जाईल? हे मा. महासभेने सविस्तर ठरवायला पाहिजे. आणि याच्यातून महत्वाकांक्षी प्रोजेक्ट घ्यायला पाहिजे आणि या सर्व कार्यवाहीला राज्य शासनाची मंजुरी घ्यायला पाहिजे. तद्नंतर निविदा काढून आपण टोल चालवू शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे या बजेटच्या काळामध्ये काही होणार नाही हे नक्की झाले. याचा अर्थ आपण नंतर मा. महासभेमध्ये प्रस्ताव आणू शकतो. आता आपण तरतूद केली  नाही तरी काही बिघडत नाही. उद्या बजेट पास झाल्यानंतर एक प्रस्ताव आला आणि आम्ही लावतो. शासनाला पाठवले, जसे आपण अन्य ठराव करतो. मग आत्ता त्याला एकदम निलच करा. ते नंतरपण करता येते.

**अनिल सावंत :-**

कशाला करता? ते काढून टाका.

**मा. महापौर :-**

सभागृहाने काही तरी एक ठरवा.

**अनिल सावंत :-**

ते काढूनच टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते नंतरपण करता येते. आता याच्यामध्ये रक्कम दाखवलीच पाहीजे अशी काही गरज नाही.

**मा. महापौर :-**

बाजार लिलाव.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा. ब मध्ये ७, टोल नाही किंवा मार्गस्थ दाखला नाही. दोन्हीही रद्द झालेले आहेत. अमाउंटपण रद्द.

**शशिकांत भोईर :-**

चार नंबर, अनधिकृत बांधकाम, २३७(अ) नुसार शास्ती, त्याचे जरा प्रशासनाने स्पष्टीकरण करावे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही चर्चा ऑलरेडी झालेली आहे. हा हेड मालमत्ता करामध्ये जो वसुलीचा विषय आहे, मालमत्ता कराची जी वसुली आहे, अनधिकृत बांधकामाला डबल टॅक्सेशन, त्याचा हा हेड आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण याच्यामध्ये मालमत्ता करामध्ये, सर्वसाधारण करामध्ये आपण हा हेड घेतलेला आहे. याच्यामध्ये डबल कशाला?

**अजित पाटील :-**

शास्ती लावतो त्याचे ते आहे. ते मालमत्ता करामध्ये समाविष्ट नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण तुम्ही जोडताना याच्यामध्ये एकत्र जोडता ना?

**अजित पाटील :-**

मालमत्ता कराच्या डबल शास्ती लागायची. जेवढी अनधिकृत बांधकामे होतील, मालमत्ता कर दहा रुपये लागला......

**प्रेमनाथ पाटील :-**

पाटील साहेब, पहिली गोष्ट म्हणजे आपली बिले जातात त्याच्या अगोदर आपल्या नोटीस.

**अजित पाटील :-**

बिले जातात.

**प्रेमनाथ पाटील :-**

पहिली गोष्ट म्हणजे पहिल्या नोटीस जातात नंतर आपली बिले जातात.

**अजित पाटील :-**

असे नाही. शास्ती लावायची असा ठराव झाला. त्याप्रमाणे शास्ती लावण्यात आली.

**शशिकांत भोईर :-**

श्री. पाटील साहेब, ३७(अ) चा कायदा नक्की काय आहे तो तुम्ही वाचा.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते २६७(ए) आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यामध्ये ए नाही. आम्ही पुस्तकामध्ये बघितले.

**अजित पाटील :-**

त्याचा पुस्तकामध्ये समावेश झालेला नाही. फेब्रुवारी २००८ ला गर्व्हमेंटने नोटीफिकेशन काढून अमेंडमेंट केलेली आहे. त्या पुस्तकात समावेश झालेला नाही. आपण अनधिकृत बांधकामाला जो चार्ज केला त्याच्या आधारे आपण तो कलम लावलेला आहे. मुळ पुस्तकामध्ये त्याचा समावेश झालेला नाही. २००८ ला अमेंडमेंट झालेली आहे. १० एप्रिल २००८ ला, त्या गॅझेटच्या अनुषंगाने ठराव झाला. त्या संदर्भात दंड लावण्याचे ठरवलेले आहे, तो दंड आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, बाजार लिलाव व बाजार फी आता आपण ज्यावेळी बाजार लिलावाचा ठेका देतो. त्यावेळेला त्याला एक रक्कम सांगितलेली असते की, तु एवढी रक्कम एवढ्या साईजच्या गाडीला किंवा एवढ्या जागेला एवढी वसुली करायची. तो त्याच्या मानाने जास्त पैसे वसुल करतो. त्याच्यावर आपली काही बंधने आहेत का? आणि दुसरी गोष्ट, नो हॉकर्स झोन आहे, त्या ठिकाणीसुध्दा आता धंदे लागतात. त्या ठिकाणावरुन वसुली होते. त्याच्यावर आपण काही कडक उपाययोजना करणार आहोत की नाही? मा. महापौर

साहेब, तो जो ठेकेदार आहे तो जे स्टॉल लावलेले आहेत. ज्या दुकानांच्या पुढे एक दिड फुट बोर्ड आलेले असतात किंवा दुकानाच्या बाहेर एखादी वस्तु ठेवलेली असते. त्याच्याकडूनपण तो बाजार फी वसुल करतो. का तर, दुकानाच्या बाहेर बसतो. एक तर त्याला तो अधिकार आहे का ते क्लीअर करावे. अन्यथा जर त्याला अधिकार नसेल तर दुकानदाराला आपण सांगुन सामान आतमध्ये ठेवायला लावा. तो बेकायदेशीर बाहेर ठेवतो. अशा पध्दतीची दादागीरीने वसुली चालु आहे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नियमाप्रमाणे ना फेरीवाला क्षेत्रामध्ये त्यांनी वसुली करायला नाही पाहिजे. आणि ना फेरिवाला क्षेत्रामध्ये अतिक्रमण विभागाने कोणालाही बसू दिले नाही पाहिजे. अतिक्रमण विभागाकडे जास्तीचा मॅनपावर घेउन पुढीलप्रमाणे ती कार्यवाही केली जाईल.

**प्रकाश दुबोले :-**

पण त्या कार्यवाही झाल्या पाहिजेत.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रत्येक प्रभाग कार्यालयाला मॅनपावर कमी आहे. आपण वाढवून घेउन ना फेरीवाला क्षेत्रात जे कोणी असे व्यवसाय करतात ते रेग्युलर काढून टाकण्याची कार्यवाही केली जाईल.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, दुसरी गोष्ट, ज्या ठेकेदाराला आपण ठेका दिलेला आहे आणि त्याने आपल्याकडे रेग्युलर पैसे जमा करायचे आहेत. ते पैसे त्याच्याकडून जमा होत नाहीत. म्हणून आपण त्याच्यावर काय कार्यवाही करतो? आतापर्यंत अधिकाऱ्यांकडून तशी कोणत्याही प्रकारे कार्यवाही झालेली नाही.

**अजित पाटील :-**

पैसे रेग्युलर जमा होतात.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, तुम्ही डिटेल काढा. त्यामध्ये दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणार का? तुम्ही रेग्युलर होते म्हणून सांगता. जर रेग्युलर झाले नसेल तर दोषींवर कार्यवाही करणार का?

**अजित पाटील :-**

मागील चालु वर्षामध्ये......

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, तुम्ही उत्तर देता की, रेग्युलर भरले जातात. जर भरले गेले नाहीत तो रेकॉर्ड तुमच्याकडे आहे. तो मा. महापौर आणि आपण मिळून तपासायचा. जर नसेल तर त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणार का?

**अजित पाटील :-**

संबंधित व्यक्तीवर कार्यवाही करण्यात येईल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. जवळ जवळ वर्ष झाले. उत्तन रोडला बांग्लादेशला मच्छीवाले बसतात, भाजीवाले बसतात. त्याच्यामुळे दोन्ही बाजुने गाड्या येतात आणि ॲक्सीडंट होण्याचा.....

**मा. महापौर :-**

बाजाराचा विषय चालु आहे. आत्ता अतिक्रमणावर बोलु नका.

**नयना म्हात्रे :-**

मी बाजाराचेच बोलते.

**मा. महापौर :-**

मी तेच बोलतो की, आता अमाउंटवर बोला.

**नयना म्हात्रे :-**

मी त्या बाजारावरच बोलते. त्या बाजाराची फी ठेकेदार वसुल करतात आणि ठेकेदार वसुल करतात त्या पैशांचे जाउ द्या. पण जर तिकडे एखाद्याचा जीव गेला तर त्याच्या ठेक्यापेक्षा महत्वाचा जीव नाही का? मग आम्ही एक वर्षापासून बोलतो की, तुम्ही त्या ठेकेदारांवर कार्यवाही करणार आहात की, आपल्या अधिकाऱ्यांवर करणार आहात ते तरी आम्हांला सांगा.

**मा. महापौर :-**

फेरीवाल्यांवर करणार.

**नयना म्हात्रे :-**

तुम्हांला जर फेरीवाल्यांवर कार्यवाही करायची असेल तर त्यांना पहिले तिकडून उचला.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. उचलतो.

**नयना म्हात्रे :-**

फेरीवाले आहेत ते बसणारच. त्यांना धंदा करायचा आहे पण आपले ठेकेदार किती चाप्टर.

**मा. महापौर :-**

श्री. खतगावकर साहेबांकडे चार्ज आहे ते करतील.

**कांचन पुजारी :-**

जे इलिगल कन्स्ट्रक्शन झालेले आहेत. त्याला तुम्ही कर आकार लावता. तर इलिगल म्हणजे तुम्ही फ्लॅटला करणार आहात का?

**मा. महापौर :-**

जेवढे इलिगल आहे.

**कांचन पुजारी :-**

म्हणजे ग्राउंड प्लस फाईव्ह असेल तर सहा सातला तुम्ही इलिगल म्हणून लावणार आहात का?

**कल्पना ठाकूर :-**

माझ्या इथे दोन म्हाडा कॉलनी आहेत. ते अनधिकृत बांधकाम वर चढवतात त्याचे काय?

**मा. महापौर :-**

ते पूर्णच इलिगल झाले.

**कल्पना ठाकूर :-**

त्याच्यासाठी काय पर्याय आहे?

**मा. महापौर :-**

इलिगल बांधकाम अतिक्रमण विभागाने कार्यवाही केली पाहिजे.

**कल्पना ठाकूर :-**

मग मी लेटर दिलेले आहे. काहीच कार्यवाही होत नाही.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आत्ता अतिक्रमणचा विषय नाही. आत्ता शास्ती लावण्याचा विषय आहे.

**अनंत पाटील :-**

ग्रामीण विभागामध्ये जी काही अनधिकृत बांधकामे होतात. त्यांना शास्ती लावण्याची उपसुचना मा. विरोधी पक्षनेते श्री. वैती साहेबांनी केली होती. ती शास्ती ग्रामीण भागांना लावली जाते आहे का? वास्तविक पूर्वीपासून गावठाण खाली क्षेत्र आहे. त्यात दुरुस्तीची कामे केली त्यांना शास्ती लावली जाते. ती रद्द करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, ग्रामीण भागात जी गावे आहेत. गावामध्ये शास्ती लावणार आहात का?

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौर साहेब, शहराच्या हितासाठी तुम्हांला एक सांगायचे आहे. वाचनालय फी असे लिहलेले आहे......

**अजित पाटील :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो. ज्यावेळी गर्व्हमेंटने अनधिकृत बांधकामावर शास्ती लावण्याचे गॅझेट काढले त्या संदर्भात दि. १०/०४/२००८ रोजी ठराव झालेला आहे. जी बांधकामे अनधिकृत आहेत असे टाउन प्लानिंग ठरवतील, त्या अनधिकृत क्षेत्रावर अनधिकृत प्रमाणे लावायची. जी अधिकृत आहेत ती अधिकृतपणे लावायची. परंतु, त्याच्यामध्ये एक अशी सुचना आहे की, गावठणामध्ये जुनी घरे तोडून ज्यांनी बांधकाम केलेले आहे, अशा लोकांना शास्तीमधून वगळण्यात यावे असा ठराव केलेला आहे.

**अनंत पाटील :-**

त्यांनासुध्दा शास्ती लावली गेली आहे.

**अजित पाटील :-**

त्यांनी दाखवून द्यावे की माझे जुने घर होते आणि गावठणामध्ये होते.

**अनंत पाटील :-**

सनदी लावलेल्या आहेत. त्याला पण शास्ती लावली आहे.

**अजित पाटील :-**

ठिक आहे. असे असेल तर आपण त्याला कमी करु.

**आसिफ शेख :-**

आत्ता ते एकत्र करू.

**मधुसुदन पुरोहित :-**

काय माहिती पाहिजे ती द्या. ही बजेटची सभा आहे की, तक्रारीची सभा आहे ते काही कळत नाही. आपण बजेटसाठी बसतो आहे की, लोकांच्या तक्रारीसाठी बसलो आहे. हे काही कळत नाही.मला वाटते

बजेटबद्दल भरपुर काही बोलायला आहे. शहराच्या विकासासाठी ५०० कोटी रुपयांचे बजेट आहे. फक्त एका विषयावर अर्धाअर्धा तास तक्रार म्हणून ही मिटींग ठेवली असेल तर तक्रारच करू या. आणि तक्रार करायची असेल तर संबंधित अधिकारी आहेत. त्यांना जाउन भेटा. नियम, कायदे, कानुन काय असतील ते तुम्हाला देतील.

**वंदना पाटील :-**

साहेब, आपण पब्लिकसाठीच बसलेले आहोत. पब्लिकची कंम्पलेंट...

**मधुसुदन पुरोहित :-**

त्यासाठी संबंधित अधिकारी आहेत. माझे फक्त म्हणणे असे आहे की, जर बजेट या विषयावर चर्चा करत आहोत. तर तक्रार...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांना पहिल्या दिवशीही बोललो होतो की, इथे किती उत्पन्न होउ शकते आणि खर्च कसा करायचा याच्यावर चर्चा व्हायला पाहिजे. बाजार लिलाव हा निलामी पद्धतीने झालेला आहे. अंमलबजावणी साठी ज्या हरकती सुचना असतील आपण सन्मा. पदाधिकाऱ्यांकडे किंवा संबंधित विभाग प्रमुखांकडे मांडल्यानंतर दरम्यानच्या काळात आर्थिक वर्षात त्या सुधारणा केव्हाही करून घेउ शकतात. पण आजची अपेक्षा अशी आहे की, विविध माध्यमातुन आपल्याला किती रक्कम जमा होउ शकते आणि येणाऱ्या वर्षासाठी ती कशी करायची? याच्यासाठी ही सभा आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांचा प्रश्न तुम्हाला समजलेला नाही. त्या म्हणतात की, एका ठिकाणी सात रूपये वसुल करतात. एका ठिकाणी दहा रूपये वसुल करतात. कोण वीस रूपये वसुल करतात. कोण चाळीस रूपये वसुल करतात. आपला बाजार स्वस्तात तर गेला नाही का? आपला हा बाजार गेला हा स्वस्तात कशावरून गेला नाही? जर चाळीस रूपये वसुल करतात. त्याचे हे म्हणणे आहे. त्या कम्प्लेंट करत नाहीत. याचा अर्थ आपला बाजार स्वस्त गेलेला आहे. एका माणसाकडून जर चाळीस रूपये वसुल होतात. तर तुम्ही त्या बाजाराचा आढावा काढा. याचा अर्थ हा बाजार स्वस्त गेलेला आहे. मग त्याच्यावर त्यांना बोलायचे आहे. नविन असल्या कारणाने त्यांना प्रश्न मांडता येत नाही. म्हणून आम्ही सांगतो. हा प्रश्न बरोबर आहे.

**अजित पाटील :-**

मा. पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, बाजार टेंडर लिलाव मंजुर केला त्यावेळेला आपण रेट फिक्स केलेले आहेत. एका चौ. मि. पर्यंत दहा रूपये. दोन मिटरपर्यंत वीस रूपये. त्याच्या व्यतिरिक्त त्यांनी द्यायचे नाहीत. अटीशर्ती मध्ये घातलेले आहे.

**मिलन पाटील :-**

टोपलीचे काय?

**अजित पाटील :-**

एक चौरस मिटरपर्यंत दहा रूपये मर्यादा आहे.

**मिलन पाटील :-**

म्हणजे टोपलीला पण त्यांनी दहाच रूपये द्यायचे का?

**अजित पाटील :-**

ते तसेच होणार.

**मिलन पाटील :-**

मग तसे सांगा ना. एक मिटरमध्ये तो चार टोपल्या ठेवेल. तीन बाय तीनचे मीटर आहे. तो चार टोपल्या ठेवेल तर त्याने दहाच रूपये द्यायचे ना?

**अजित पाटील :-**

एक चौरस मिटर क्षेत्रापर्यंत.

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौर जी, शहराच्या हितासाठी एक सुचना करायची आहे की, भाईंदर पुर्वेच्या प्रभाग समिती क्र. ०३ मध्ये वाचनालयासाठी आरक्षित हॉल आहे. मला वाटते मागिल पाच वर्षे झाली आपण प्रभाग समितीचे बांधकाम केलेले आहे. पण अजुन भाईंदर पुर्वेच्या सर्व विद्यार्थ्यांना त्याच्या सोयी सुविधा मिळालेल्या नाहीत. म्हणजे वाचनालय फि हे आपण इकडे लिहितो पण जे वाचनालय ज्या विद्यार्थ्यांसाठी पाच वर्षे अगोदर बनवून ठेवलेले आहे त्याचा आजुनपर्यंत शुभारंभ पण झालेला नाही, उद्‌घाटन झालेले नाही. आणि मिरा भाईंदर शहरात जेवढे विद्यार्थी आहेत ते सर्व इकडे नगरभवनला येतात.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मी त्याच्यावरच बोलतो. त्यांनी जी सुचना मांडली ती अगदी योग्य सुचना आहे. विद्यार्थ्यांसाठी आणि सर्वसाधारण नागरिकांसाठी सुद्धा तिथे वाचनालय होणे जरूरीचे आहे. कारण रेल्वे क्रॉस

करून वयस्कर, वृद्ध माणसे इथे येउ शकत नाहीत. म्हणून भाईंदर पुर्व येथे प्रभाग कार्यालय ३ मध्ये वाचनालयाचे प्रोव्हीजन करून घ्या. ह्या बजेटमध्ये झाले पाहिजे आणि पुढच्या वर्षी चालू झाले पाहिजे.

**मा. महापौर :-**

पेज नं. ०२

**अनिल सावंत :-**

लवकरात लवकर चालू करा.

**आसिफ शेख :-**

पान नं. २, अनधिकृत बांधकाम तोडणे, वसुली. मागच्या आठ महिन्यात एकही पैसा वसुल झालेला नाही. म्हणजे पालिकेची वसुली करायला पाहिजे यात कोणाला स्वारस्य दिसत नाही. स्वतःची वसुली जोरात दिसते. पालिकेची वसुली कधी करणार? महसुल उत्पन्नात वाढ केली पाहिजे ना? आणि तुम्ही आत्तापर्यंत १५ लाख रूपये खर्च केले. पण वसुली झीरो. काय करायचे? माझे असे स्पष्ट मत आहे की, अनधिकृत बांधकाम संदर्भात आपल्या संपुर्ण मिरा भाईंदर शहराची प्रतिमा अत्यंत मलीन झालेली आहे. मा. उच्च न्यायालयामध्ये, मा. जिल्हा सत्र न्यायालयामध्ये सर्व ठिकाणी अनधिकृत बांधकाम संदर्भातील केसेस प्रलंबित आहेत. हायकोर्टाने ताशेरे ओढलेले आहेत. परंतु काही कार्यवाही होत नाही. आजच्या या सभागृहात माझी अशी स्पष्ट सुचना आहे की, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांना कुलुप लावून टाका, टाळे लावून टाका, बंद करा. आज तिकडे जे कर्मचारी आहेत. त्यांना दुसरीकडे वर्ग करा. ना रहेगा बास, ना बजेगी बासुरी. विषय संपला.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ज्यांनी वसुली केली नाही. त्यांच्यावर ही शास्ती लावा की, त्यांच्याकडून त्यांच्या पगारातुन किंवा त्यांच्या प्रोव्हीडन्ट फंडातुन ही वसुली करा. सुरूवात केल्याशिवाय हे होणार नाही. आपण हा इष्टांक कशाला देतो?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, याचा अर्थ असा आहे की, आपल्या मिरा भाईंदरमध्ये अनधिकृत बांधकाम होतच नाही. कारण आठ महिन्यामध्ये झीरो वसुली दाखवतात.

**मिलन पाटील :-**

याच्यावर कोण कोण अधिकारी नेमले होते?

**आसिफ शेख :-**

श्री. मिलन पाटील साहेब, इकडे काही होणार नाही. एक अधिकारी सस्पेन्ड झाला आहे का? एक दोन लोकांना घरी बसवले असते तर इकडे प्रशासनाचे चांगले झाले असते. काहीच नाही फक्त कार्यवाही इकडून तिकडे बदली करा. पुन्हा त्या डिपार्टमेंटला आणा काय चालले आहे? एक दोन लोकांना घरी बसवा. प्रशासन कसे सुधारत नाही ते बघु. मा. महापौरांना काही स्वारस्य दिसत नाही असे मला वाटते. ते डिपार्टमेंट बंद करा. आजच्या आज निर्णय घ्या. म्हणजे आपली तेवढी बदनामी तर होणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

अनधिकृत बांधकामासाठी राज्य शासनाने प्रभाग अधिकाऱ्यांना जबाबदारी निश्चित केल्याप्रमाणे तत्कालिन आयुक्तांनी सुद्धा सर्व प्रभाग अधिकाऱ्यांवर याबाबतची जबाबदारी निश्चत केलेली आहे. आणि त्याप्रमाणे ते कामकाज होत आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, या कामासाठी प्रत्येक प्रभागात जो आवश्यक मॅन पावर पाहिजे आणि अवजारे आणि साहित्य पाहिजे, एक टिपर, कुठल्याही प्रकारची फॅसिलिटी नाही ही बाब आम्ही मा. महापौरांच्या निदर्शनास आणलेली आहे. आत्ता यामध्ये सुधारणा करून निश्चित कार्यवाही केली जाईल.

**आसिफ शेख :-**

साहेब, मॅन पावर म्हणजे काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

जे मजुर लागतात ते मजुरसुद्धा नाहीत.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, विधी अधिकारी से जरा एक बात पुछेंगे उन्होने मुझे एक जजमेंट दिया है की, जो भी अतिक्रमण तोडा जाता है उसके लिए आपको वसुली करना है। यह हायकोर्ट का आदेश है। इसका मतलब आप हायकोर्ट के आदेश का उल्लंघन कर रहे है।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, प्रशासन अधिकारी हे प्रत्येक वेळेला सर्वांचे दुख आपल्या आपल्या डोक्यावर घेतात. आपण ठेका पद्धतीने मजुर पुरवायचे काम दिलेले आहे. १०० मजुर रोज नाक्यावर उभे असतात या काशिमिरा नाक्याला, गोडदेव नाक्याला, खारीगावात उभे असतात. तुम्हाला किती मजुर पाहिजेत. मजुर मिळत नाहीत याचा अर्थ काय?

**शरद पाटील :-**

जो बिल्डर पैशाला नाही बोलेल त्यांच्या बिल्डींग तोडायला ह्यांना मजुर मिळतात.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ही जी वसुली झालेली नाही ती तुम्ही त्या अधिकाऱ्यांवर टाका हे आमचे म्हणणे आहे.

**मा. महापौर :-**

साहेब, जेवढे इमारत बांधकाम तोडलेले आहे. त्याची आपण माहिती घ्या आणि ते संबंधितांकडून वसुली करून घ्या.

**मिलन पाटील :-**

वसुली झाली नाही तर?

**मा. महापौर :-**

अधिकाऱ्यांवर कार्यवाही करा.

**शरद पाटील :-**

अतिक्रमणावर कोण कोण अधिकारी आहेत. त्यांची जरा नावे सांगा आम्हाला माहिती पडू द्या.

**मिलन पाटील :-**

त्यांना शो कॉज नोटीस देणार? निलंबनाची कार्यवाही..

**आसिफ शेख :-**

लोक त्याच्या पलिकडे गेले आहेत.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, अतिक्रमणावर जे अधिकारी आहेत. आम्हाला त्यांची नावे सांगा.

**मिलन पाटील :-**

अमुक एक टार्गेट द्या. दोन चार महिन्याचे टार्गेट द्या. तुम्ही रूलिंग द्या.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, शोकॉज नोटीस द्या, बदली करा हे कशाला पाहिजे. त्यांना निलंबित करा. सहा-सहा महिने घरी बसवा. दोन लोकांना बसवा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही रूलिंग द्या की, दोन चार महिन्यात केले नाही तर निलंबित केले जाईल.

**मा. महापौर :-**

साहेब, जे दोषी अधिकारी असतील, एखादा कार्यवाही करत नाही...

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हा अतिक्रमणाचा विषय बंद होणार नाही. प्रत्येक नगरसेवक याच्यावर बोलणार आहे. त्याच्यापेक्षा तुम्ही हा विषय घेउन एक मिटींग लावा.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही त्याच्यावर बोला. रूलिंग द्या.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, जे संबंधित अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, अतिक्रमणावर कोण कोण अधिकारी आहेत त्यांची आम्हाला जरा नावे सांगा. आम्हाला माहिती नाही कोण आहेत ते.

**मा. महापौर :-**

श्री. शरद पाटीलजी आज बजेटचा विषय आहे.

**शरद पाटील :-**

असु द्या आम्हाला बोलू द्या. आम्हाला फक्त त्या अधिकाऱ्यांची नावे सांगा. अतिक्रमणावर कोण कोण अधिकारी आहेत ते आम्हाला माहिती नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याला यादी मागवून देतो.

**शरद पाटील :-**

मी त्यांना द्यायला बुके मागवले आहेत. तुम्ही नावे सांगा त्यांचा सत्कार करतो.

**मा. महापौर :-**

तुम्हाला संपुर्ण डिपार्टमेंटची यादी पाहिजे ना?

**शरद पाटील :-**

कोण कोण अधिकारी आहेत ते द्या.

**मा. महापौर :-**

दोन मिनिटात यादी देतो.

**शरद पाटील :-**

तुम्ही पहिले त्यांच्या मालमत्तेची चौकशी करा.

**मा. महापौर :-**

श्री. आसिफ शेखजी आत्ता बसुन घ्या.

**आसिफ शेख :-**

आम्हाला उत्तर कुठे मिळाले.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, हायकोर्ट के जो आदेश है की जो भी अतिक्रमण तोडा जाता है। उसका वसुली संबंधित पार्टी से किया जाए।

**मा. महापौर :-**

एकही बात बार बार बोलेंगे तो कैसा चलेगा। अब इन्होने बोल दिया की, उनको सस्पेन्ड करो।

**राजेंद्र जैन :-**

सस्पेंड नही करने का? मा. महापौर साहब, ऐसी उल्टी सिधी बात मत करो। जो करने का वह अपने हाथ मे नही है। जो करना है कानुन करेगा। आपका हायकोर्ट का ऑर्डर क्या है? विधी अधिकारी से पुछिए जो जजमेंट उन्होने मुझे दिया है, उसमे अतिक्रमण करनेवालो के खिलाफ वसुली करना आपका फर्ज बनता है और अगर १५ लाख का खर्च किया है, वसुल नही किया है तो इन अधिकारीयो ने हायकोर्ट का अपमान किया है। तब भी आपको कानुनन कार्यवाही करना पडता है। आपसे आशा है की, आप जबाब देंगे।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी जो खर्च येतो तो संबंधित अनधिकृत बांधकाम केलेल्या व्यक्तीला याची नोटीस देवून वसुली करण्याची तरतुद आहे आणि त्याने न भरल्यास ती थकबाकी मालमत्ता कराच्या रूपाने वसुल करण्याची तरतुद आहे. अतिक्रमण विभागाकडून अशा ज्या काही डिमान्ड दिलेल्या आहेत. त्या मालमत्ता करामध्ये वर्ग करण्यासाठी तो प्रस्ताव कर निर्धारक व संकलक यांच्याकडे पाठवून सर्व रकमा वसुल करण्याची कार्यवाही केली जाईल.

**मिलन पाटील :-**

सात आहे, रस्ता दुरूस्ती.

**आसिफ शेख :-**

आमचे सन्मा. जेष्ठ सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे आत्ता इथे नाहीत. त्यांचे म्हणणे बरोबर होते की, आंधळ दळतय आणि कुत्र पिठ खातय. आपल्याकडे तशी परिस्थिती आहे. आम्ही सांगतो की, त्या एक दोन लोकांना घरी बसवा. उच्च न्यायालयाने संपुर्ण ताशोरे ओढलेले आहेत. अनधिकृत बांधकामावर कारवाई होत नाही. नाहीतर डिपार्टमेंट बंद करा. पुन्हा त्या अधिकाऱ्यांची बदली करायची. चौकशी करायची, काय चालले आहे? निलंबित करून चौकशी करा. त्यांना पाच सहा महिने घरी बसवा. नाहीतर अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग बंद करा. त्याला टाळे लावा. आणि ते कर्मचारी दुसऱ्या ठिकाणी वर्ग करा. पालिकेच्या वसुलीचे कोणाला काही पडलेले नाही. सगळे स्वतःच्या वसुलीच्या मागे लागलेले आहेत. काय चालले आहे? मा. उपायुक्त साहेब आपण उत्तर द्या.

**चंद्रकांत वैती :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपण आत्ता एक खुलासा केला की, त्यांना नोटीस देउन कार्यवाही करण्याची एक प्रोसिजर आहे. दंड वसुलीची पद्धत आहे. खरे तर प्रशासनाने मागील एक वर्षात लोकांना इलिगल कन्स्ट्रक्शन करायला अगदी प्रोत्साहन दिले. आपण आणलेला स्टे त्या जोत्यावर असतो. प्लीन्थवर स्टे असतो. पण त्याचे सात माळे होईपर्यंत आपण वाट बघतो. इन्फॅक्ट कोणी नगरसेवकाने तक्रार केली किंवा कोणाची तक्रार आली तर त्याचे सेटलमेंट केले पाहिजे. आपल्यामध्ये काही विद्वान अधिकारी असे आहेत की, जे स्वतःच काही नगरसेवकांना तक्रारी करायला सांगतात आणि सेटलमेंट करतात. आपण काही कार्यवाही वगैरे करणार नाही. वारंवार आपल्या इथे चर्चा झालेली आहे. एक दोन नव्हे ३६२ तक्रारी माहितीच्या अधिकारात मी आपल्या महानगरपालिकेकडून माहिती घेतली. इलिगल कन्स्ट्रक्शन, स्टेवर असलेली कामे, एम.आर.टी.पी. दाखल केलेले बिल्डर, ज्यांच्यावर एम.आर.टी.पी. दाखल केली त्यांनीही सात सात माळ्याचे टॉवर बांधले. ह्या सगळ्यांचा बाढ पाउण किलोची रद्दी मी पाठवली होती. नउ मुद्दे महापालिकेच्या कामाजाचे, प्रशासनाचे कसे गुणदोष आहेत त्याची माहिती दिली होती. तर आपण सांगता की, नोटीस ठेउन कार्यवाही, नोटीस ठेवून आपण काय करतो माहिती आहे, आपल्या अमुक अमुक लोकांना उत्पन्नाचे मोठे साधन, तेवढे तर आपले बजेटपण नसेल एवढी त्यांची मजा आहे. त्यांच्यापैकी कोणावर आपण कार्यवाही केली नाही. मी

सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, आपल्याकडे अकरा वकील महापालिकेच्या विविध दाव्यांची लढाई करण्यासाठी, इलिगल कन्स्ट्रक्शन साठी काम करत असतात. त्यांना आपण मोठ्या प्रमाणात मानधन देत असतो. विधी सल्लागार आहेत. त्यांच्यावर आरोप करत नाही. त्या प्रामाणिक प्रयत्न करत असतात. पण ज्यांनी त्यांच्याकडून काम करून घ्यायचे आहे त्या अधिकाऱ्यांची स्वतःची इच्छा संपलेली आहे. ते त्यांच्याकडून काम करून घेत नाहीत. त्यांच्यासाठी आपण एवढा स्टाफ, वाहन, कार्यालय वापरत असतो. पण विधी सल्लागारांकडून किंवा त्या वकीलांकडून एवढी फी दिल्यानंतर आजपर्यंत महापालिकेच्या हितामध्ये तुम्ही कोणता निर्णय आणला? तुम्ही सभागृहाला काय माहिती देता आणि सांगता की, अशी कार्यवाही करण्याची तरतुद आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात झोपड्या झाल्या. नाल्यामध्ये इमारती झाल्या. पावसाचे पाणी निचरा करणारे जे नाले आहेत त्याच्यामध्ये भराव झाले. त्याच्यामध्ये इमारती झाल्या. रस्त्यावर रिझर्व्हेशनमध्ये जवळ जवळ शंभर एक रिझर्व्हेशनमध्ये कामे झाली आहेत. ती आपण काढली नाहीत. आपण याच्यामध्ये मर्दुमकी गाजविण्यासारखी कामे करू नका की, आम्ही ह्याला निलंबित करू, त्याला निलंबित करू. वारंवार या सभागृहासमोर ही बाब आलेली आहे. दोनदा मा. महासभेमध्ये इलिगल कन्स्ट्रक्शनचा विषय आलेला आहे. लक्षवेधी झालेली आहे. अनेक वेळा अनेक सदस्यांचे त्या इलिगल कन्स्ट्रक्शनसंबंधि जे प्रश्न असतात एका प्रश्नाला उत्तर देतात. एम.आर.टी.पी.च्या गुन्ह्याचा तपास पोलिस करतात. पोलिस स्टेशनला सांगा की, तो बिल्डर सौडून जाईल. जो इललिगल कन्स्ट्रक्शन करतो तो सोडून जाईल. आपण काहीतरी माहिती देत असतो. अशी माहिती देउ नका. कार्यवाही करण्याचे धाडस तुमच्यात नाही. नविन कमिशनर आलेले आहेत. त्यांच्याकडून किती मोठ्या प्रमाणात कार्यवाही होते. पण श्री. शरद पाटील साहेबांनी जी मागणी केली आहे, श्री. पाटील साहेब, आपण सभागृहात नव्हते. श्री. शरद पाटील साहेबांनी सांगितले, सभागृहाने मान्यता दिली पाहिजे की, त्या अतिक्रमणाच्या अधिकाऱ्यांची नावे सांगा. आणि त्यांच्या मालमत्तेची चौकशी करा. सगळेच विभाग झाले आहेत. खऱ्या अर्थाने त्याच्या मालमत्तेची चौकशी झाली पाहिजे. श्री. मिलन पाटील साहेबांनी मागे सुचना केली की त्याच्या पी.एफ. मधुन पैसे कापा. अधिकाऱ्यांना असे वाटायला नको की, सर्व नगरसेवक असे का करतात. तुम्ही जे काही करता ते झाकुन राहिलेले नाही. ते सगळे उघड आहे. आम्ही सर्व उघड्या डोळ्यांनी बघतो. त्याच्यामुळे आत्ता तरी ह्या गोष्टींना तुम्ही कुठेतरी रोकथाम लावा. उगाच काहीबाही सांगून वेळ काढू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आत्ता खाली फटाके फुटले होते आणि आपले नविन आयुक्त आलेले आहेत. चार्ज घेतलेला आहे असे कळलेले आहे. आत्ता ते मा. आयुक्त जेव्हा भिवंडीला होते त्यांनी चार लोकांना निलंबित केलेले आहे. आत्ता त्यांना पण सभागृहाची भावना कळू द्या. जर त्यांनी चार्ज घेतला असेल तर बोलवा. आपण सत्कार करू.

**मा. महापौर :-**

श्री. जाधव साहेबांनी त्यांना अजुन रायटींगमध्ये चार्ज सुपूर्द केलेला नाही. सहीसाठी कागद घरी मागवलेला आहे. ती सही झाली की, अर्ध्या एक तासात ते इकडे येतील. पेज नं. ३

**मिलन पाटील :-**

साहेब, जरा तुम्ही हे बघा, २००६-०७ ला १ करोड ५ लाख आणि २००७-०८ ला २ करोड ७८ लाख आणि आपण त्यांना पाच चौदाचे दिले होते. आत्ता त्याच्यात ही वसुली किती झाली आहे ते बघा. आत्ता पुन्हा ०८-०९ ला आपण त्यांना पाच करोड चे दिलेले आहे. ही जी पाच करोडची आहे ही मागची वसुली का झाली नाही?

**मा. महापौर :-**

जे लोक परवानगीला येतात ते लोकच पैसे भरतात, याच्यामध्ये वसुल करायचे नसतात. जो परवानगीला येईल तो व्यक्ती पैसे भरतो.

**मिलन पाटील :-**

साहेब, हे तुम्ही का बोलता? त्या अधिकाऱ्यांना बोलू द्या. साहेब, १०० मीटरची परमिशन घेतात आणि ३०० मीटर खोदतात मग ही जबाबदारी कोणाची? हे पैसे कोण वसुल करणार? आपण आत्ता जर रिलायन्सकडे गेलो तुम्हाला जर लाईट पाहिजे असेल तर ते अगोदर बोलतात की, एवढे एवढे मीटर होईल तुम्ही अगोदर पैसे भरा. आपण डिपॉसीट भरतो की नाही? तेव्हा आपल्याकडे लाईन खोदतात की नाही? मग आपण टेलिफोन आणि याचे का भरत नाही? त्यांना ते एस्टीमेट विचारा की, तुमचा फॉल्ट कितीचा आहे. इकडे पैसे भरा नंतर चालू करा. त्याच्यानंतर पुढचे झाल्यानंतर पुढच्या याच्यात तुम्ही डिपॉझीट घ्या. तुम्ही सांगा.

**राजेश वेतोसकर :-**

मा. महापौर साहेब, भुयारी गटार योजनेखाली जे आत्ता रस्ता खोदकाम होणार आहे. त्यासाठीपण ते पैसे भरणार आहेत का?

**दिपक खांबित :-**

ते आपणच खोदणार, आपण रिपेअरींग करणार.

**शरद पाटील :-**

या गोष्टीवर माझी एक सुचना आहे. एकतर त्या बी.एस.ई.एस. बोला, एम.टी.एन.एल. बोला किंवा दुसरी जी कंपनी आहे त्यांना सांगा की, तुम्ही खोदा आणि होते तसे रिपेअरिंग करून द्या. आणि बाकी जी काही चार्ज लागत असेल तो चार्ज त्यांच्याकडून घ्या. त्याने आपल्याजवळ पॅचवर्कची झंजट निघणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

श्री. पाटील साहेब, त्याकरिता आपण यंदापासुन वार्षिक दराची निविदा करतो. आपण खोदाई परमिशन दिली की, त्याबरोबर लगेच ठेकेदाराला दुरूस्तीची ऑर्डरपण द्यायची. तसे आपण यावेळेपासुन करतो.

**अनिल सावंत :-**

स्टॅंडींगमध्ये सगळे केले आहे.

**मिलन पाटील :-**

मागच्या वसुलीचे काय?

**दिपक खांबित :-**

मागच्या वर्षी पाच कोटी चौदा लाख वसुली झाली आणि सहा कोटी खर्च झाला. म्हणजे हे जे पैसे येतात. याच्यामधून आपण पावसाळ्यात पडणारे खड्डे, पाणी पुरवठा खोदणारे रस्ते सुद्धा कारण आपण त्यांच्याकडून दिडपट पैसे घेतो. तुम्ही दरवर्षीचे बघा. यावर्षीही बघा पहिल्या आठ महिन्यामध्ये दोन कोटी पाच लाख वसुली झाली आहे. आत्तापर्यंत तीन कोटी एकसष्ट लाख झालेली आहे. त्यांनी ज्या परमिशन मागितल्या आहेत. त्याचे सव्वा कोटी डिमांड नोट दिले आहेत. म्हणजे यावर्षीही पाच कोटीच्या वर आपली वसुली होईल. आणि आपला खर्च तेवढाच होतो.

**मिलन पाटील :-**

पण आत्ता जे २ करोड ९४ लाख रूपये दिले आहेत. आत्ता अगोदर तुमचे पाचच वसुल झालेले आहेत.

**मा. महापौर :-**

दोन पाच आहेत.

**दिपक खांबित :-**

तुम्ही पहिल्या आठ महिन्यामध्ये बघा. पहिल्या आठ महिन्यामध्ये आपण दोन कोटी पाच लाख वसुली केलेली आहे. आणि आत्ता त्यानंतर डिसेंबर, जानेवारी ह्या दोन महिन्यामध्ये अजुन दिड कोटी वसुली आपली झाली आहे. एक कोटी पंच्चावन्न लाख आपली वसुली झाली आहे. आणि अजुन सव्वा कोटीची बिले आपण त्यांना पाठवलेली आहेत. त्यांनी ज्या परमिशन मागितल्या आहेत. त्याच्यामध्ये डिमांड नोट दिल्या आहेत. ते पैसे आले की, आपण त्यांना परमिशन देणार.

**मिलन पाटील :-**

हा फंड अगोदर ॲडव्हान्समध्ये घ्या.

**दिपक खांबित :-**

आपण ॲडव्हान्सच घेतो.

**मा. महापौर :-**

आपण पहिलेच पैसे घेतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महपौर साहेब, जर तुमची रस्ते दुरूस्तीसाठी वसुली झालेली आहे. मग जेव्हा एखादा नगरसेवक रस्ते दुरूस्तीचे सांगतो की, याठिकाणी दुरूस्ती करायला पाहिजे. मग त्यावेळेला तुम्ही सांगता की, बजेट संपला.

**दिपक खांबित :-**

त्याकरिता आपण एकदा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

रस्ते केल्यानंतर लगेच एका महिन्यामध्ये पुन्हा रिलायन्स वाले किंवा आपल्या पाण्यासाठी तिकडे खोदकाम होते. मग अशा वेळेला त्या नगरसेवकांनी काय करायला पाहिजे?

**मा. महापौर :-**

मग आत्ता त्यांनी तेच सांगितले की, एखाद्या कंपनीला खोदायची आपण दीड लाखाला परवानगी दिली तर इमिजीएटली त्याची निविदा काढायची. त्याला सांगायचे की, हे दिड लाख किंवा एक लाख जी काही एस्टीमेट कॉस्ट होईल ते घे आणि इमिजीएटली रिपेअर करून घ्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कुठेही खोदकाम झाले की, तिकडे काम लगेच पूर्ण झाले पाहिजे. नागरिकांना त्रास होणार नाही.

**दिपक खांबीत :-**

आपण वार्षिक दराचा करतो.

**चंद्रकांत वैती :-**

श्री. खांबीत साहेब आपण सांगता पाच करोड रूपये. आपण रस्ता दुरूस्तीसाठी प्रावधान ठेवले होते. मला वाटते आपल्याकडे पाच करोड रूपये आलेले आहेत. पाच करोडपेक्षा जास्त आले असतील. म्हणजे आपण ते प्रावधान जास्तीचे करायला पाहिजे. तुम्ही परत चेक करून घ्या. तुम्ही त्याच्यामध्ये सांगता की, अडीज करोड रूपये आले आहेत. पण प्रत्यक्ष माझ्या माहितीप्रमाणे ते पाच करोड रूपये आपल्याला अपेक्षित होते. त्याच्यापेक्षा जास्त आलेले आहेत. त्यात तुम्ही जास्तीचे प्रावधान करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे बरोबर आहे.

**मा. महापौर :-**

किती करायचे? सहा कोटी ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आठ कोटी.

**मिलन पाटील :-**

सहा कोटी करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते स्वतः बोलतात की, पाच कोटीपेक्षा जास्त आलेले आहे. आठ कोटी करा, वसुली होणार आहे.

**मा. उपायुक्त (मु.) सो., :-**

सहा कोटी होईल असे म्हणतात.

**मधुसूदन पुरोहित :-**

मा. महापौर जी, पुन्हा एकदा सुचना करण्यात येते.

**दिपक खांबीत :-**

महानर गॅस आहेत त्यांची मिरारोडला सगळी कामे झाली आत्ता फक्त ईस्टला त्यांची जास्त खोदाई होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आत्ता त्यांच्या बोलण्यावरून दिसले......

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सात करू.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, श्री. मिलन पाटील साहेबांनी आरोप केला की, दहा मीटरची परवानगी घेतात आणि शंभर मीटर खोदतात, त्याला शोधून काढल्यानंतर दंडात्मक कार्यवाहीची आपल्याकडे काही प्रोव्हीजन आहे का ?

**मा. महापौर :-**

यापुढे ज्या लोकांनी विदाऊट परवानगी खोदले असेल किंवा जास्त खोदले त्याच्याकडून कमीत कमी तीनपट दंड घ्या.

**प्रकाश दुबोले :-**

तीन पट दंड घेतल्यामुळे आपल्याकडे पैशाची वाढ होऊ शकते.

**मधुसूदन पुरोहित :-**

मा. महापौर जी, एक सुचना करण्यात येत आहे. मला वाटते प्रत्येक रितीने सर्वात जुना शहर भाईंदर (पूर्व) असेल. भाईंदर पूर्वेचे भरपूर नगरसेवक इकडे बसले असतील. आपल्याला सांगू इच्छितो की, भाईंदर पूर्वेला मागील वीस वर्षे झाली, रस्त्याचे पॅचवर्क तरी झाले असतील. ते पण गणपतीला नगरसेवक मागे लागून ते काम करुन घेतात मागील वीस वर्षे झाली मला असे वाटते की, एकाही रस्त्याचे नवीनीकरण झालेले नाही. आणि जेव्हा कधीही विचारले तेव्हा एकच उत्तर असते की, आमच्याकडे बजेट नाही. आणि जिथे अजून लोक कर देत नाही, जिथे विकासक स्वतः रस्ता बांधतो, जिथे विकासक स्वतः गटार बांधतो तिकडे सर्व सुविधा देण्यासाठी महानगरपालिका सदैव तत्पर असते. पण भाईंदर पूर्व सर्व रितीने जुना असला तरी तिथे कुठलीही सोयी-सुविधा नाही. आणि ज्यावेळी विचारले त्यावेळी एकच उत्तर असते. मला वाटते, भाईंदर पूर्वेचे जेवढे नगरसेवक आहेत. ते सर्व माझ्याबरोबर सहमत असतील. कारण जे काम झाले पाहिजे, जुने लोक आहेत त्यांना ती सुविधा मिळाली पाहिजे. ज्यांच्यामुळे आपल्या मिरा भाईंदर महापालिकेला राजस्व येतो. त्या लोकांना सुविधाच नाही. आणि जिथे लोक अजून राहायला गेलेच नाहीत तिथे रस्ता बांधायला सुरूवात आहे. तुम्हांला

पाहिजे तर मी दहा ठिकाणी दाखवेन. माझे एकच म्हणणे आहे की, जिथे जुने लोक राहतात, जुने रस्ते आहेत त्यांना काहीतरी नविनीकरण करून दिले पाहिजे. ही सुचना आहे. तक्रार नाही.

**मिलन पाटील :-**

ते काय बोले हे तुम्ही ऐकले का? ते बोलले की, नुतनीकरणाचे एकसुध्दा काम झालेले नाही. मग मागचे बजेट कुठे गेले? ते उत्तर तुम्ही दयायचे तर तुम्ही फक्त हो म्हणता.

**दिपक खांबीत :-**

मी उत्तर देतो. साहेब, भाईंदर पुर्वेचे दोन्ही बाजूला जेवढे सुध्दा नवघर क्रॉस रोड आहेत. ते १९९९-२००० मध्ये आपण सगळेच पुर्नपृष्ठी करण केले होते आणि गेल्या तीन वर्षामध्ये आपण एक बी.पी. रोड नवीन केला. नवघर रोड केला. त्यानंतर स्टेशन समोरचा रस्ता, प्रशांत हॉटेल ते बंदरवाडी नाका, केला. हे रस्ते केले. आणि यावर्षी जो गोडदेव स्मशान रोड आहे. तो आपण पहिला घेतलेला आहे.

**मधुसूदन पुरोहित** :-

साहेब, हा आरोप नव्हता. ही एक सुचना होती. प्रत्येकाने गैरसमज करून घ्यायचा नाही. मी विभागाला फक्त सुचना केली. आरोपास प्रत्यारोप करत नाही.

**आसिफ शेख :-**

रस्ता नुकसान भरपाई पाच कोटीचे सात कोटी केले, बरोबर आहे? आत्ता मी म्हणतो की, अनधिकृत बांधकाम तोडणे वसुली पंचवीस लाख रूपये दाखवतात, तिथे नील करा. आणि पान क्र. १८ वर अतिक्रमण अनधिकृत बांधकाम हटविणे आणि जे.सी.बी., पंचवीस आणि हे तीस लाख रूपये आहे. इथे पण झीरो करा. आपल्याला डिपार्टमेंट बंदच करायचे आहे ना? कोणी वसुलीच करत नाहीत.

**मा. महापौर :-**

पान क्र. ०३ वर आत्ता बोला. त्या पेजवर जाऊ त्यावेळी बोला.

**आसिफ शेख :-**

पंचवीस लाख काय करणार आहेत? निल करा. तिकडे आमची सुचना घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

श्री. शेख साहेब, त्याच वेळेस सांगा ना.

**आसिफ शेख :-**

मग तुम्ही ती वाढवा. एक कोटी करा, दोन कोटी करा, की, आम्ही अनधिकृत बांधकाम तोडणार आहे. वसुली करणार आहे. पालिकेच्या वसुलीचे तुम्हाला काही पडलेच नाही का? हे नील तरी करा. नाहीतर वाढवा. दोघांपैकी एक काम करा काय करणार आहात ते सांगा.

**मा. महापौर :-**

आपण ती वसुली करणार.

**आसिफ शेख :-**

पंचवीस लाख रूपये नाही. तुम्ही दोन कोटी वसुली करा.

**मा. महापौर :-**

दोन कोटी वसुली होते का?

**आसिफ शेख :-**

होईल. का होणार नाही? किती करता ते अगोदर सांगा.

**वंदना पाटील :-**

मा. महापौर साहेब, भाईंदर पूर्वेला नाक्यावर २४ तास लाईट घालवलेली...

**आसिफ शेख :-**

वसुली करायची तुमची मानसिकता नाही का?

**वंदना पाटील :-**

खारीगांव नाक्यावर चोवीस तास लाईट घालवून तिथे लाईटचे एवढे मोठे काम केले. एवढे मोठे काम केले. एवढा मोठा रस्ता खोदला. त्याची परवानगी लागली नाही का? त्यांच्याकडे परवानगी नव्हती. मी श्री. जानकर साहेबांना फोन केलेला. तर श्री. जानकर साहेब बोलतात की, याची परवानगी लागत नाही. कारण तीन-चार ठिकाणी तो रस्ता खोदला आहे.

**आसिफ शेख :-**

ते काय करता? पंचवीस लाखाचे दोन कोटी करा. आमि जर दोन कोटी वसुल झाले तर त्या अधिकाऱ्याचा पहिला सत्कार करा. नाहीतर बंद करा. नील करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

श्री. शेख साहेब, मागील तीन वर्षाचे उत्पन्न बघून प्रॅक्टीकली फीगर सांगा. हजारावर फीगर आहे आणि तुम्ही म्हणता की, तीन कोटी करा.

**आसिफ शेख :-**

पर्सनल वसुली जास्त नाही. मी म्हणतो की, पालिकेची वसुली करा. तुम्ही दोन कोटी करा आणि वसुली झाल्यानंतर अधिकाऱ्यांचा सत्कार करा. कमीत कमी दोन कोटी करायचे. जास्तीत जास्त पाच कोटी करा. तुम्हाला त्यामध्ये जास्त अनुभव आहे.

**मा. महापौर :-**

त्या त्याच्यामध्ये ३५ लाख हा फिगर चुकून झालेला पेज नं. ०३ टेंडर मालमत्ता ट्रान्सफर फॉर्म फी, आपण त्याला एक करोड करतो. मा. आयुक्तांनी ते चुकून ३५ सांगितले मागची वसुली ७५ लाखाच्या आजूबाजूला आहे. त्याला एक करोड करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

इमारत परवाना आणि विकास आकार मागच्या सगळ्या फिगर बघितल्या तर आपण सोळा करोडपर्यंत गेलेलो. गेल्यावर्षी आपल्याला १३ करोडचा इष्टांक होते. त्याच्यामध्ये ८ कोटी रूपये वसुल झाले आहेत आणि बिल्डर लोकांना कमेन्समेंट सर्टीफिकेट देणे महानगरपालिकेनेही बंद केले होते. बिल्डर लोकांना आत्ता ते कमेन्समेंट सर्टीफिकेट द्यायची सुरूवात करणेकरिता त्याच्यासाठी आपण ठराव केलेला आहे. हे जे आपले अपेक्षित उत्पन्न आहे ते वाढायला पाहिजे ना?

**मा. महापौर :-**

आत्तापर्यंतची ०९ करोड २५ लाख वसुली आहे. ही पुढील आठ महिन्यांची वसुली होती, ज्यावेळी आपल्याला प्राब्लमे नव्हता इस्टेटचा आणि मंदिचा आत्ता दोन प्रॉब्लेम आले आहेत. इस्टेटचा आत्ता आपण ठराव केलेला आहे. आणि त्याप्रमाणे आपण एखादी परवानगी चालू केली तर नक्कीच ते उत्पन्न वाढेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

कमेन्समेंट सर्टिफिकेट देताना जी अट होती ती आपण ठरावानुसार काढून टाकली. म्हणजे तुमच्याकडे जे डेव्हलपमेंट चार्जेस आहेत ते जास्त लोक पटापट भरतील.

**मा. महापौर :-**

मग दहा कोटी?

**प्रफुल्ल पाटील :-**

दहा कसे? गेल्यावर्षी तुम्ही १३ कोटीचे टार्गेट केले होते.

**मा. महापौर :-**

ते होते पण ॲक्चुअल मंदीच्या हिशोबाने तेवढे पुट अप झाले नाही. ॲक्च्युअल वसुली ०९ करोड आहे. दहा होतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

दहा नाही जास्त होतील.

**मिलन पाटील :-**

याच्यामध्ये मंदीचे नाही. याच्यामध्ये अधिकारी लोकांचे आहे. पूर्वी जसे श्री. घेवारे साहेब होते. त्यांना अमुक एक पेपर लागायचे. आत्ता हे साहेब आले आहेत घेवारेंचे मला काही माहिती नाही. मला अजिबात माहिती नाही. मी जे सांगेन ते मग यांच्यासाठी आपण वेगळे डी.सी. रूल करायला पाहिजे आहेत का? पण खुर्चीवर मा. आयुक्त बदली झाले म्हणून कायदे कानून बदली होतात का? आत्ता .....

**मा. महापौर :-**

साहेब किती करायचे? तेरा?

**प्रफुल्ल पाटील :-**

कमीत कमी तेरा करोड पाहिजे.

**मिलन पाटील :-**

हा विषय गंभीर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

याच्यातून किती रक्कम येऊ शकेल?

**मिलन पाटील :-**

जास्त रक्कम येईल.

**मा. महापौर :-**

तेरा करू या.

**मिलन पाटील :-**

तेरा होईल.

**चंद्रकांत वैती :-**

पण ऑडीटर साहेबांना नेमके विचारून घ्या की, याच्यात किती फिगर आली आहे? तुम्ही काहीतरी आपला अंदाज सांगता.

**मा. महापौर :-**

९ करोड २३ लाख.

**चंद्रकांत वैती :-**

माझ्या मते जास्त आलेली आहे. त्यांनी सांगावे.

**दादासाहेब पाटील (मुख्य लेखा परिक्षक) :-**

सन्मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो १८ फेब्रुवारी पर्यंत ०९ कोटी २५ लाख इमारत परवाना प्रित्यर्थ मिळालेले आहेत. आणि सन्मा. विरोधी पक्ष नेत्यांनी त्या दिवशी जे विचारले होते, त्याचीपण मी थोडक्यात माहिती देतो. आपल्या बजेटच्या विषयी माहिती देतो. प्रॉपर्टी टॅक्सचे आपल्याकडे जे प्रपोझल आले होते निलेर्खित करायचे जे टोटल विषय आले होतो ते २ कोटी १५ लाखाचे आलेले आहेत. त्याची आम्ही तपासणी करत आहोत. तपासणी करताना त्यात आम्हाला बऱ्याचशा वेगवेगळ्या गोष्टी आढळलेल्या आहेत. आणि आमच्या सगळा स्टाफपण उपकर आणि ऑक्ट्रॉयला असल्यामुळे ते प्रॉपरली करता आलेल नाही. दोन-तीन महिन्यामध्ये आम्ही ते ०२ कोटी १५ लाखाचे करत आहोत.ॅ

**मा. महापौर :-**

आत्तापर्यंत वसुली किती?

**दादासाहेब पाटील (मुख्य लेखा परिक्षक) :-**

९ कोटी १५ लाख.

**मा. महापौर :-**

त्यांचे म्हणणे आहे की, ०२ करोड २५ लाख काहीतरी थकबाकी आहे. त्यासाठी जे रिकव्हरी करतात.

**दादासाहेब पाटील (मुख्य लेखा परिक्षक) :-**

१८ फेब्रुवारी पर्यंत ०९ कोटी १५ लाख आलेले आहेत.

**मा. महापौर :-**

१३ कोटी?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, किती करायचे?

**मिलन पाटील :-**

विकासकांचे हस्तांतरणाच्या बाबतीत जे पैसे आणले आहेत. आत्ता समजा आपल्याला इस्टेट इन्व्हेस्टमेंटचा स्टे आहे. हस्तांतर होते का? तुम्ही ॲफीडेव्हीट घ्या की, हस्तांतरण झाल्यानंतर तुम्ही ही प्रॉपर्टी महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून दयायची. ते होईपर्यंत तुम्ही कुठल्याही गोष्टी अडवून ठेवाल. म्हणजे एखादया विकासकाने पैसे भरले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

श्री. मिलन पाटील साहेब, तो ठराव झालेला आहे. तो ठराव मा. आयुक्त साहेबांकडे पुट-अप होईल. मा. आयुक्त साहेब त्याच्यावर निर्णय घेतील. मा. आयुक्तसाहेब जो निर्णय घेतील तो विभागप्रमुख अंमलबजावणी करतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, टीडीआर चे काय?

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, या शहरामध्ये टीडीआर बद्दल आपलीच चर्चा जास्त आहे. सगळ्यात मोठे टीडीआर चे किंग आपण आहात असे शहर बोलते. आणि आपण टीडीआर गाळता? हे बरोबर नाही. तुमचे पळकुटे धोरण झाले. टीडीआर चा फार मोठा घोळ निघणार आहे. ते आपण करू. पण तुम्ही एवढ्यात पळता कशाला?

**मा. महापौर :-**

माझी आपल्याला शुभेच्छा आहे. आय एम वीथ यु. बोला किती? दहा करोड, पंधरा करोड?

**जयंत पाटील :-**

या बाबतीत आपला अनुभव दांडगा आहे. आपण सांगाल ती फिगर टाकतो.

**मा. महापौर :-**

याच्यामध्ये आपण जे ठरावसुध्दा केलेला आहे तो लोडींगचा केलेला आहे. आणि टीडीआर मध्ये जोपर्यंत फेरफार होणार नाही. तो पर्यंत आपल्याला तो टीडीआर देता येणार नाही आणि उत्पन्न येणार नाही.

**चंद्रकांत वैती :-**

याच्यामध्ये श्री. खतगांवकर साहेब आपण, आणि एटीपी ची जी तज्ञ मंडळी असतील त्यांनी कृपया, अतिशय गंभीर विषय आहे. टीडीआर साठी जास्त वेळ गेला तरी आपण तयारी ठेवावी. आणि खुलासे वार सांगावे. कारण कधी नव्हे ते पहिल्यांदा या शहरात मोठ्या प्रमाणात टीडीआर काढला गेला. आणि मी जाहिरपणे सांगितले की, मा. महापौर साहेबांचे त्याच्यात जास्त मोठ्या प्रमाणात नाव आले. परंतु आपण प्रत्यक्ष

बघतो. तर आपल्याला जी अपेक्षा होती. आपण पाच करोड रूपयांची प्रोव्हीजन केली होती. परंतू तेवढी रक्कम दिसत नाही. तर रक्कम न दिसण्याचे कारण काय? टीडीआर खरोखर घेतला आहे, बनवला आहे हे हवेत आहे की, प्रत्यक्ष आहे? किती टीडीआर घेतला त्याचाही खुलासा करा. भले बजेटची सभा असेल, पण ही माझी मागणी आहे. या सभागृहात प्रत्येकाला क्युरोसीटी आहे. या शहरात सगळ्यांना क्युरोसीटी आहे. किती टीडीआर गेला आहे, ते ही सांगावे आणि त्याच्यापोटी किती आला आहे ते ही सांगावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

साहेब, आज तारखेपर्यंत टीडीआर च्या माध्यमातून ८३ लाख रूपये वसुल झालेले आहे. आणि सध्या प्रशासनाकडे फक्त २०० मीटरचा एक टीडीआर चा प्रस्ताव पेंडींग आहे ही प्रशासनाची वस्तुस्थिती आहे.

**शशिकांत भोईर :-**

महापालिकेने किती लोकांना दिला त्याचा खुलासा करावा.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब, खुलासेवार माहिती येऊ द्या. कुठेही पळापळ नको. आपण अजून एक दिवस मा. महासभा काढू. पण टीडीआर खुलासेवार पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

श्री. लोंढे साहेब, त्याची यादी मागवून घ्या. आज तारखेपर्यंत ८३ लाख रूपये या आर्थिक वर्षामध्ये टीडीआर च्या माध्यमातून महापालिकेला वसुल झालेले आहेत. आणि २०० स्क्वेअर मीटरचे फक्त एक प्रकरण नगरचना विभागाकडे आत्ता प्रलंबित आहे. आणि ८३ लाखाची जी वसुली झालेली आहे. त्याचीसुद्धा यादी आपल्याला दिली जाईल.

**उत्तरेश्वर लोंढे (नगररचनाकार) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने मा. सभागृहाला निवेदन करतो. यावर्षी ८३ लाख ५६ हजार २८९ रूपये टीडीआर मध्ये वसुल झालेले आहेत. आणि मागील ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचा टीडीआर वसुलीमध्ये इश्यु झालेला नाही. आणि आत्ता माझ्याकडे फक्त २५० स्क्वेअर मीटरचा प्रलंबित आहे. ते ही, आपण म्हणत असाल की, मी जास्त कागदपत्र मागतो पण माझे कर्तव्य आहे ती सर्व कागदपत्र सर्व प्लॅन छाननी करणे, आपण माझ्यावर कितीही प्रेशर केले तरीही मी ते सोडणार नाही. माझी छाननी माझी कागदपत्रे हे पाहिल्याशिवाय मी ते इश्यु करणार नाही.

**चंद्रकात वैती :-**

साहेब, आपल्या कारकिर्दीत टीडीआर गेला नाही. कारण जेवढा जायचा होता तो आधी गेला आहे. तो मोठ्या प्रमाणात गेला आहे. ती किती गेला आहे. त्याची माहिती मागितली.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

ते मी मागवतो.

**मिलन पाटील :-**

आपण हा एवढ्या लाखाचा टीडीआर दिलेला आहे. तर ती जमीन आत्ता आपल्याकडे आहे का?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

आपल्याकडे मालकी हक्क महापालिकेचे नाव झाल्याशिवाय कुठल्याही प्रकारचा टीडीआर दिला जात नाही. माझ्याकडे जो पर्यंत महापालिकेने नाव लागत नाही. त्याची खात्री होत नाही. तोपर्यंत माझी पुढची सही झालेली नाही. मागचे मी सांगू शकत नाही. आपल्याला पाहिजे असेल तर आपण तपासावे.

**मिलन पाटील :-**

पण त्याच्यातील एक हस्तांतरण झालेलेच नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही सांगता की, तुमची सही झाली नाही. आम्हाला याची माहिती नको. तुमच्याकडे टीडीआर चे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत? उद्या तुमची सही झाली मग?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

माझ्याकडे आत्ता एकच प्रस्ताव प्रलंबित आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमच्याकडे वैयक्तीक नको. डिपार्टमेंटकडे किती प्रस्ताव आहेत? ते डिपार्टमेंटच्या खालच्या लोकांना, आत्ता तुम्ही नवीन आलात. खाली बरेचसे प्रोसेसमध्ये असतील. काही लोकांनी लपवून ठेवलेले असतील. तुम्ही कडक धोरण घेतल्यामुळे ते लपवून ठेवले असतील. सगळे सांगा ना.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आलात तो कालावधी किती झाला? किती महिने झाले?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

तीन महिने झाले.

**जयंत पाटील :-**

पण याचा अर्थ असा नव्हे, २००८ ते २००९ कालावधीतील माहिती तुम्ही मला दिली पाहिजे.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

देतो. ती मागवली आहे.

**जयंत पाटील :-**

एक इन्स्पेक्टर गेला म्हणून मागचा मर्डरवाला सुटत नाही. आम्हाला ही माहीती पाहिजे आणि आत्ता एकूण आरक्षणापैकी किती आरक्षणे बाकी आहेत. ज्याच्यावर टीडीआर ॲप्लीकेबल आहे?

**मिलन पाटील :-**

हे एवढे हस्तांतरण झाले आहेत की नाही? हे मुख्य आहे. हस्तांतरण होऊन त्यांनी कंपाऊंन्ड वॉल घालून टीडीआर दिल्यानंतर आपल्याकडे हस्तांतरण करायला पाहिजे. आणि भरणी करून द्यायला पाहिजे. असे आपल्याकडे किती हस्तांतरण आहेत? आपल्या ताब्यामध्ये किती आलेले आहेत? जे टीडीआर दिले आहेत. त्याच्यावर झोपड्या आहेत. ही परिस्थिती आहे.

**जयंत पाटील :-**

मग ही जबाबदारी कोणाची? झोपड्या सकट तुम्ही ही प्रॉपर्टी घेतली आहे का?

**मिलन पाटील :-**

तुम्ही टीडीआर त्याशिवाय जात नाही. त्यांनी भरणी आणि कंपाऊंन्ड वॉलचे झाल्याशिवाय़ दयायचेच नसते. त्याच्यावर झोपड्या झालेल्या आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

श्री. लोंढे साहेब एक मिनीट. सभागृहाने समजून घ्यावे की, साधारणपणे संकेत असे असतात, अपेक्षा अशी असते की, जेव्हा टीडीआर देतो तेव्हा त्या जागेला भराव करून देणे, त्याला कंम्पाऊन्ड घालणे, आणि ती जागा महापालिकेच्या नावावर हस्तांतरीत करणे. इत्यादी बाबींची पुर्ता करायचे काम, जो टीडीआर खरेदी करणारा असतो त्याची असते. खरे आहे मग असा आपल्या शहरातील फार मोठ्या प्रमाणावर टीडीआर गेलेला आहे. पण त्या जागा महापालिकेच्या नावावर झालेल्या नाहीत. जर असे झाले नसेल, श्री खतगांवकर साहेब, आपण त्याच्यावर काय कारवाई करणार? अधिकाऱ्यांवर करणार की, घेणाऱ्यावर करणार की, अधिकचा दंड वसुली करणार? आपण काय करणार? त्याच्यावर अतिक्रमणे असतील किंवा एखादी वास्तु निर्माण झाली असेल तर आपण काय करणार आहात? मा. श्री शिवमुर्ती नाईक साहेब इथे आलेले आहे आणि त्यांनी आज पुन्हा आपल्याकडे कार्यभार स्विकारलेला आहे. तर माझी चर्चा मी त्याच्यानंतर करतो. त्यांच्या स्वागताचा कार्यक्रम होऊ द्या.

**नगरसचिव :-**

मा. महापौर साहेब, सभागृहाच्या वतीने नवनिर्वाचित आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईकसाहेब यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत आहे. पदाधिकाऱ्यांना विनंती आहे की, मा. विरोधी पक्षनेते, मा. सभागृह नेते, मा. सभापती यांनी डायसवर यायचे आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये नवनिर्वाचीत आयुक्त म्हणून श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी आत्ता पदभार स्विकारला आहे. सर्व सभागृहाच्या वतीने त्यांचे स्वागत. त्यांनी आजपर्यंत मिरा भाईंदर शहरातील सर्व कामकाजाची माहिती त्यांच्याकडे आहे. त्यांनी या ठिकाणी दोन वेळा मा. आयुक्त म्हणून काम केले. एकदा सीइओ, नंतर मा. आयुक्त म्हणून काम केले, मा. उपायुक्त म्हणून काम केले. त्यांना या भाईंदर शहराची पूर्ण माहिती आहे. आत्तापर्यंतची महापालिकेचे जे काही कामकाज झाले त्या कामकाजावर सत्ताधारी, मा. विरोधी पक्षनेते आणि अधिकारीसुध्दा. सर्वच नाराज आहेत. त्यामुळे तुमच्याकडून आमच्या फार मोठ्या अपेक्षा ओहत. तुमचे सर्वांशी वैयक्तिक संबंध आहेत. या शहराच्या सर्व घरामधील तुम्हाला चांगला अनुभव आहे. त्यामुळे आपल्याकडून चांगले कामकाज होईल अशी आम्ही या ठिकाणी अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा आपले स्वागत करतो.

**नगरसचिव :-**

नवनिर्वाचित आयुक्तांचे प्रशासनाच्या वतीने मा. श्री. खतगांवकर साहेब स्वागत करत आहेत. मा. आयुक्त साहेब आपले मनोगत व्यक्त करतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त श्री. नाईक साहेब, तुम्हाला या शहराची जाणीव करून द्यायचे काही कारण नाही. आपण या सभागृहात आधी आले, आत्ता आले. आत्ता आमचे सन्मा. नगरसेवक श्री. प्रकाश दुबोले यांनी गेलेले आयुक्त किती सक्षम होते याच्यावर मी जात नाही. पण एक गोष्ट या शहराला जी श्री. जाधव साहेबांनी दिली होती. ती आपण दयावी, पावसाळ्यामध्ये मागील पाच वर्षामध्ये हे शहर बुडले होते. शहराचे लाखो, कोटयावधी रूपयांचे नुकसान झाले होते. पण यावेळी श्री. जाधव साहेबांनी ऑडीटरपासून म्हणजे खालच्या स्तराच्या सर्व म्हणजे महापालिकेची ऑक्ट्रॉय वसुली करायला गेलेले आहेत. सेस वसुल करायला अख्खे डिपार्टमेंट गेले

आहे. त्या पध्दतीने टोटल डिपार्टमेंट आणि स्वतः सर्व शहराचा दौरा करून म्हणजे ते श्री. खांबीत साहेब असोत किंवा श्री. मोरे साहेब असोत किंवा आत्ता नवीन आले आहेत ते ऑडीटर असोत. कोणालाही या सभागृहामध्ये, त्यांच्या चेंबरमध्ये बसू दिले नाही. म्हणून यावर्षी या पाण्याचा भाईंदरमध्ये कुठेही भरले नाही. ही त्यांची एक प्लस बाजू आहे. बाकी किती लोक बदलले. तरी आपल्याला एक विनंती आहे. आत्ता पुन्हा पावसाळा होत आहे. कल्वर्ट बांधायची जीआरएम बरोबर मिटींग झालेली आहे ती दोन-तीन दिवसात आपण पुन्हा लावावी. असे आपल्याला निवेदन आहे. आमच्या शुभेच्छा आहेत. आपण पहिले ही सहकार्य केले, पुन्हा ही करू. याच्यात दुमत नाही. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, तोडफोडच्या बादशहाचे आपल्या शहरात आगमन झालेले आहे. ज्याची ख्याती महाराष्ट्र शासनाकडे, पूर्ण शहरामध्ये,त्यांनी जिथे-जिथे नोकरी केलेली आहे. तिथल्या सर्व लोकांना यांची ख्याती माहिती आहे. साहेब, तुम्ही आमच्याइकडे मा. आयुक्त असताना जे रस्ता रूंदीकरण केलेल आहे. आणि आत्ता त्याच्यावर जे काही अतिक्रमण वगैरे झाले असेल. तुमच्या डोळ्यामध्ये पाणी येईल की, मी या शहराला काय दिले? या शहराचे मी काय भले केले? आणि माझ्यानंतर या शहराची दुर्दशा काय झाली? दोन-तीन वर्षाचा कालावधी, पाच वर्षानंतरचा कालावधी तुमच्यानंतर झाला. त्याच्यानंतर या शहराची एवढी दुर्दशा झाली. आमचे दुदैव की, आम्हाला चांगले मा. आयुक्त मिळाले नाहीत. मी तुमचे अभिनंदन करतो आणि आत्ता याशहराची पुढील धुरा तुम्ही सांभाळा अशी मी तुम्हाला विनंती करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**चंद्रकांत वैती :-**

मा. श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेत मी स्वागत करतो. कॉग्रेस पक्षाच्या वतीने आपले स्वागत करतो. साहेब, आपण या मिरा भाईंदरमध्ये मा. मुख्याधिकारी म्हणून मा. प्रभारी आयुक्त म्हणून, मा. उपायुक्त म्हणून काम केलेले आहे. प्रचंड अनुभव आहे. आत्ता मा. आयुक्त म्हणून आलेले आहात. आमच्या कडून आपल्याला सगळ्या प्रकारचे सहकार्य होईल. या शहरामध्ये आपल्या कार्याची आठवण प्रत्येक नागरिक देखील करत असतो. पदाधिकारी, नगरसेवक करत असतात. फक्त आपल्याला एकच गोष्ट सांगतो की, आपले सगळ्यांशी संबंध आहेत ते संबंध प्रसंगी बाजूला सारा. परंतु कर्तव्य कठोर निर्णय घ्यावेत. आपले स्वागत करून आपल्याला शुभेच्छा देतो.

**आसिफ शेख :-**

राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या वतीने आपले सर्वांचे लाडके मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेब यांचे मनःपूर्वक स्वागत करतो मा. मुख्याधिकारी, मा. उपायुक्त, प्रभारी आयुक्त आणि आत्ता पुन्हा त्यांनी मा. आयुक्त म्हणून पदभार स्विकारलेला आहे. नगरपालिका आणि महानगरपालिका प्रशासनाबाबत त्यांती पी.एच.डी. झालेली आहे. असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. या ठिकाणी विकासकामे करत असताना किंवा चालवत असताना प्रत्येकाची नस-नस त्यांना माहिती आहे. त्यामुळे त्यांची पी.एच.डी. झालेली आहे असे बोलले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांना या ठिकाणी काम करण्यासाठी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या माध्यमातून निश्चितपणे आमचे सहकार्य राहील आणि आपण या ठिकाणी चांगल्या पध्दतीने महापालिकेची वसुली, महत्वाचा विषय आहे, वसुली आणि काटकसर हे दोन महत्वाचे मुद्दे या ठिाकणी आहेत. आपण महापालिकेची वसुली जास्तीत जास्त प्रमाणात यापूर्वीपण केलेली आहे. आणि आत्ताही निश्चितपणे मोठ्या पध्दतीने होईल. आणि जी चर्चा वारंवार या शहराला बदनामीकारक ठरत आहे. अशा अनधिकृत बांधकामा संदर्भात आपण निश्चितपणे आपले आगमन झालेले आहे. आणि अनधिकृत बांधकामावर आपल्या माध्यमातून निश्चितपणे कठोर कारवाई होईल आणि महापालिकेच्या उत्पन्नात निश्चितपणे वाढ होईल आणि प्रशासनाची जी शिस्त बेशिस्त झाली होती. निश्चितपणे त्याला शिस्त आणण्यात देखील आपण यशश्वी ठराल अशा प्रकारच्या शुभेच्छा मी आपणास देतो. आपल्या भविष्यास हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद.

**मधुसूदन पुरोहित :-**

आयुक्त साहेब, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने, काल शिवरात्र होती. सर्वांनी शिवशंकराचे पुजन केलेले. आणि आज प्रत्यक्ष रूपात मिरा भाईंदर शहराला श्री. शिवमुर्ती नाईक लाभलेले आहेत. मी आपणास माझ्या पक्षाच्या वतीने नम्र निवेदन करीत आहे. कारण आपले नावपण शिव आहे. आणि काल शिवरात्री होती. त्या संदर्भाला जोडून मी हे बोलेलो आहे की, या शहराचा विकास करावा. शहराच्या लोकांच्या ज्या गरजा आहेत त्या तुमच्याकजून नक्कीच पूर्ण होतील आणि या शहराच्या प्रत्येक नागरिकांनी तुम्हाला शिवपुजन सारखे पुजावे. जर या शहराचा विकास झाला तर नक्कीच तुम्ही श्री. शिवमुर्ती नाईक म्हणून ठरणार. जसे शिवाला सर्व पुजले तसे तुम्हाला पण पुजडले पाहिजे. तुम्ही तसे काम करावे अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो. आपले या शहरात आगमन झाले त्याबद्दल माझ्या पक्षाच्या वतीने आपला हार्दिक सत्कार करीत आहे. स्वागत करीत आहे आणि आपल्याला या शहरात काम करण्यास चांगली संधी मिळावी, त्यासाठी ईश्वरचरणी मी प्रार्थना करतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांच्या वतीने आणि शिवसेना पक्षाच्या वतीने या सभागृहामध्ये तसेच या शहरामध्ये मी आपले मनापासून हार्दिक स्वागत करतो. २००२ च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी आपण मा. आयुक्त म्हणून होते. आणि जेव्हा आपला कार्यकाल होता तेव्हा आम्ही नगरसेवक, नगरसेवक म्हणून नव्हतो. गेल्या दिड-दोन वर्षामध्ये सभागृहामध्ये जेव्हा जेव्हा चर्चा झाल्या तेव्हा एक चांगला अधिकारी कसे काम करतो याचा दाखला आपले नाव घेऊन देण्यात आला. म्हणजे एखादा अधिकारी सभागृहात उपस्थित नसताना त्याच्या कार्याचा उल्लेख या सभागृहात होतो. त्याचे दाखले दिले जातात. ही आज तुमच्या कार्याची पोचपावती आहे. मनात एक थोडीशी भिती आहे. श्री. जाधव साहेबांनी गेल्यावेळी बजेटच्याच वेळी कार्यभार हातामध्ये घेतला होता. परंतु आपला कार्यभार आपण पूर्ण करावा अशा शुभेच्छा मी पुन्हा एकदा देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**प्रफुल्ल पाटील :-**

श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, या शहरामध्ये प्रथमतः आपण मा. मुख्याधिकारी म्हणून आलात. मा. उपायुक्त म्हणून आलात. आणि त्यानंतर तुम्ही मा. आयुक्त म्हणून आलात. पुन्हा तुम्ही मा. आयुक्त म्हणून आलात. आपण जेव्हा जेव्हा आलात. तेव्हा तेव्हा आपण या शहराला एक बदलते रूप दिलेले आहे. आपण केलेली सर्व कामे एक अविस्मरणीय घटना म्हणून राहिलेली आहेत. मधल्या काळात आपण नव्हता. आम्हाला पण थोडासा विसर पडलेला होता. विसर पडण्यापेक्षा आपली उणीव भासायला लागलेली. कारण आपल्या कामाची पध्दत इतरांपेक्षा वेगळी आहे. आपण चांगली आहे, वाईट आहे म्हणण्यापेक्षा चांगली तर आहेच पण ती इतरांपेक्षा वेगळी आहे. त्याच्यामुळे आपल्याकडून जनतेच्या खूप अपेक्षा आहेत. आपण आत्तापर्यंत जे काही केले ते फारच आहे. जास्त आहे. पण या शहराच्या अपेक्षा जास्त वाढलेल्या आहेत. आणि म्हणून या शहराच्या वाढलेल्या अपेक्षा आपण पूर्ण कराल अशी मला पक्की खात्री आहे. कारण मी तुमच्या सोबत काम केलेले आहे. तुमच्या सोबत काम करण्याचा मला चांगला अनुभव आहे. या ठिकाणी मी एक गझल बोलतो. बरसात की भीगी रातो मे, फीर कोई सुहनी याद आयी। कुछ अपना जमाना याद आया, कुछ उनका जमाना याद आया, हम भूल चुके थे जिसने हमे दुनिया मे अकेला छोड दिया, जब गौर किया तो एक सुरत जानी पहचानी याद आयी, कुछ अपना जमाना याद आया, कुछ उनका जमाना याद आया। कलियो की तरह जो चिपकी थी उन गुलशन गुलशन होठो पर सो बैठे बिठाये आज हमे वह बात पुरानी याद आयी। कुछ पॉव के छाले, कुछ आसू, कुछ तनहाई, कुछ घर के सफर, उन बिगडे हमराही की एक-एक निशानी याद आयी। कुछ उनका जमाना याद आया, कुछ अपना जमाना याद आया. धन्यवाद.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. श्री. शिवमूर्ती नाईक साहेब, मी बसपाची नगरसेविका आहे. आज मिरा भाईंदरमध्ये खरोखरच आनंदाचा दिवस आहे. आणि सर्व कर्मचाऱ्यांना शिपायांपासून जे नाले सफाईला कर्मचारी आहेत. त्यांनी तर कधी श्री. जाधव साहेबांना बघितले देखील नव्हते. आणि त्यांच्या कानावर गेले की, श्री. शिवमूर्ती नाईक साहेब आले. तर ते खरोखरच टाळ्या वाजवू लागले. आणि मिरा भाईंदरला असे झाले की, श्री. शिवमुर्ती नाईक नाहीत तर मालक आले श्री. नाईक साहेब, तुमच्या कारकिर्दीचे जे काम होते. तुम्ही होते त्याच्यानंतर श्री. आर.डी.शिंदे साहेब आले. त्यांच्या नंतर श्री. गायकवाड साहेब आले. त्याच्यानंतर श्री. जाधव साहेब आले. आणि आत्ता पुन्हा तुम्ही आले. परंतु, खरोखरच साहेब तुम्ही जायच्या अगोदर जे काम बाकी होते ते तसेच राहिलेले आाहे. कारण या इमारतीच्या खाली जे कातकरी समाजाचे लोक राहायचे. त्यांचे देखील काम तसेच राहिले आहे. शिवाय माझ्याकडचा ब्रीज, ज्यावेळी १९७२ मी जन्माला आली. त्यावर्षी तो ब्रीज बनलेला आहे. तो आत्ता मोडायला आला. पण साहेब, मी माझी अशी अपेक्षा आहे की, तुमच्या कारकिर्दीमध्ये ते काम होऊन जाईल. आणि माझ्या पक्षातर्फे मी तुमचे स्वागत करते.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, आपल्याबद्दल बरेच ऐकले होते. आपल्या कार्यपध्दतीची जाणीव मला जवळून झाली होती. मला वाटते मिरा भाईंदर शहराची नाळ वेगळ्या अर्थाने आपल्याशी जोडलेली आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये जो महत्वाकांक्षी प्रोजेक्ट होता, छत्रपती शिवाजी मार्ग, तो आपल्या कारकिर्दीत झाला. फ्लायओव्हर ब्रिजचे काम आपल्या कारकिर्दीत झाले. आणि दुग्धशर्करा हा जो व्यवसाय आहे. ती ५६० करोडची जेएनएनयूआरएम ची योजना आहे. ती सुध्दा आपल्या कारिर्दीतच पूर्ण होणार आहे. या सभागृहामध्ये प्रथमच निवडून आलेले सर्व सदस्य, त्या सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने मी पुन्हा एकदा आपले हार्दिक अभिनंदन करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. श्री. नाईक साहेब, आपले या शहरावर प्रेम आहे. आणि या शहराचे सुध्दा आपल्यावर प्रेम आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या कारकिर्दीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जे काम केले ते काम वाखाणण्यासारखे आहे. भरपूर आयुक्त येऊन गेले. पण तुमच्यासारखा ठसा कोणी उमटवला नाही, मध्यंतरी श्री. जाधव साहेब आले. त्यांनी प्रयत्न केला आणि त्यांनी

काम चांगलेही केले. आत्ता एक सन्मा. सदस्य बोले की, त्यांनी मिरा भाईंदर शहरामध्ये जे नालेसफाईचे काम केले ते अतिशय चांगले काम केले. म्हणजे संपूर्ण मिरा भाईंदर महानगरपालिका त्यांनी रस्त्यावर उतरवली आणि त्यांनी संपूर्ण मिरा भाईंदर शहरातील नाले साफ केले. आणि एकही पाण्याचा थेंब या शहरामध्ये साचला नाही. तर मा. आयुक्त साहेब, त्यांच्याकडून आम्हाला काही अपेक्षा होत्या. ते आम्हाला अर्धवट सोडून गेले. आपण आलात. श्री. नाईक साहेब, आपण कुठेही गेलात पण आपले लक्ष मिरा भाईंदरवर होते. घार उडते आकाशी, पण तिचे लक्ष पिलापाशी, त्याप्रमाणे आपले संपूर्ण लक्ष मिरा भाईंदरमध्ये होते. मिरा भाईंदरमध्ये जे जुने नगरसेवक आहेत त्यांच्या घरी कुठले फंक्शन असेल, लग्न असेल तर तुमची तिकडे १०० टक्के उपस्थिती असणार. इकडचे करन्ट मा. आयुक्त तिकडे नसतील पण तुम्ही तिकडे १०० टक्के असणार एवढे तुमचे प्रस्थ या मिरा भाईदंर शहामध्ये होते. तुमचे रिलेशन चांगले होते. आणि आत्ता आमची तुम्हाला एकच अपेक्षा आहे की, तुम्ही निवृत्त होईपर्यंत या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त म्हणून राहा. आणि एक वेगळाच ठसा उमटवा. की, जेणेकरून संपूर्ण मिरा भाईंदर शहर पुन्हा तुमची आठवण करेल. आणि जाता जाता फक्त एक शायरी म्हणतो, कल तक जो तन के चलते थे, आज वो झुक कर सलाम करते है। हैरत नही है इन अजी जो पर, यह वक्त को सलाम करते है। धन्यवाद.

**वंदना पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी भिवंडीला तुमचे खूप नाव ऐकलेले होते आणि या मा. महासभेत पण मी तुमचे एवढे नाव ऐकले की, माझी कॉलर एकदम ताठ झाली की, एखादा माहेरचा माणूस जेव्हा येतो आणि त्याच्याबद्दल एवढे लोक असे बोलत असतात तेव्हा खरेच त्या मुलीची कॉलर ताठ होते. अशीच तुमची कॉलर ताठ राहू दया. एवढीच माझी विनंती आहे.

**सुनिता भोईर :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलते. मा. आयुक्त साहेब, कॉग्रेस पक्षातर्फे आणि जोडी नं. १ तर्फे आपले हार्दिक स्वागत आहे.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, श्री. शिवमूर्ती नाईक साहेब, मालक शब्द हे मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ओळखले जाणारे श्री. शिवमूर्ती नाईक साहेब आज परत, मालक असे सगळे लोक म्हणतात आणि गोरगरीबांचा नेहमी म्हणजे आत्ता श्रीम. नयनाताईंनी सांगितले की, सफाई कामगार जे आहे. त्याच्यामध्ये आपली चांगली ओहख आहे. आपण जास्त मदत करत राहता. असे आमचे श्री. शिवमुर्ती नाईक यांना आमच्या संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे हार्दिक अभिनंदन करतो आणि त्यांच्याबरोबर सहकार्याची अपेक्षा करून माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**आसिफ शेख :-**

सर्व पक्षांच्या वतीने या ठिकाणी मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक यांचे स्वागत झालेले आहे. सत्कार झालेला आहे. पत्रकारांची पण अशी सुचना आहे आणि मी पण एक पत्रकार होतो, त्यामुळे पत्रकारांच्या वतीनेदेखील या ठिकाणी आपले मनःपूर्वक स्वागत. धन्यवाद.

**नगरसचिव :-**

मा. आयुक्त साहेब आपले मनोगत व्यक्त करीत आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर, सर्व सन्मा. सभासद बंधू आणि भगिनी, आत्तापर्यंत या महापालिकेमध्ये मी मुख्याधिकारी, प्रभारी आयुक्त, आणि उपायुक्त म्हणून जे काम केले होते. मग ते ओव्हरब्रीज असेल, काशिमिरा रोड, पाणी पुरवठा असेल, ऑफीसपासून स्टेशनपर्यंतचा रोड असेल, ती सर्व कामे करत असताना माझी काही अपूरी इच्छा राहिलेली होती आणि भिवंडीकरांचे, माझ्या सर्व सभासदांचे मा. महापौरांचे आणि भिवंडीकर नागरिकांनी माझ्यावर जे प्रेम केले, त्या प्रेमाला भाळून मला नाशिकलासुद्धा मागत होते. परंतु जे प्रेम तुम्ही मला दिले त्या प्रेमाखातर जे जे काऊन्सीलर मला लग्नामध्ये भेटले, मंत्रालयात भेटले किंवा इतर कार्यक्रमामध्ये भेटले, ते ते तुम्ही यायलाच पाहिजे. जे प्रेम माझ्यावर दाखवले. त्या प्रेमापोटी या गावाचे अपूर्ण राहिलेले काम मी पूर्ण करेन आणि नागरिक तुम्हाला डोक्यावर घेवून नाचतील अशा पध्दतीचे काम होईल आणि पुढे नागरीकांना हे काम राहिले ते अशी मागणीसुध्दा करायला येणार नाही. तुमचे असेच प्रेम, सहकार्य, मा. महापौर साहेब आणि सर्व सन्मा. सभासदांचे, विकासाच्या कामासाठी सर्वांनी एकीने काम करून या शहराची भरभराट करण्याठी मला सहकार्य करावे अशी नम्रतेची विनंती करतो आणि या दोन वर्षे दोन महिन्यात आपण जी साथ द्याल. तेच काम शेवटपर्यंत शिल्लक राहिल आणि माझ्या माहितीप्रमाणे सर्वांनी जर एकजुटीने काम केले. प्रशासन आणि बॉडी हे एकत्र येऊन जर एकजुटीने काम केले तर कुठलेही काम अवघड नाही. आपण सर्व काम पूर्ण करू आणि नागरिकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्याची पुर्ता करण्याचा आटोकाट प्रयत्न करू. तुम्ही आम्हाला साथ द्यावी अशी नम्रतेची विनंती करून माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**मा. महापौर :-**

टीडीआर बद्दल बोला.

**चंद्रकांत वैती :-**

आपण टीडीआर किंग आहात. मा. महापौर महोदय, मा. आयुक्त साहेब, मला वाटते श्री. जगताप साहेबांना मी वर येताना पाहिले. टीडीआर ची माहिती उपलब्ध झालेली दिसते. माहिती उपलब्ध झाली असेल तर ती सभागृहासमोर दया. श्री. नाईक साहेब, आपण योगायोगाने आलेले आहात. प्रश्न असा होता की, आमच्याकडे मागच्या अर्थसंकल्पात आम्ही तरतुद केली होती आणि आम्हाला अपेक्षा होती की, मागच्या अर्थसंकल्पामध्ये आम्हाला टीडीआर च्या माध्यामातून पाच करोड रूपये येतील अशी अपेक्षा होती. परंतु ७१ लाख ८९ हजार. एवढीच वसुली झालेली आहे. मात्र त्या तुलनेमध्ये मोठ्या प्रमाणावर जास्तीचा टीडीआर दिलेला आहे. आणि मी सभागृहाला सांगितले की, ते मा. महापौर साहेबांनी घेतलेला आहे. तर आपल्या अधिकाऱ्यांकडे ती माहिती मागितली होती, पण अधिकाऱ्यांनी, श्री. लोंढे साहेब नवीन आहेत. तीन महिन्यापासून कामकाम पाहात आहेत. त्या तीन महिन्यात त्यांच्याकडून कुठच्याही प्रकारचा टीडीआर गेलेला नाही. श्री. जगताप साहेबांना एक कागद घेऊन येताना मी पाहिले. त्याच्यामुळे मला अशी खात्री आहे की, त्यांनी टीडीआर ची माहिती आणली असावी. साधारणपणे संकेत असे असतात की, ज्याला टीडीआर देतो त्या वेळेला आपण ती जागा महापालिकेच्या नावावर करून घेतो. त्या जागेला वॉल कंम्पाऊन्ड घालून घेतो. आणि त्याच्यात भराव देखील करून घेतो ही माहिती आपल्याला सभागृहाला सांगायची आहे. आणि मा. महापौर साहेबांनी, मोठे मन दाखवले आणि सांगितले की, याच्यावर सभागृहाला वेळही देतो. भले बजेटची सभा असेल पण ते आम्हाला माहिती देतील. तर श्री. लोंढे साहेबांनी त्या संदर्भात, किंवा आपण ज्याला नॉमीनेट कराल त्यांनी ती माहिती दिली तरी चालेल की, आपण किती टीडीआर दिलेला आहे?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, आत्तापर्यंत मी जिथे जिथे नोकरी केली तिथे तिथे कर्मचाऱ्यांना उत्तर दयायला लावले नाही. परंतु आत्ताच मी येऊन बसलेलो आहे. ह्या एका मिटींगपुरते स्टाफ उत्तर देईल. या पुढच्या मिटींगपासून मी उत्तर दयायला सुरू करेन.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

मा. पिठासीन अधिकारी, मा. आयुक्त, मा. सभागृहाला मी टीडीआर बाबत निवेदन करतो. आत्तापर्यंत या मिरा भाईंदर महापालिकेला टीडीआर लागू झालेला आहे. तेव्हापर्यंत जवळ जवळ ४० लाख चौरस मीटर क्षेत्राचा टीडीआर दिलेला आहे.

**अनिल सावंत :-**

चाळीस लाख कधी या वर्षामध्ये दिला आहे.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

मी आत्तापर्यंत सांगितला. ३ लाख ८१ हजार ३८६ चौरस मीटर ३८६.९५ चौरस मीटर.

**मा. महापौर :-**

म्हणजे ॲप्रॉक्सीमॅाली ४० लाख स्क्वेअर फीट.

**अनिल सावंत :-**

त्यातील सर्व तुम्ही घेतले की काय?

**मा. महापौर :-**

याची साधारण मार्केट प्राईज ४० करोड आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सगळ्या फीगर व्यवस्थित परत दुरूसल्त करून सांगा.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

साहेब, बरोबर आहे. ३,८१,३८६.९५ चौरस मीटर, महापालिकेला टीडीआर लागू झाल्यापासूनचे हे आहे.

**एस.ए. खान :-**

साहेब, हे कोणत्या पिरीएडचे आहे?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

साहेब, आरक्षणाचे असे आहे की, एखादा सेंटरली पार्ट आरक्षणाचा आपल्याकडे टीडीआर मागितला जातो. त्या ठिकाणी आपण माती भराव, कुंपण भिंत, लेव्हलिंगचे जे पैसे आहेत ते भरून घेतो. नाहीतर सेंट्रली प्लेस जागेचे कंम्पाऊंड करून करू शकत नाही. किंवा त्या जागेपुरते होते. म्हणून आपण आपल्याकडे तो पैसा भरून घेतो. आणि आपण करावे किंवा प्रत्येक जागा एकदमच अशी येत नाही. एकाच आरक्षणामध्ये बरेच सर्वे नंबर असतात. मालक वेगळे असतात किंवा एखादे त्याच्याच शेजारचे कोर्ट लिटीगेशन असते. तर तो आपल्याकडे देऊ शकत नाही. पण आपल्याकडे जेवढ्या जागांचे प्रस्ताव आलेले आहेत. त्याप्रमाणे आपण त्याच्याकडून ती रक्कम भरून घेतो. यावर्षी जवळ जवळ ८३ लाख रूपये टीडीआर मध्ये माती भरावाचे मिळालेले आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

आपल्याला त्यांच्याकडून माती भरावाचे पैसे घ्यायची गरज नाही. आपल्याला त्यांच्यासाठी आकारावयाची फी घ्यायची आहे. त्या लष्कराच्या भाकऱ्या थापण्याचे काम आपण करायचे नाही. ज्याने टीडीआर घेतला आहे त्याने कंम्पाऊन्ड घालून दयायचा, त्याने माती भराव करून दयायचा. आपल्या स्पेसीफीक फॉरमॅटमध्ये काम करून दयायचा. आणि उतारा महापालिकेच्या नावावर करून दयायचा. उतारा महापालिकेच्या नावार होत नाही तोपर्यंत टीडीआर देऊ नये. मग आत्ता आपण साधारणपणे ४० लाख स्क्वेअर फीट टीडीआर दिलेला आहे. तर यातील किती उतारे महापालिकेच्या जागेवर झाले नसतील तर ज्याच्याकडून झाले किंवा ज्याला दिले त्याच्याकडून आपण ती जागा परत घेणार की, ज्याने काम केले आहे त्याच्यावर कार्यवाही करणार ते आपल्याला निश्चित करावे लागेल त्या जागा आपल्या ताब्यात आहेत. आपल्या नावावर उतारे आहेत. श्री. जगताप साहेब, आपल्याला जे काही ऑथेंटीक उत्तर दयायचे आहे. माहितीच्या अधिकारात माझी सगळी माहिती प्रलंबित आहे. आपल्याला हा सूर्य हा जयद्रथ अशी माहीती दयावी लागेल. मला ब्लॅक ॲन्ड व्हाईट माहिती मिळेल. वारंवार या महापालिकेच्या माध्यमातून सर्व लोकप्रतिनिधींना माहिती मागतात तेव्हा अशीच थातूरमातूर उत्तरे मिळतात. माहितीच्या अधिकारात ती माहिती घेऊन वारंवार सगळ्या गोष्टी कन्सर्न डिपार्टमेंटकडे, शासनाकडे किंवा कोर्टाकडे जाव्या लागतात. तर कदाचित ह्याही गोष्टी तशा जातील. त्याच्यामुळे आजचे आपले जे काही बोलणे असेल ते ऑथेन्टीक मानून तीच माहितीच्या अधिकारात माहिती मिळेल असे समजून घेणार. त्याच्यामुळे जे असेल ते स्पष्ट सांगा.

**भरत जगताप :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. सातबारा नावावर झाल्यावर टीडीआर दिलेला आहे.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, सातबारा नावावर झाला हे बरोबर आहे. पण त्या नियमामध्ये जे सांगितले की, माती भराव, कंम्पाऊन्ड वॉल वगैरे सर्व करून दयायला पाहिजे. तसे आपल्याला जागा दिली का? की, जसा खड्डा जागा आहे तशीच दिलेली आहे आणि आपण तशी घेतलेली आहे. फक्त उतारा नावावर चढला.

**मा. महापौर :-**

मी आपल्याला आठवण करून देतो. श्री. जयंत पाटील साहेबांनी एकदा जो मातीचा मुद्दा उचला होता. त्यावेळेला श्री. वैती साहेब उपमहापौर होते आणि सौ. निर्मला सावळे मॅडम महापौर होत्या. त्यावेळी असे झालेली की, कुंपणभिंत आणि भरावाचे जे पैसे आपण घेतो त्या महापालिकेचाच फायदा आहे. कारण एखादे दहा एकरचे आरक्षण असेल आणि ज्यावेळी माणूस दहा-दहा गुंठे जमीन देतो. ती चाळीस वेळा मधली भिंत बांधून परत आपण तोडायची. त्यापेक्षा आपण ते पैसे घेतले तर उत्पन्नाची बाब होईल. आणि ते असताना तो निर्णय झालेला. मला चांगली आठवण आहे.

**चंद्रकांत वैती :-**

तसा निर्णय झाला नाही. ही चर्चा झाली होती. हा निर्णय होत नाही.

**मा. महापौर :-**

चर्चा नाही. त्या हिशोबाने निर्णय झाला होता.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, त्या स्पेसीफीक कामासाठी स्पेसीफीक नियमच असा आहे की, त्या जागेला कंम्पाऊन्डच घालून दयायचे. कोणी बाजूची पाच-पाच गुंठे जागा सोडणार असे होत नाही. भिंत तुटली तर महापालिका स्वतःच्या खर्चाने बांधून घेईल. पण ती भिंत त्या विकासकाने, ज्याने टीडीआर घेतला आहे त्यानेच दयायची असते. त्याच्यामध्ये असा काही कायदा वगैरे झालेला नाही. कायदा असाच आहे.

**मा. महापौर :-**

त्यावेळी हा ही विषय झालेला की, आपला डी.पी. आत्ता लॅप्स, व्हायला आलेला आहे. आणि एखादा वीस गुंठ्याचे कुठे आरक्षण असेल आणि एखादा व्यक्ती जर आपल्याला टीडीआर दयायला आला. तिकडे जायला पोच रस्ता नाही म्हणून आपण आरक्षण हस्तांतर करून घ्यायचे नाही का? उद्या ते लॅप्स झाले तर कन्वर्ट होईल. आणि आपला डी.पी.ची मुदत पुर्ण होत आली आहे. एखाद्याने ॲक्वीझीशन करून पैशांची मागणी केली. तोही मुद्दा उपस्थित झाला होता. आणि आजही तो विषय असेल तर ती रितसर विषय आणतो. महासभेने अंतिम निर्णय घ्यावा की, त्याच्यामध्ये काय करायचे?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ते नाही. आत्ता जे टीडीआर आपल्याला हस्तांतरण झालेले आहेत. महापालिकेची त्याच्यावर मालकी आहे. आणि तिथे झोपड्या झालेल्या आहेत. मग तुम्ही त्याचे काय करणार? श्री. जगताप साहेब, त्या टीडीआर घेतलेल्या जागेवर झोपड्या झालेल्या आहेत त्याची तुमच्याकडे काही माहिती आहे का? तुमचे हस्तांतरण झालेले आहे. परंतु त्या जागेवर झोपड्या झालेल्या आहेत. मग आत्ता तुम्ही काय करणार?

**चंद्रकांत वैती :-**

त्या जागेवर आधीपासून झोपड्या होत्या. त्याचा टीडीआर दिला आहे. मग प्रकरणा गंभीर होणार.

**मिलन पाटील :-**

ही अशीपण प्रकरणे त्यात आहेत. काही नाही तर तुमचे तुम्ही बघा. झोपड्यावाल्यांचे बघा. महापालिका काय करायचे आहे ते बघेल. आम्ही तुमच्या नावावर करून दिले आहे. टिडीआर घेतलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

टिडीआर संबंधी आपण ज्या शंका उपस्थित केलेल्या आहेत. त्या जागा, भरलेली रक्कम आणि इन्क्रोचमेंट झाले की नाही, सातबारा झाले की नाही ही संपूर्ण माहिती घेऊन पुढच्या मिटींगमध्ये सविस्तररित्या दिले जाईल.

**मा. महापौर :-**

अमाउन्ट वाढवायची की, कमी करायची?

**चंद्रकांत वैती :-**

त्याच्यात किती टीडीआर बाकी आहे याची प्रत्यक्ष माहिती तुम्हाला जास्त असणार. एटीपी जास्त असणार. त्यांनी सांगावे की, एवढे बाकी आहे. एवढे करता येण्यासारखे आहे. आमचा त्याच्यात तेवढा अभ्यास नाही. तुम्हीच सांगायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आत्ता टीडीआर चा विषय निघाला. श्री. वैती साहेबांनी माहितीच्या अधिकाराचा उल्लेख केला. आणि आपले श्री. उत्तरेश्वर लोंढे साहेब, जे स्वतःच्या केबीनमध्ये वाघ असतात. आणि इकडे सभागृहामध्ये त्यांचे तोंड बंद झालेले आहे. श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, एक उदाहरण देतो. मी एका पर्टीक्युलर क्षेत्राच्या टीडीआर बद्दल एक पत्र दिले होते. या टीडीआर ची किती टीडीआर दिली गेली? सध्या या टीडीआर ची पोझीशन काय आहे? या महाशयांनी मला उत्तर जसे अन्य अधिकारी बहुतेक त्यांनी त्यांना पाटी पढवून दिली तसे उत्तर दया म्हणजे श्री. गारेडिया साहेब गप्प होणार. त्यांनी मला उत्तर दिले की, एवढेच चौरस मीटर टीडीआर दिले गेलेले आहे. आम्ही जेव्हा टीडीआर दिले त्यावेळी ती जागा खुली होती. आत्ता त्या जागेवर अतिक्रमण झाले आहे किंवा बांधकाम झाले आहे ती माहीती अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमणकडून घ्यावी. माझा मुद्दा असा आहे की, त्यांनी जेव्हा टीडीआर दिला. मी त्यांना सध्याची स्थिती विचारली तेव्हा त्यांनी त्या कॉलममध्ये सांगितले पाहिजे होते. आम्ही जेव्हा टीडीआर दिला तेव्हा या एवढ्या क्षेत्रफळाची कुंपणभिंत टाकून घेतलेली आहे. तो रिकामी आहे. म्हणजे उत्तर कसे देतात? मी अजून सोडले नाही. म्हणून साहेब, हा पण एक मुद्दा आहे. त्यांच्याकडून सर्व माहिती या सभागृहात आणताना टीडीआर देताना किती आरक्षणामध्ये कुंपणभिंत घालून घेतल्या होत्या? किती खुल्या होत्या? ते पण यांच्याकडून घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, पुढच्या मिटींगला ज्यावेळी तुम्ही टीडीआर विषयी माहिती दयाल. ते स्टँडींगच्या दोन तीन मिटींगमध्ये करोडो रूपये आपण आरक्षणाच्या कुंपणभिंत आणि माती भराव याच्यासाठी खर्च टाकलेले आहेत. त्याचीसुद्धा पूर्ण माहिती दया आणि ही ४० लाख चौरस मीटर जागा आपल्या ताब्यात आहे की नाही? फक्त नावावर असून फायदा नाही. प्रत्यक्ष ताब्यात आहे की नाही? आणि गेल्या २००८-०९ मध्ये कोणाकोणाला किती टीडीआर दिला आहे. त्याचीपण जरा माहिती दया.

**मा. महापौर :-**

अमाऊन्टबद्दल काय करायचे आहे ते बोला.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, प्रथम श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांचे अभिनंदन करते, स्वागत करते. आणि मा. महापौर साहेब आणि मा. आयुक्त साहेबांना सुरूवातीलाच पहिल्या दिवशी ज्या टीडीआर ची सुचना आलेली आहे. जो विषय आलेला आहे. मी तर दोनच शब्द बोलणार. या टिडीआर घोटयाळ्याचा किंग कोण आहे त्याचा खुलासा नवनीत, आपण जुने आहात आम्ही नवीन आहोत. श्री. नाईक साहेब, आमचे पहिलेच वर्ष आहे. आपण इथे तीनदा येवून गेलात असे आम्हाला कळले. आम्ही पेपरमध्ये वाचत होतो. आनंदाची गोष्ट आहे. परंतु, मला म्हणायचे आहे की, टीडीआर चा घोटाळा करणारे कोण? इथून गेले. ते आहेत. श्री. घेवारे. ते जरी गेले असतील तरी त्यांच्यावर कोण होते त्यांची चौकशी करावी ही या ठिकाणी मी आपल्याला सुचना करते. असे नाही की, आम्ही आत्ता मांग केली आणि लोकसभेचे इलेक्शन आत्ता लागणार आहे. पुढची मा. महासभा होणार की नाही हे सांगता येत नाही. माझी आपल्याला एक विनंती आहे की, लवकरात लवकर मिटींग लावून त्या टीडीआर घोटाळ्याचे मालीक कोण आहेत? कोणी एवढा घोटाळा केला? मी तर नाव घेतले. नंबर वनाला श्री. घेवारे इथून गेले. वारे घेत गेले. तिकडे कुठेतरी चांगल्या ठिकाणी आहेत. आमच्या राष्ट्रवादीच्या श्रीम. विमलाताई मुंदडा मंत्रालयात आहेत. त्यांच्याकडे ते आहेत. तर त्यांच्याबरोबर त्याचे कोण किंग आहेत ते आपण शोधून काढावे. आणि जर वेळ आली तर पुढच्या सभेमध्ये जेव्हा मी येईन, समजा खासदारांचे इलेक्शन झाल्यानंतर, किंवा त्याच्यामध्ये मिटींग बोलवून आपण याची पुर्ण चौकशी करून त्याच्यावर अंमलबजावणी करावी अशी मागणी करते.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, ३ लाख ८१ हजार १८६ चौरस मीटर टीडीआर आत्तापर्यंत दिलेला आहे. आपल्या नियमानुसार आपण पैसे घ्यायचे ठरवले होते. श्री. वैती साहेब बोलतात की, बांधकाम करून दयायला पाहिजे होते. ठिक आहे, बांधकाम केलेले नाही. आत्तापर्यंत आपल्याकडे दिड करोड रू. चे आलेले आहेत. आपण साधारण २००७-०८, ७१ लाख आणि आत्ता किती आले ते मला माहिती नाही. इकडे ७० दिसतात. आणि त्याच्या अगोदर २००५-०६, आणिइ २००६-०७ ला काहीच आलेले नाही. म्हणजे आत्ता या संपूर्ण जागेला जर तुम्हाला बांधकाम करायचे झाले. तर आपण घेतलेले पैसे आणि बांधकाम याच्यात एवढी मोठी तफावत पडणार आहे. तर हे पैसे तुम्ही कुठून बांधकाम करायला वापरणार आहात. टीडीआर देताना बांधकाम करून दयायचे ही जर आपली मागणी होती, हा जर नियम आहे तर मग भराव आणि कॅलक्युलेशन करून एवढ्या जागेला कताना तुमचे बजेट तिकडेच जाणार आहे.

**चंद्रकांत वैती :-**

पूर्ण बजेट जाईल आणि मला शंका आहे की, मागे मा. स्थायी समितीमध्ये मोठ्या प्रमाणात मोकळ्या जागांना आरक्षणांना कंम्पाऊन्ड घालण्याचे, भिंती घालण्याचे नारळ फोडण्यात आले. एवढ्या वेगाने नारळ फोडण्याच आले. सुट्टीच्या दिवशी नारळ फोडण्यात आले. दिवसाला दहा-दहा ठिकाणी कार्यक्रम करण्यात आले. शंकास्पद प्रकरण आहे. मला फार मोठी शंका आहे. आणि असा कुठच्याही प्रकारचा ठराव नाही. हे कोणी मनघडत कहानी सांगत असेल. चर्चा असेल ठिक आहे. त्या जागांना ज्याला टीडीआर दिला आहे. त्याच्याकडूनच कंम्पाऊन्ड वॉल घालून घेणे, जागा नावावर करणे, याच्यात असलेले अतिक्रमण खाली करून देणे, त्यात मातीभराव करणे, ही सगळी कामे करावी लागतील.

**मा. महापौर :-**

श्री. जयंत पाटील, ती जी ७१ लाख फिगर आहे. मला जिथपर्यंत मागच्या बजेटची आठवण आहे. ती साधारण दोन-तीन करोडच्या आजूबाजुला होती. म्हणून आपण ती तीनची पाच केली होती. मला वाटते त्याच्यामध्ये काहीतरी चुकले आहे.

**जयंत पाटील :-**

नक्की विचारा. चुकले असेल तर विचारून घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

ऑडीटरनी सांगावे.

**जयंत पाटील :-**

एवढ्या जागेचे बांधकाम करताना...

**मा. महापौर :-**

मागच्या बजेटची कॉपी आपण मागवली तर आपल्याला बरीचशी आयडीया येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही म्हणता की, २००७-०८ चे ७१ लाख जे दाखवले त्याऐवजी तीन करोड होते.

**मा. महापौर :-**

मागच्या वेळी बजेट केले त्यावेळी मला जिथपर्यंत आठवते ती रक्कम जास्त आहे. करोडोमध्ये आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे ७१ च्या ऐवजी तीन करोड होते असे म्हणणे आहे ना. मग ते बजेट दाखवले पाहिजे.

**मा. महापौर :-**

मागच्या वेळी विषय असा होता की, जे काही पैसे घ्यायचे ते इमारत परवानामध्ये दोन्ही हेड क्लब केले होते. त्यानंतर हे वेगळे केलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, दुसरी एक गोष्ट आहे. जे टीडीआर आपल्याकडे हस्तांतरण झालेले आहे. ज्याच्यावर आपण बांधकाम करण्याकरिता गेलेले आहेत. त्याच्यानंतर लिटीगेशन निघालेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, प्रत्येक जागेवर जाऊन कंम्पाऊन्डचा काय खर्च येणार आहे? माती भरावचा काय खर्च येणार आहे? आपण त्यांच्याकडून काय रक्कमा घेतलेल्या आहेत? हे टिडीआर संबंधी सविस्तर माहिती मी पुढच्या मिटींगला डिटेलमध्ये देईन.

**चंद्रकांत वैती :-**

हरकत नाही. टीडीआर का किंग कौन हे नंतर.

**मा. महापौर :-**

आत्ता अमाऊन्टमध्ये काही बदल करायचा आहे का?

**अनिल सावंत :-**

तुमचा अंदाज सांगा.

**मा. महापौर :-**

माझा अंदाज सांगितला तर नील झाले पाहिजे. कारण आपण कुंपणभिंत आणि बाऊन्ड्री पुढच्या मिटींगपासून करून घेणार आहे. तेव्हा पैशांचा काही प्रश्न येत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याला एक गोष्ट सांगू इच्छितो. मा. महापौर महोदयांनी सांगितले की, मी उपमहापौर असताना श्रीम. निर्मलाताई सावळे मा.महापौर असताना एक असा निर्णय होता. चर्चा होती की, ज्यांना टीडीआर देऊ त्यांनी महापालिकेला पैसे भरायचे आणि ते कंम्पाऊन्ड वॉल आणि माती भराव महापालिकेने करून घ्यायचे. अशी चर्चा असेल. पण असा ठराव आहे असे मला वाटत नाही. मिनव्हाईल या विषयामध्ये जे काही असेल त्याची माहीती आम्ही घेतो. परंतु, आत्ता महापालिकेने जर त्या टीडीआर दिलेल्या जागांचे, मध्ये मा. स्थायी समितीमध्ये काही आरक्षणांच्या जागांना कंम्पाऊन्ड वॉल घालण्याचे विषय आले होते. आणि आमच्या मा. महापौर साहेबांनी फार मोठी भरारी पथके नेमून सगळीकडे मिरा भाईंदरमध्ये कंम्पाऊन्ड वॉल घालायचे. नारळ फोडत फिरत होते. अशी प्रकरणे असतील त्याला आज स्थगिती. अशी प्रकरणे असतील तर ती घालू नयेत. जर असे टेंडर काढले, बांधकाम खात्याने जरा लक्ष दयावे. श्री. खांबित साहेब, आपल्याला विशेष सुचना की, जर अशी प्रकरणे असतील तर ती कंम्पाऊन्ड थांबवा. नाहीतर काय होणार आहे की, प्रकरण पूर्ण करण्यासाठी, पुरावे नष्ट करण्यासाठी आपण लगेच त्यांना कंम्पाऊन्ड घालू तर त्या संबंधित कॉन्ट्रक्टरना आदेश दया की, ती कामे स्थगित असावीत. ती करू नयेत. कारण जर असे असेल, आपण देतो तोही खर्च आणि डोक्यावर घेतो तोही खर्च. म्हणजे लॉसमध्ये महापालिका. आणि फायद्यात टीडीआर तसा प्रकार व्हायला नको. म्हणून जर असा प्रकार असेल. पुढच्या सभेत उत्तर दया. ह्या सभेनंतरच मी बाकीची माहिती घेतो. ती तयार असू दया.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, विषय असा आहे की, प्रत्येक वेळी सत्ताधारी म्हणून आमच्या श्री. वैती साहेबांना आठवण होते. या टीडीआर बद्दल दोन प्रस्ताव स्टॅंडींगमध्ये आले. मी कोणाची बाजू घेत नाही. एका प्रस्तावाला सत्ताधाऱ्यांनी समर्थन केले होते. दुसऱ्या प्रस्तावाला सत्ताधाऱ्यांनी विरोध केला होता. आणि कॉंग्रेसवाल्यांनी त्याला समर्थन करून पास केलेले आहे. शेवटी यांचे म्हणणे काय? म्हणजे तुम्ही एका बाजूला तुमचे सन्मा. नगरसेवक त्याच भुखंडामध्ये भिंत बांधायला मंजुरी देतात. शेवटी तुम्हाला म्हणायचे काय आहे? आत्ता श्री. वैती साहेब जे बोलेले आहेत. मग दोन ठरावांपैकी कुठल्या कामांना तुम्ही स्थगिती आणाणार आहेत दोन्ही आणणार की, एक आणणार?

**मा. महापौर :-**

कुठल्याही कामाला स्थगिती येणार नाही. कारण मी तुम्हांला सांगतो. आपल्या रेकॉर्डला सगळी माहिती आहे की कोणी पैसे भरले, कोणी भरले नाहीत. तिसरी गोष्ट आपण कुठे बांधकाम केले, कुठे मातीभराव केला तीही डिटेल आपण काढूनच स्टॅंडींगने त्याला मान्यता दिली. त्याप्रमाणे आपण काम करतो.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर साहेब, मी सन्मा. विरोधी पक्षनेत्यांना सांगतो की, ही स्थगिती होऊ शकत नाही. आपण स्टॅंडीगमध्ये पास केलेले आहे. सर्व सभासदांनी त्याला होकार दिलेला आहे. परंतु, जसे आपले कमिशनर सांगतात की, दुसऱ्या मिटींग आपण हा विषय घेऊन चर्चा करू. त्याप्रमाणे आपल्याला काय कमी करायचे, काय वाढवायचे त्याच्यावर चर्चा करून मिटींग लवकरात लवकर संपवावी. मा. महापौरांना जायची वेळ आहे. त्यांची आज सभा आहे. तर या चर्चा मिटींगमध्ये होत राहतील. हा विषय खास घ्यावा अशी मी विनंती करतो.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. नील करू या?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, एमएमआर रिजनमध्ये ज्या टेनंन्ट बिल्डींग आहेत. भाडयाने दिलेल्या ज्या बिल्डींग आहेत. यांना चार एफएसआय देण्याचा प्रस्ताव गव्हर्नमेंटच्या विचाराधीन आहे. तर भाडेकरू असलेल्या बिल्डींगला जर चार एफएसआय मिळणार असेल, तर टीडीआर मागायला जादा कोणी येतील असे वाटत नाही.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या. घर दुरूस्ती.

**जयंत पाटील :-**

घर दुरूस्ती करताना एटीपी डिपार्टमेंट अतिशय कठीण कंडीशन घालते. म्हणजे एखादे गावातील घर दुरूस्त करायचे आहे. तर परवानगी मागते. गावातील घर, त्याला तुम्ही घेतलेली परवानगी दाखवा, प्लान पास केलेले दाखवा. हे खुप कठीण कंडीशन असता. त्याच्यामुळे त्यांना उत्पन्न मिळत नाही आणि मग गावात घर ठोकून देतात. ते लोक आपल्याकडे येतात. मागणी करतात. परंतु, यांच्या कठीण कंडीशनमुळे, जाचक अटीमुळे आपल्या उत्पन्नाचे नुकसान होते.

**मिलन पाटील :-**

गावठाणमध्ये घरे असतील तर गावठाणधील कुठे देणार आहेत? गावठाणधली जी घरे असतील ती ग्रामपंचायतीच्या वेळेची घरे आहेत.

**मा. महापौर :-**

घरे दुरूस्तीखाली गावठाणांना दयावी. बाकी आपण देऊ नये.

**भगवती शर्मा :-**

इसके अंदर रेव्हेन्यु मे कम कर दिए। मे एख जगह फाईल पर रिमार्क लगाने गया था। तो पहापर इन्होंने स्पष्ट लिखा की, मा., महापौरांचे तोंडी आदेश क्या तोंडी आदेश है?

**जयंत पाटील :-**

सहा सहा महिने त्यांना परवानगी मिळत नाहीत.

**मा. महापौर :-**

ज्या ज्यावेळी अतिक्रमणाची बैठक झाली. त्या-त्या वेळी तेच प्रश्न की, याला आपण रिपेअरिंग परवानगी दिलेली आहे. मग त्याच्यामध्ये नंतर कोणी कार्यवाही करायची तर टाऊन प्लानिंगने. टाऊन प्लानिंग बोलतात की, अतिक्रमणणे करायची आणि रिपेअरिंग परवानगीमुळे मॅक्झीम इलिगल कामे झालेली आहेत. म्हणजे आज आपण जे, मी गावठाणातील बोलत नाही मी जनरल बोलतो. त्याच्यामध्ये रिपेअरिंग परमिशन घेतात आणि ९० टक्के इलिगलच करतात.

**जयंत पाटील :-**

महापालिकेला मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा त्यांना मिळणारे उत्पन्न ते बघतात.

**चंद्रकांत वैती :-**

आपल्या अधिकाऱ्यांना वेळ नसतो सर्व्हे करायला. कारण ग्रामिण क्षेत्राचा माणूस घरामध्ये थोडे पैसे आले तर घर दुरूस्तीसाठी घेतो. आणखिन काही करायचे ठरवतो. मग तो जास्तीचे काही देउ शकत नाही. आर्कीटेक्ट आणू शकत नाही. मग त्याला मोघम उत्तरे असतात. आपला सर्वेअर जागेवर नाही. तुमच्या जागेचे मालकीपत्र सादर करा. उतारा सादर करा. गटकेस सादर करा. ग्रामपंचायतीच्या कारकिर्दितील घराची पावती दिली तोच ऑथेन्टीक पुरावा माना आणि त्याच्यावर करून घेतले आहे. पण हे काम करण्यासाठी किती प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते हे आम्हाला चांगले माहिती आहे. पण कारखाना दुरूस्त करतात त्यांना असे करता का? घोडबंदरला एक कारखान्याच्या दुरूस्तीचे काम चालू आहे. पंधरा हजार स्क्वेअर फीटचे काम दुरूस्तीच्या नावाने चालू आहे. हाईट आहे बावीस फुटाची. दोन वर्षापासुन दुरूस्तीचे काम चालले आहे. तर या अशा दुरूस्त्या देता. गावातील गावठणाला, या शहरात १९ गावे आहेत. त्यांना दुरूस्ती देताना, जर दुरूस्तीची परवानगी मागितली आणि दिली नाही तर त्यांनी अर्ज देवून दूरूस्तीचे काम सुरू करावे असे माझे मत आहे.

**मा. महापौर :-**

आपण याठिकाणी आज तीन व्यक्तींना सत्कारासाठी बोलवले आहे. एक अभिनव एज्युकेशन याचे लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये त्यांचे नाव आलेले आहे. मी सर्टीफिकेट वाचून दाखवतो. (वाचन केले.) त्यांचे लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नाव आले आहे. त्यांचे मा. अध्यक्ष श्री. शरद पाटील यांना मी याठिकाणी सत्कारासाठी बोलवत आहे. दुसरे स्लमडॉग यांना ऑस्कर अवॉर्ड प्राप्त झालेला आहे. त्यातील दोन मुले आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रात राहत आहे. मिरा भाईंदरसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. ती मुले आणि त्यांचे वडील हे ऑस्करला गेलेले आहेत. पण त्यांची आई याठिकाणी आलेल्या आहेत. तर त्यांनाही बोलवून आपण त्यांचा सत्कार करूया. मी तिघांना.....

**जयंत पाटील :-**

मला वाटते त्यांना ऑस्कर मिळण्या अगोदरच माझे पत्र मी आपल्याला दिले होते.

**मा. महापौर :-**

आपले पत्र आहे. श्री. प्रफुल्ल पाटील यांचे आहे. श्री. प्रकाश दुबोले यांचे आहे.

**जयंत पाटील :-**

कु. आयुक्त खेडेकर, वय ८ वर्षे आणि कु. मुक्ता मित्तल या दोघांनी स्लम डॉग मिलेनियर या चित्रपटात काम केले आहे आणि विशेष आनंदाची गोष्ट आहे की, हे दोघे अभिनव विद्यामंदिरमध्ये शिकतात. कु. आयुष खेडेकर हा इंग्लिश मिडीयममध्ये शिकतो पण त्याची आई अभिनव विद्यामंदिरमध्ये शिक्षिका आहे. आणि हे दोघे शहराला भाईंदर पुर्वेलाच आहेत. त्याबद्दल मिरा भाईंदरला अतिशय अभिमानाची गोष्ट आहे की, मिरा भाईंदरमधील मुले ही कलेच्या माध्यमातुन ऑस्कर पर्यंत पाहोचलेली आहेत. आपण कधी स्वप्नातही पाहिले नव्हते. खरोखर आपल्या शहराला अभिमानाची गोष्ट आहे. त्यांचा सत्कार आपण करावा आणि त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

दुसरा विद्यार्थी आहे. तो अभिनवचा आहे.

**मा. महापौर :-**

ते विद्यार्थी आल्यानंतर आपण परत त्यांना बोलवून त्यांचा सत्कार करू. आज त्यांचे पालक आलेले आहेत. त्यांचा आपण सत्कार करू.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. पाटील साहेब, तो मधुर मित्तल आपल्या कॉलेजला होता ना?

**प्रफुल्ल पाटील :-**

मधुर मित्तल हा अभिनवचा विद्यार्थी आहे. आणि आयुश खेडेकर याची आई अभिनवची शिक्षिका आहे.

**प्रकाश दुबोले :-**

अभिनव शाळेच्या अध्यक्षांबरोबर कार्याध्यक्षांनाही बोलवा. ते आपले नगरसेवक आहे.

**मा. महापौर :-**

अध्यक्ष श्री. शरद पाटील यांनी वर यायचे आहे.

**नगरसचिव :-**

जे पदाधिकारी आहेत त्यांनी देखिल स्टेजवर यायचे आहे. अभिनव शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. शरद पाटील....

**मा. महापौर :-**

पदाधिकाऱ्यांनी पण डायसवर यायचे आहे.

**आसिफ शेख :-**

आयुष खेडेकर आणि मधुर मित्तल....

**मा. महापौर :-**

श्री. शरद पाटील यांनी वर यायचे आहे.

**नगरसचिव :-**

शाळेचे पदाधिकारी आहेत त्यांनी देखिल वर यायचे आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, आयुष खेडेकर आणि मधुर मित्तल या दोन्ही विद्यार्थ्यांना पालिकेतर्फे एक लाख अकरा हजार रूपये....

**नगरसचिव :-**

मी पदाधिकाऱ्यांना विनंती करतो की, त्यांनी देखिल डायसवर यायचे आहे.

**मा. महापौर :-**

ज्यावेळी मुले ऑस्करवरून येतील त्यावेळी त्यांना परत बोलवू.

**आसिफ शेख :-**

पण आता तुम्ही घोषित करा. ते येतील तेव्हा त्यांचा मोठा सत्कार करा. पण एक लाख अकरा हजार रूपये त्या दोन्ही विद्यार्थ्यांना द्या.

**मिलन पाटील :-**

उधार खात्यामध्ये रक्कम द्यायची नाही. रोकड द्यायचे.

**नगरसचिव :-**

श्री. वैती साहेब ह्यांनी देखिल स्टेजवर यायचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, त्यांचा निधी आत्ताच जाहिर करावा नाहीतर आचारसंहिता लागू झाल्यानंतर करता येणार नाही. याची आपण दक्षता घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

उधार खात्यावर रक्कम डिक्लेअर करू नका.

**मा. महापौर :-**

श्री. प्रफुल्ल पाटील यांना विनंती करतो की, त्यांनीही वर यावे खरे म्हणजे अभिनवमध्ये आपला खुप मोठा हात आहे.

**नगरसचिव :-**

अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. शरद पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करायचे आहे. स्लमडॉग मिलेनिअर या चित्रपटात काम करणारा कु. आयुष हा देखिल आपल्या मनपा हद्दीत राहणार आहे. कु. आयुष खेडेकर यांच्या मातोश्री यांचा देखिल या सभागृहात मा. महापौर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देउन सत्कार करण्यात येत आहे. त्यांनी त्याचा स्विकार करायचा आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, देणगी जाहिर करा. नंतर आचारसंहिता लागेल.

**नगरसचिव :-**

स्लमडॉग मिलेनिअर या चित्रपटास ऑस्कर पुरस्कार मिळालेल्या चित्रपटात काम करणारा कु. मधुर हा सुद्धा आपल्या महापालिका हद्दीत राहणारा आहे. हा अभिनवचा विद्यार्थी आहे. त्याच्या वडीलांचा मा. महापौर पुष्पगुच्छ देउन सत्कार करत आहेत. श्री. शरद पाटील आपले मनोगत व्यक्त करत आहेत.

**श्री. मित्तल :-**

सभी सदस्यो को मेरा हार्दिक नमस्ते। मधुर इस समय यहा नही है, उसके लिए मै क्षमा चाहता हु। वो आऐगा तब आप लोगो से जरूर मिलेगा। आप लोगोने उसके स्वागत के लिए जो इतना बडा मान दिया है उसके लिए मे तह दिलसे आप लोगो का शुक्रिया अदा करता हुँ। और मधुर को बहोत जगहो से बहोत सारे सन्मान अबतक मिले है। लेकीन जो सन्मान अपनी जगह पर मिल रहा है मेरे आखो मे आसु आ रहे है। क्योंकी अपनापन अपने घर मे जब अपने लोग सत्कार करते है उस सन्मान का कोई स्थान नही होता है। आज आप लोगोने जो सन्मान दिया मै आपका दुबारा आभारी हूँ।

**नगरसचिव :-**

आयुष खेडेकर यांच्या आई दोन शब्द बोलतील.

**श्रीम. खेडेकर :-**

उपस्थित मान्यवर मिरा भाईंदर महानगरपालिकेने माझ्या मुलाचा हा जो गौरव केलेला आहे. त्याबद्दल मी तुमचे मनापासुन आभार मानते. आणि तुमच्या शुभेच्छा आणि आशिर्वाद त्याच्या पाठीशी असेच राहू दे हिच विनंती. धन्यवाद.

**नगरसचिव :-**

अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. शरद रामचंद्र पाटील हे आपले मनोगत व्यक्त करीत आहेत.

**शरद पाटील (अध्यक्ष, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ) :-**

मा. महापौर श्री. नरेंद्र मेहता साहेब, मा. उपमहापौर श्री. स्टीवन मेंन्डोंन्सा साहेब, मा. विरोधी पक्ष नेते श्री. वैती साहेब, मा. आयुक्त, आमचे जुने मालक श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, आणि व्यासपिठावरील सर्व मान्यवर पदाधिकारी, समोर बसलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज आमचा जो सत्कार, लिम्का बुकमध्ये आम्ही रेकॉर्ड केलेला आहे. आमच्या अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाच्या शाळेमध्ये जवळ जवळ चौदा हजार विद्यार्थी शिकत आहेत आणि मराठी, हिंदी, इंग्रजी आणि गुजराथी या चार माध्यमातुन आम्ही त्यांना शिक्षण देत आहोत. आमचे अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ हे १९७२ साली कै. मोरेश्वर नारायण पाटील, स्वातंत्र्य सेनानी ह्यांनी स्थापन केले आणि तेव्हापासुन त्याचा जो उत्कर्ष होत आहे त्यामागे आमचे कार्याध्यक्ष मा. श्री. प्रफुल्ल का. पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे. बापुजींनी जे एक रोपटे लावले. त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झालेले आहे आणि दादा ज्यावेळेला शाळेवर कार्याध्यक्ष म्हणून भार सांभाळायला लागले त्यावेळी मी सुद्धा दादांपासुन दुर होतो. कारण सामाजिक क्षेत्रात आणि राजकिय क्षेत्रात कोणीही जास्त वेळ शत्रु राहत नाही. विचार एकत्र आले की, माणसे एकत्र येतात दादांचा तो स्वभाव आहे तो असा की न थकता अविरतपणे संपुर्ण शारिरिक व मानसिक शक्ती एका गोष्टीवर केंद्रीत करून यश संपादन करणे आणि म्हणूनच प्रत्येक क्षेत्रात ते आघाडीवर आहेत. आणि त्यामुळेच आम्ही इथपर्यंत आमची मजल मारू शकलो. आम्ही या शाळेमध्ये फक्त शिक्षणच देत नाही. तर चांगले विद्यार्थी सुद्धा तयार करतो. कला, क्रिडा क्षेत्रामध्ये आमचे विद्यार्थी प्रगतीवर आहेत. आत्ता स्लमडॉग मिलेनियमच्या यशाने साऱ्या जगाचे लक्ष भारतीय कलाकारांकडे गेलेले आहेत. त्यात मिरा भाईंदरमधील दोन छोट्या कलाकरांचा सहभाग सर्वांना अभिमानास्पद गोष्ट व भुषणावह घटना आहे. भाईंदर पुर्वेकडील लक्ष्मी नारायण या सोसायटीत राहणारे आयुष खेडेकर हा बालकलाकार आणि त्याची मातोश्री ही आमच्या शाळेमध्ये शिक्षीका आहे. तसेच मधुर मित्तल हा विद्यार्थी सुद्धा आमच्या शाळेतुन दहावी पास होउन गेलेला आहे. आणि त्याने या आमच्या शाळेमध्ये अभिनयाचे धडे गिरवलेले आहेत. त्याबद्दल त्यांचा इकडे जो सत्कार झालेला आहे. त्यात अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाला सुद्धा ही गोष्ट अभिमानास्पद आहे की, आम्ही फक्त कलाकारच नाही तर सर्वच क्षेत्रात ठसा उमटवत आहोत. आमच्या सिनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी युनिवर्सिटीची कबड्डीची फायनल मारलेली आहे. आमचा पुढील कार्यक्रम निरनिराळ्या म्हणजे शैक्षणिक क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना सुखसोयी आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शिक्षण कसे घेता येईल अशा प्रकारे कोर्सेस, बी.एड. कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज, फार्मसी कॉलेज, एम.बी.ए., एम.सी.ए., हे सगळे तसेच एन.सी.सी., यूनिट आणि कॅटरिंग कॉलेज, हॉटेल मॅनेजमेंट, या सगळ्या गोष्टी विद्यार्थ्यांना परिपुर्ण शिक्षण आणि विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभा राहून आदर्श नागरिक कसा बनेल याकडे आमचे सगळ्यांचे लक्ष आहे. पण हे सर्व करत असतांना आम्हाला बऱ्याच गोष्टींना तोंड द्यावे लागते. आमच्याकडे आर्थिक समस्या खुप आहेत. पण आमचे दादा आम्हाला नेहमी असा काही सपोर्ट करतात किवा काय करतात, त्यांचे जेवढे राजकिय वजन असेल तवेढे खर्च करून या सगळ्या गोष्टी परिपुर्ण करण्याच्या मार्गावर त्यांचा वाटा असतो. आणि त्यामुळेच आम्ही ही यशाची वाटचाल करत आहोत. स्वबळावर करत आहोत. आम्हाला कोणालाही आर्थिक पाठबळ नाही. नगरपालिका असताना अनुदान मिळायचे. आत्ता एवढे नगरसेवक सभागृहात आहेत.

अशा ज्या काही चॅरिटेबल ट्रस्ट आहेत. आणि ज्या चांगले काम करतात. त्यांच्यासाठी तुमच्याकडून काहीतरी हातभार लागावा. आमची गरज संपुर्ण होणार नाही. तरीसुद्धा आम्हाला कुठेतरी बुडत्याला काठीचा आधार त्याप्रमाणे आम्हाला मदत होईल. तुम्ही हा जो आता आमच्या शाळेचा सत्कार केला हा सर्वांच्या वतीने आमच्या कार्यकारी मंडळाच्या वतीने पदाधिकाऱ्यांच्या वतीने मी स्विकारतो. तुम्ही आज हा सत्कार केला त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद देतो आणि असेच आमच्यावर प्रेम राहो, लक्ष राहो अशी तुम्हाला सगळ्यांना विनंती करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**दिनेश नलावडे :-**

याठिकाणी आज खऱ्या अर्थाने या शहरामध्ये फक्त अभिमान वाटेल असे नव्हे तर संपूर्ण देशामध्ये आणि संपुर्ण जगामध्ये भारताचे नाव उज्वल झालेले आहे. पहिल्या वेळेस स्लम डॉग पिक्चरला ऑस्करचे आठ पुरस्कार मिळालेले आहेत. त्यापैकी सर्वोत्कृष्ट पिक्चर म्हणून स्लमडॉग नावारूपाला आला आणि भारत देश संपुर्ण जगामध्ये फिल्मस्टारमध्ये पुढे आलेला आहे. याच्यामध्ये सर्वात मोठा हात मिरा भाईंदर शहरामधील दोन मुलांचा आहे. मिरा भाईंदरला अभिमान वाटेल असे कौतुकास्पद काम ह्या मुलांकडून घडलेले आहे. त्यामध्ये मी आपल्याला अभिमानाने सांगेन की, आयुष खेडेकर याचे आजोबा स्नेहा हॉस्पीटल गल्लीमध्ये माझ्या पाठीमागच्या बिल्डींगमध्ये राहतात. आयुष खेडेकरच्या आईचे नाव सायली आहे. लग्नाच्या अगोदरचे नाव उषा म्हणून आहे. उषा ही आमच्यासमोर लहानाची मोठी झाली. लग्न झाल्यानंतर सायली झाली. मुलगा झाला तो ही अतिशय दैदिप्यमान असे काम केले आहे. साहेब, मी आपल्याला सांगेन, २५ जानेवारीला स्नेहा लेन रेसिडेन्स असोसिएशनचा कार्यक्रम झाला. त्या असोसिएशनचे अध्यक्ष आयुष खेडेकरचे आजोबा श्री. रामचंद्र आंबोकर आहेत. आम्ही त्या ठिकाणी आई वडीलांचा आणि मुलाचा फार मोठा सत्कार केला होता. त्याच्यामध्ये मी त्यांना बोललो की, महानगरपालिकादेखिल आपला निश्चितपणे सत्कार करेल पण ते ऑस्कर पुरस्कार मिळाल्यानंतर, आणि काल योगायोगाने महाशिवरात्र होती. आणि संपूर्ण देशामध्ये आणि संपूर्ण जगामध्ये नाव उज्वल झाले. खास करून मिरा भाईंदरचे नाव उज्वल झाले. अतिशय चांगली गोष्ट आहे. त्याच्याबरोबरच मधुर ने देखिल आपल्या शहराचे नाव उज्वल केलेले आहे. आयुष खेडेकरची आई ही अभिनव शाळेमध्ये शिक्षिका आहे. मी अभिनव शाळेच्या संचालकांना, डायरेक्टरांना श्री. शरद पाटील साहेब आहेत, श्री. प्रफुल्ल पाटील साहेब आहेत, यांना सर्वांना मी विनंती करेन की, आयुष खेडेकरच्या आईला या शाळेमध्ये प्रमोशन देण्याचे काम हे महत्वाचे आहे. त्यांनी ते करावे ही मी त्यांना विनंती करतो आणि आपल्या संपुर्ण शहरासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. मी पुन्हा एकदा आयुष खेडेकर आणि मधुर यांचे अभिनंदन करतो. त्यांना धन्यवाद देतो आणि त्यांना शुभेच्छा देउन माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

**नगरसचिव :-**

अभिनव विद्यामंदिरला लिम्का बुक ऑफ रेकॉर्डचे जे प्रशस्तीपत्रक मिळाले आहे. ते मी वाचुन दाखवतो. (वाचन केले.) असे त्यांच्याकडून सर्टीफिकेट मिळाले आहे. मी वाचन केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सभा सुरू होण्यापुर्वी आमच्या सन्मा. नगरसेविका श्रीम. कल्पना म्हात्रे यांनी या दोन्ही मुलांचा अभिनंदनाचा ठराव मांडला होता आणि सभागृहाने संमती दिली. आणि त्यानंतर यांचा सत्कार जाहिरपणे करावा अशी सुचना त्याच्यामध्ये मांडलेली आहे. पण आत्ता जेव्हा मी आमचे सन्मा. नगरसेवक श्री. मिलन म्हात्रे यांना विचारले. आयुष खेडेकर आणि मयुर मित्तल मी बोललो की हे मित्तलच नाव आहे का? बोलले की, कधी मारवाडी आर्टीस्ट झाले आहेत का? पण आत्ता कन्फर्म झाल्यानंतर हा आमचा गौरव आहे की, आमच्या समाजाचा, मित्तल म्हणजे मारवाडीच आहे. व्यापारामध्ये त्यांनी किर्ती दाखवली. पण चित्रपटामध्ये पण मारवाड्यांनी किर्ती घेतलेली आहे. याचा मला अभिमान वाटतो. म्हणून मी याचे पुन्हा अभिनंदन करतो.

**आसिफ शेख :-**

त्यांच्या पुढील शिक्षणासाठी एक लाख अकरा हजार रूपयांची पुरस्काराची रक्कम जाहिर करा नंतर त्या दोन्ही मुलांचा सत्कार करा. आयुष खेडेकर आणि मधुर मित्तल या दोघांना एक लाख अकरा हजाराचा पुरस्कार आपण जाहिर करावा.

**मिलन म्हात्रे :-**

राष्ट्रवादी पक्षातर्फे दोन लाख एक्कावन्न हजार द्यावेत.

**मा. महापौर :-**

पान क्र. ०४, दादा आपण मुद्रांक शुल्काबाबत काय बोलत होते?

**प्रफुल्ल पाटील :-**

खाली कारखाने, दुकाने, आर्कीटेक्टरी वगैरे झाले काय? मुद्रांक शुल्क अनुदानाबाबत प्रशासनाने याठिकाणी स्पष्टीकरण करणे फार गरजेचे आहे. मुद्रांक शुल्क अनुदान काय आहे? काही कन्वेन्सींग झाले आहे की, फ्लॅटवरचे डॉक्युमेंट कन्वेन्स झाले आहेत? आणि ज्या रक्कमा आम्ही संभावीत दाखवलेल्या आहेत. त्याच्या समोर काहीच मिळालेले नाही. म्हणजे आम्ही सरकारकडे अनुदान मागायला जायचे की, सरकारने येउन स्वतःच आम्हाला अनुदान द्यायचे आहे?

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, तीन नंबर पानावरचा तो तलाव मक्ताचा विषय मांडलेला?

**मा. महापौर :-**

तीन नंबरवर काही बाकी आहे?

**प्रकाश दुबोले :-**

होय साहेब, मागच्या वर्षी आपण तलाव मक्ता सहा लाख एक्याऐंशी हजार वसुल केलेला आहे. आणि पुन्हा तीन लाख एकोणीस हजार येणे आपण म्हणतो. आणि आपण तरतुद फक्त तीन लाखाची केली आहे. तिथे वाढ पाहिजे ना.

**मा. महापौर :-**

तुम्ही कुठे बोलता?

**प्रकाश दुबोले :-**

तीन नंबर पानावर, पंधरा नंबरचा मुद्दा, तलाव मक्ता.

**मा. महापौर :-**

तो तीन वर्षासाठी आहे. ते ठेके यावर्षी दिलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, १८ नंबरचे भंगारविक्री वाहन विक्री सह तर आत्ता आपल्या महानगरपालिकेतील किती गाड्या भंगारमध्ये काढलेल्या आहेत. त्याचे व्हॅल्युएशन केलेले आहे का?

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, त्याचे काय? मागचा रेट काय? ह्या तीन वर्षाच्या आहेत की, एका वर्षाचे आहे?

**मा. महापौर :-**

किती नंबरवर?

**प्रकाश दुबोले :-**

तिथे आपण ६ लाख ८१ हजार वसुल केलेले आहेत.

**मा. महापौर :-**

आपण कुठल्यासाठी बोलता?

**प्रकाश दुबोले :-**

तलाव मक्ता यावेळेला फक्त तीन लाख रूपये धरले आहेत. मग ते मागचे जास्त होतात, यावेळेला कमी हा काय प्रकार आहे?

**अजित पाटील :-**

तीन वर्षाकरिता टेंडर काढलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

हमे कैसे पता चलेगा? आप अब तीन साल के लिए बोल रहे है।

**अजित पाटील :-**

ते टेंडर तीन वर्षाचे काढलेले आहे. याच्यामध्ये ६ लाख ३१ हजार आलेले आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

आत्ता टेंडर किती वर्षासाठी काढलेले आहे?

**अजित पाटील :-**

तीन वर्षाचे काढले आहे. तीन वर्षात हे ६ लाख ३१ हजार आलेले आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

मग आत्ता हे तीन लाख रूपये किती वर्षाकरिता धरू.

**अजित पाटील :-**

दोन तीन तलावांचे बाकी आहेत. त्याच्याकरिता आपण धरले आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

ते किती एका वर्षासाठी देणार आहात की, तीन वर्षासाठी?

**मा. महापौर :-**

तीन वर्षासाठी दिले तरी तरतुद आपण एका वर्षाची धरणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्याच्यावर १८ नंबर आहे, भंगार विक्री वाहन विक्रीसाठी. मग आपण आत्ता कोणकोणत्या गाड्या भंगारमध्ये विक्रीसाठी काढलेल्या आहेत?

**मा. महापौर :-**

आपण वाहन कुठे विकणार आहोत?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, याच्यामध्ये वाहन विक्रीसह दिले आहे.

**मा. महापौर :-**

त्यामध्ये वाहन विक्री नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग भंगार काय विकणार ते मला सांगा.

**मा. महापौर :-**

त्यामध्ये वाहन विक्री नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, भंगारचा रेट वाढवा.

**शरद पाटील :-**

भंगार म्हणजे नक्की त्याच्यात काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

भंगार म्हणजे काय भंगार विकणार आहेत?

**जयंत पाटील :-**

श्री. खांबीत यांचा या डिपार्टमेंटशी काय संबंध आहे?

**मा. महापौर :-**

मागच्या वेळी त्याचा लिलाव पीडब्ल्युडी ने केला होता. म्हणून त्यांना विचारले.

**जयंत पाटील :-**

वाहन विक्री लिहिले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब २००७-०८ मध्ये ५ लाख रूपये कलेक्शन झालेले होते. वाहन विक्रीसह ते पण विचारलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेच्या स्वतःच्या ज्या गाड्या असतील. ज्या डेटबाहेर झाल्या, त्या गाड्या आणि पकडून आणलेल्या हातगाड्या किंवा जो भंगार माल असेल त्यांचाच...

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यामध्ये वाहन विक्रीसह विचारलेले आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आपण करून घेऊ.

**प्रेमनाथ पाटील :-**

किती घ्यायचे?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, पण हे असेच जर, वाहन विक्री म्हणजे नक्की काय ते सांगा. आम्ही भंगार घेतो.

**मा. महापौर :-**

हातगाड्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्याच्यामध्ये वाहन विक्री लिहिले आहे. मागच्या ०७-०८ मध्ये आपण ५ लाख ३२ हजार वसुल केलेले आहे. आणि आत्ता फक्त १ लाख रूपये. याच्यामध्ये ५ लाख करा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे ५ लाख करा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, लायसन्सचे १० कोटी कसे पकडले?

**मा. महापौर :-**

प्रायव्हेटीझम करून करणार आहेत. मा. स्टॅंडींग चेअरमेन साहेब बरोबर ना? आपण १० कोटी प्रायव्हेटीझम करून म्हटलेले आहे ना?

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापतींना बोलायला सांगा.

**शरद पाटील :-**

सगळया परवानग्या १० करोड रूपये हे जास्त होतात.

**प्रशांत पालांडे :-**

एवढा कसा आणायचा?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, परवाना विभागाने मागील वर्षी कोणालाही परवानगी दिलेली नाही. तर आपण ते लवकरात लवकर चालू करा.

**शरद पाटील :-**

लवकरात लवकर चालू करा पण दहा करोड कसे निघतील ते आम्हाला सांगा.

**मा. महापौर :-**

ते स्टॅंडींगने केले आहे. त्याचा खुलासा करतात. तुम्ही दोन मिनिटे थांबा.

**अनिल सावंतः-**

मा. महापौर साहेब, ज्यावेळी हा विषय स्टॅंडींगजवळ आला त्यावेळी असे झाले की, आपण जे हॉकर्ससाठी ठेके देतो. ते शहरामध्ये जे उघड्यावर हॉकर्स बसतात, त्याच्यासाठी आपण वर्षाला तीन करोड रूपये कलेक्ट करतो. आणि आत्ता सेसच्या माध्यमातून बऱ्याचशा आस्थापनांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे. आणि त्यामुळे ही वाढ अपेक्षित धरून दहा करोड रूपये केलेले आहेत. आपण ते प्रायव्हेट ठेका देऊन वसुल केले जाईल असा प्रशासनातर्फे खुलासा केला गेला. आणि स्टॅंडींग कमिटीला ते योग्य वाटले म्हणून ते दहा करोड रूपये ठेवलेले आहेत. ते होऊ शकते.

**मा. महापौर :-**

एकूण एस्टाब्लीशमेंट किती आहेत?

**अनिल सावंत :-**

आपले सतरा हजार फॉर्म येऊन गेले.

**मा. महापौर :-**

१७,००० x २००० जरी आपण एव्हरेज धरले तरी तीन करोड रूपये होतील.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये हॉटेल्सला वगैरे परवाना फी जास्त आहे. तुम्ही एव्हरेज दोन हजार पकडून केले. हॉटेलसाठी आपण दहा हजार ठेवलेले आहेत.

**मा. महापौर :-**

काही शंभर रूपये पण आहेत.

(सभागृहात गोंधळ )

**जयंत पाटील :-**

सतरा हजारांनी फॉर्म नेले. ॲक्च्युअलमध्ये जास्त आहेत.

**शरद पाटील :-**

सतरा हजार फॉर्म नेले. आपल्याकडे आले किती?

**मा. महापौर :-**

साहेब, फॉर्म कितीही आले असतील. पण सतरा हजार ते इनटू आपण एव्हरेज दोन हजार केले तर साडेतीन करोड होता.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये हॉटेल्स वगैरे आहेत....

**शरद पाटील :-**

पण ते दहा करोड पॉसिबल नाहीत.

**अनिल सावंत :-**

हॉटेल्स वगैरे आहेत....

**मा. महापौर :-**

हॉटेल्सची संख्या फार कमी आहे आणि जे बाकी किरकोळ व्यापारी आहेत त्यांची संख्या मोठी आहे. आणि आपले शंभर रूपयावाले लायसन्सपण आहेत, ५० वालेपण आहेत, दोनशेवाले पण आहेत.

**अनिल सावंत :-**

तसे दहा हजारवाले पण आहेत ना?

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहब, स्टॅंडींगने अधिकारीयोंसे चर्चा करके विषय दिया गया है। और अधिकारीयोंको टार्गेट दिया जाए। अधिकारीयों को टार्गेट दिया जायेगा तो वो करेंगे।

**शरद पाटील :-**

टार्गेट देंगे लेकीन दस करोड कहासे वसुल होंगे वह तो बताईए।

**मदन उदितनारायण सिंह :-**

अधिकारी बतायेंगे।

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, लायसन्सचे इकडे कोण आहेत?

**मा. महापौर :-**

आपल्याकडे सतरा हजार एस्टाब्लीशमेंटचे ॲड्रेस आलेले आहेत. जर दहा करोड वसुल करायचे असतील तर जे सतरा हजार व्यापारी आहेत त्यांना या आर्थिक वर्षात आपण कमीत कमी नोटीस पाठवली की, आपण ताबडतोब रजिस्ट्रेशन करून परवाना घ्यावा. अन्यथा आपल्याकडून ही दंडात्मक कार्यवाही करून पैसे वसुल करण्यात येतील. म्हणजे कमीत कमी नेक्स इअर आपण हे कॅरी फॉरवर्ड करू शकतो. म्हणजे या वर्षाचे प्लस येणाऱ्या वर्षाचे तर हे दहा करोड......

**अनिल सावंत :-**

म्हणून ते जस्टी फिकेट झाले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

पण ते आत्ता दहा करोड कशाला पकडायचे !

**मा. महापौर :-**

आपल्याकडे सतरा हजाराचा डाटा आहे. त्यांना आपण जर नोटीस पाठवली की, त्यांनी ताबडतोब रजिस्ट्रेशन करुन घ्या. अन्यथा तुमच्या विरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल. तर आपल्याला पुढच्या वर्षी तरी ते कॅरी फॉरवर्ड करता येईल. म्हणजे एखादा जर आला तर मागचे आणि हे दोन्ही भर.

**अनिल सावंत :-**

दहा करोड बरोबर आहेत आणि आत्ता तर मा. आयुक्त आलेले आहेत. त्यांच्या नामावर ८० टक्के वसुलीचा रेकॉर्ड आहे.

**मा. महापौर :-**

मी परत तुम्हाला सांगतो की, यामध्ये तीन-तीन वर्षांचे रिन्युअलचे पैस पण आपले बाकी आहेत. तेही तुम्हाला येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, हा एनओसी चा प्रस्ताव मी मा. महासभेत दोन वेळा आणला होता. ही दहा कोटीची फीगर दिली. जेव्हा मी माझ्या नगरसेवकांना विचारले की, दहा कोटींची फीगर कशी काय आली? सांगितले की, ठेका पध्दतीने वसुली. म्हणजे एका बाजूला कॉंग्रेस जकातीमध्ये या शहरामध्ये ठेका पध्दती...

(सभागृहात गोंधळ )

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आजपर्यंत अधिकाऱ्यांनी एक पैसा वसुल केला नाही. दहा करोड कोणत्या बेसवर करणार?

**मा. महापौर :-**

आप फिगर मे बोलिए। कितना फिगर करना है ?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, परवाना शुल्क दहा करोड आहे. त्याच्यावर आपले काय म्हणणे आहे ते सांगा.

(सभागृहात गोंधळ )

**मधूसुदन पुरोहित :-**

मा. महापौर साहेब, याच्यात अजून वाढ होऊ शकते. ठेका पध्दतीने केले तर काय चुकीचे आहे? ठेका पध्दतीने आपण बळजबरीने आणि टार्गेट देऊन पैसे वसुल करू शकतो ना?

(सभागृहात गोंधळ )

**शरद पाटील :-**

ठेका पध्दतीने देऊन जबरदस्तीने वसुल करणार?

**मधुसूदन पुरोहित :-**

शहराच्या विकासासाठी तुम्हाला कोणी सहज पैसे देणार नाही.

**मा. महापौर :-**

ठेका दयायचा असेल त्यावेळी तो विषय मा. महासभेत येईल.

**शरद पाटील :-**

ठेकेदार जबरदस्ती करतो म्हणून आपल्या इकडे व्यापाऱ्यांनी मोर्चे काढले ना? आणि आत्ता म्हणता की, तिथे जबरदस्तीने वसुल करणार?

**मा. महापौर :-**

आपण हे प्रोव्हीजन करत आहोत. कुठलाही ठेका देत नाही. तो विषय येईल ......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही काय प्रोव्हीजन करता? तीस लाख वसुल होत नाहीत आणि दहा कोटींची प्रोव्हीजन करता? दोन कोटीच्या वर आम्ही या ठरावाला मान्यता देणार नाही. जी फिगर आहे ती वसुल करा. जास्त आली तर कोणी रोखत नाही. याला आम्ही मंजुरी देणार नाही.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, कारखाने , दुकान,आर्की फी दहा कोटी रूपये मा. स्थायी समितीचा अंदाज आहे. मा. स्थायी समितीमध्ये जेव्हा या विषया संदर्भात बजेट आले. तर मा. स्थायी समितीमध्ये सर्व पक्षांचे नगरसेवक आहेत. मी प्रत्येक वेळी सांगतो की, स्टॅंडींग कमिटी इज परफेक्टली अंडरस्टॅंडीग कमिटी त्या स्टॅंडींग कमिटीमध्ये सर्वानुमते हा ठराव केलेला आहे की, दहा कोटी वाढवायचे आहेत. आणि आत्ता मा. महासभेमध्ये खरे म्हणजे याच्यापेक्षा थोडे जास्त वाढवायला पाहिजे. श्री शिवमुर्ती नाईक साहेब या ठिकाणी आले आहेत. त्यांनी प्रत्येक वेळी महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात वाढ केलेली आहे. आमची अपेक्षा अशी आहे की, यामध्ये आपण आणखीन वाढ करू शकता. काय कॅल्क्युलेशन करायचे आहे ते आपण करा. आणि याच्यामध्ये वाढ करता येईल ते बघा. स्टॅंडींग कमिटी एवढी सक्षम कमिटीची आहे. त्यांनी दहा कोटी केली, आपण पंधरा करा. काय अडचण आहे?

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, या शहरामध्ये फेरिवाले जास्त आहेत की, दुकानवाले जास्त आहेत की, आस्थापना जास्त आहेत की, इंडस्ट्री जास्त आहेत? याचे उत्तर आपण मला देऊ शकता का? या शहरामध्ये फेरिवाल्यांपेक्षा नक्कीच दुकाने जास्त आहेत. आस्थापना जास्त आहेत, बिझनेसमेन जास्त आहेत, इंडस्ट्री जास्त आहेत. आज आपण जर सरसकट यांना परवानगी दिली. तर आपल्याला दहापेक्षा वीस करोड रूपये मिळून शकतात.

**मा. महापौर :-**

पण फेरिवाले आणि हॉकर्सकडून पैसे घेतो....

**धुव्रकिशोर पाटील :-**

जर हॉकर्स तीन करोड रूपये देऊ शकतात तर हे वाढू शकते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब दोन वेळा प्रस्ताव दिले.

(सभागृहात गोंधळ )

**मधुसूदन पुरोहित :-**

आपण रस्त्यावरून तीन कोटी वसुल करू शकतो तर व्यापाऱ्यांकडून का करू शकत नाही? साहेब सहजासहजी कोणी पैसे देतो का?

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब, इस परवाना मे फेरिवाला इन्क्लुड है क्या?

**मा. महापौर :-**

श्री. धुव्रकिशोर पाटील साहेब, आपण जे सांगता की, फेरिवाले जास्त की, हॉकर्स जास्त? आपल्या माहितीसाठी सांगतो, जे फेरिवाले बाजार वसुली करतात. त्याच्यांमध्ये दुकानवालेपण इन्क्युड आहेत. त्यांच्याकडूपण वसुली केली जाते.

(सभागृहात गोंधळ )

**धुव्रकिशोर पाटील :-**

त्यांनी फेरिवाल्यांकडून वसुल केले पाहिजे. दुकानवाल्यांकडून त्यांनी वसुल नाही केले पाहिजे. मग आपण कसे.......

**मा. महापौर :-**

जे दुकानवाले सामान बाहेर लावतात त्यांच्याकडून ती वसुली केली जाते.

(सभागृहात गोंधळ )

**मधुसूदन पुरोहित :-**

महापालिकेने नियमात अटीत असा काही उल्लेख केलेला नाही. तुम्ही जे फिगर दिले आहेत याच्यापेक्षा आपण दोनपट जास्त वसुल करू शकतो. प्रॅक्टीकली सदर याचे निरीक्षण केले तर याच्यापेक्षा जास्त फिगर आपली यायला पाहिजे....

**मा. महापौर :-**

पैसे आले तर अकाऊन्टमध्ये येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मागच्या वेळी जे प्रस्ताव झाले ते वाचून बघा. मग चोवीस लाख रूपये का आले? आज शहराच्या व्यापाऱ्यांना तुम्ही पळवायचा विचार करता काय? भारतीय जनता पक्ष दोन कोटींच्या वर मान्यता देणार नाही.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब त्यांचा विरोध नोंद करा. आणि आमचे घ्या.

**मा. महापौर :-**

ते शब्द प्रोसीडींगमधून वगळा.

**मधुसूदन पुरोहित :-**

शहरासाठी प्रॅक्टीकली विचार करणे गरजेचे आहे. फक्त मिरा भाईंदर शहरात २५०० किराणाचे व्यापारी आहेत. बाकी इतर व्यापार करणारे जे लोक आहेत, त्यांची जर मोजणी केली, आणि त्याचा जर उल्लेख केला. तर ती संख्या कुठपर्यंत जाईल. फक्त २५ टक्के लोकांनी आपल्या सेसमध्ये नोंदणी केली आहे. फक्त १७ हजार लोकांनी केलेली आहे. उरलेले लोक कुठे आहेत? आणि फक्त त्याच लोकांना याच्यामध्ये इन्क्लुड केले तर साडेतीन करोड रूपये होतात. असे तुम्हीच बोलता ना?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

५५ हजार दुकानदार आहेत. मी फिगर दिलेली आहे. ते तीन लाख रूपये वसुली का झाली याचे प्रशासनाने उत्तर दयावे.

**आसिफ शेख :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल आणि मा. महापौर, तुमचे दोघांचे वक्तव्य सेम दिसते असे मला वाटते. आणि हे दोघांचे सेम वक्तव्य आहे. याचा अर्थ तुमचा राजकिय उद्देश कुठेतरी या ठिकाणी आम्हाला दिसतो. आम्हाला पूर्ण खात्री आहे. श्री. शिवमुर्ती नाईक साहेब, वसुल करण्यामध्ये सक्षम आहेत. ते चांगल्या पध्दतीने हातापाया पडून नागरिकांना व्यवस्थित समजवतील की, महापालिकेचे पैसे आले पाहिजेत. वीस कोटी करा. ते वीस कोटी संपूर्णपणे वसुल करतील. आम्हाला खात्री आहे. कही पर निगाहे, कही पर निशाना. काय चालले आहे? स्टॅंडींग कमिटी पागल आहे का?

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

यांना खुलासा करू दया.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, बजेटमधील जी रक्कम आहे. ती कमी जास्त कितीही असतील तरी रेट फिक्स करण्यासाठी तुमच्यापुढे आलेले आहे. रेट फिक्स झाल्यानंतर त्यांची वसुली झाली नाही तर ती थकबाकीदार म्हणून पुढच्या बिलामध्ये येणारच आहे. समजा त्यांनी तीन वर्षे भरले नाहीत. तर तीन वर्षाचे एक-एक हजार त्यांच्याकडून रिकव्हरी होणारच आहे. फक्त ती वसुली केली नाही म्हणून बजेट प्रोव्हीजन कमी करा. हे म्हणणे बरोबर नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कमिशनर साहेब, तुम्ही चुकीचे बोलता. तुम्ही असताना पण जर तुम्ही वसुली केली असती. तर हा फिगर आज ३२ लाख राहिला नसता. आपणपण त्यावेळी होते. त्यावेळीपण प्रस्ताव दहा हजार रूपये, वीस हजार रूपये, पाच हजार रूपये आपण केले. त्यावेळीपण पंचवीस लाख रूपये वसुल झाले नाहीत. हे रेट रिवाइज केल्यानंतर, पण तुम्ही हे जे फिगर बोलता. आम्ही तर बोलतो की, सरासरी ५०० रूपये घ्या. प्रत्येक व्यापाऱ्याकजून सरासरी ५०० रूपये घ्या. मा. महापौर साहब, यह मा. आयुक्त साहब थे उस समय रेट दस हजार, पाच हजार था। अब तो बहोत कम किया तब भी पैसा नही आया।

**मधुसूदन पुरोहित :-**

इसलिए हमारा यह कहना है की, किसीके गले मे यह हार पहना दो। सामनेवाला लढते रहेगा, लेते रहेगा। हमे सिर्फ महापालिका का फायदा देखना है। का करू नये? करू या. ठेका पध्दतीने दया. कोणाच्या गळ्यात हार टाकून दया. तो जाईल. रोज काय करायचे ते करेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठेका पध्दतीने देऊ नये. ठेका पध्दतीने देण्यास आमचा विरोध आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

शहराचा विकास करायला बधता की, नुकसान करायला इकडे बसले आहात?

**मा. आयुक्त :-**

जे रेट आहेत. त्या रेटप्रमाणे येणारी रक्कम तिकडे दाखवली जाईल. मा. महासभेने जो रेट मंजुर केला आहे त्या रेटप्रमाणे दुकानांचा हिशोब करून ती अमाऊन्ट आम्ही घालू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या रक्कमेला आमचा विरोध लिहून घ्या.

**मा. महापौर :-**

आपण पाच करोड रूपये केले. जे येईल ते जास्त...

**मधुसूदन पुरोहित :-**

पण शहराचे नुकसान आहे. रेव्हेन्यु गेन मध्ये लॉसेस आहे.

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

रेट पहिलेच ठरलेले आहेत. आत्ता रेटचा विषय नाही.

**मधुसूदन पुरोहित :-**

कुठले रेट ठरलेले आहेत.

**मा. महापौर :-**

आपण दुकानरादांकडून काय घ्यायचे ते ठरलेले आहे. मा. महासभेने ते मंजुर केलेले आहेत.

**मधुसूदन पुरोहित :-**

जर ठेका पध्दतीने वसुली होत असेल तर आपण का करत नाही?

**मा. महापौर :-**

ठेका पध्दतीचा विषय ज्यावेळी मा. महासभेत येईल. त्यावेळी त्याचे काय करायचे ती चर्चा आपण करू.

**मधुसूदन पुरोहित :-**

ते वाढवा. नंतर वाढवता येणार आहेत का?

**मा. महापौर :-**

येणार ना.

**मधुसूदन पुरोहित :-**

कसे येणार?

**मा. महापौर :-**

निवीदा जास्तीची आली तर पैसे वाढवता येतील.

**धुव्रकिशोर पाटील :-**

निविदेला काहीतरी एस्टीमेट तुम्हाला दयावे लागेल की नाही? आणि तुम्ही जर एस्टीमेटच कमी पकडले तर तुम्हाला निविदा कमीच येणार ना?

**मा. महापौर :-**

आपण लम्पसम देणार नाही. मा. महासभेत धोरण नक्की करणार. त्यानंतर देणार.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही या मोकळ्या जागेवर चार करोडचे चौदा करोड केले. इमारत परवाना आठ करोडचे तेरा करोड केले. टीडीआर चे तीन करोड केले. तुम्ही एवढे फीगर वाढवले मग ही फीगर कमी का करता? याच्यामागचे कारण काय?

**चंद्रकांत वैती :-**

दहा ठेवा.

**प्रफुल्ल पाटील :-**

कमी करू नका. तेवढे ठेवा.

**मा. महापौर :-**

दहा ठेवा. पुढचा विषय घ्या.

**मा. महापौर :-**

मा. महापौर साहेब, पुढच्या विषय घेण्याअगोदर .......

**मा. महापौर :-**

श्री. सावंत साहेब., आपण किती वेळा बोलणार?

**अनिल सावंत :-**

त्याच्याविषयी नाही. बी.जे.पी. चे सभासद नेहमी कॉंग्रेसचे सदस्य म्हणून उल्लेख करतात. याच्यापुढे त्यांना समज दया.

**मा. महापौर :-**

ते प्रोसीडींमधून वगळले.

**अनिल सावंत :-**

ते हात करून बोलतात. कॉंग्रेसच्या सदस्यांबद्दल वारंवार उल्लेख करतात. त्यांना समज दया.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, पुढचा विषय घेण्याआधी माझा विषय असा आहे की, नवीन मा. आयुक्त साहेब आज पहिला दिवस, या ठिकाणी आलेले आहेत. गेल्या चार दिवसांपूर्वीचा माझा विषय होता. अनधिकृत बांधकामावर श्री. गणेश पाटील आणि निशांत जाधव यांना निलंबीत करणार होते. किंवा बदली करणार होते. ते काय केले?

**मा. महापौर :-**

मॅडम आज तो विषय नाही. बजेटचा विषय आहे.

**वंदना चक्रे :-**

विषय नसला तरी ऐकून घ्या. बजेटचा विषय झाल्यावर उशिर होईल.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त आत्ता आले आहेत ते आपल्याला माहिती देतील.

**वंदना चक्रे :-**

पुढे आचारसंहिता लागणार आहे. नंतर लागेल की नाही माहिती नाही. हा विषय संपता संपता वेळ होईल. माझा विषय राहून जाईल. त्यासाठी पहिले माझे ऐकून घ्या. नवीन मा. आयुक्त आज आलेले आहेत. त्या दिवशी अचानक मी जशी बोलले होते तशी, हमारी मांगे पुरी करो, नही तो खुर्सी खाली करो! ऑटोमॅटीक श्री. जाधव साहब की खुर्सी खाली हो गयी। मा. आयुक्त साहेब, श्री. गणेश पाटील आणि निशांत जाधव यांना निलंबीत करण्याची मागणी मी चार दिवसांपूर्वी केली होती. त्याच्यामध्ये मा. आयुक्त श्री. जाधव साहेबांनी आम्हाला मा. महासभेसमोर सांगितले की, त्यांची बदली करण्याचा ठराव झालेला आहे. ते प्रोसीडींगमध्ये आलेले आहे. तर अचानक त्या दिवशी मा. आयुक्त साहेबांची बदली झाली. त्यानंतर आपण आलात. दरम्याच्या काळात मा. उपायुक्तांना चार्ज दिला होता. त्यांनी कार्यवाही केली की नाही याचा मला खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

मी माहिती घेतो आणि पुढील आठ दिवसात कार्यवाही होईल.

**मा. महापौर:-**

यापुढील चार्ज मी मा. उपमहापौर यांना देऊन जातो. मिटींगचे पुढील कामकाज मा. उपमहापौर यांनी बघावे. जेवणाची सुट्टी जाहीर करतो.

**नगरसचिव :-**

भोजनानंतर सभेच्या कामकाजाला सुरूवात होत आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. ९९, मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००८/२००९ चे सुधारित व सन २००९/२०१० च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरण पत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र. १०९ दि. ३/२/२००९ विचारात घेउन सविस्तर चर्चा करून मा. सदस्याचे सूचनेनुसार शासनाकडून मिळालेले रस्ता अनुदान, मे. रियालयन्स, महानगर गॅस, एमटीएनएल, रिलायन्स एनर्जी यांचेकडून रस्ता नुकसान भरपाई पोटी मिळालेली रक्कम रस्ते दुरूस्ती देखभाल यासाठी वाढीव खर्च या सूचनेसह व आवश्यक त्या दुरूस्तीसह सन २००८-०९ चे सुधारित व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. सुधारित व मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे .

**सन २००८-०९ चे सुधारित अंदाज व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक** **(आकडे लाखात)**

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+ "वृक्षप्राधिकरण"+ "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" एकूण जमा | **42381.89** | **52256.57** |
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+ "वृक्षप्राधिकरण"+ "महिला व बालकल्याण" | **39096.75** | **52251.07** |

| | | |
|---|---|---|
| + “JNNURM” + “P” एकूण खर्च | | |
| अखेरची शिल्लक | **3285.14** | **5.50** |

**आसिफ शेख :-**

मी अनुमोदन देत आहे.

**शशिकांत भोईर :-**

याच्यामध्ये माझी सुचना आहे.

**एस्.ए.खान :-**

ज्या ज्या लोकांची सुचना आहे. त्यांनी लेखी स्वरूपात सुचना दयाव्या. त्याचा समावेश करण्यात यावा. या ठरावाला मी अनुमोदन देत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, माझी सुचना आहे पान क्र. २८, क्र. ११ चे हेड आहे. प्रभाग कार्यालय इमारत बांधकाम. मागील वर्षी याला ५५ लाखाची तरतुद केली होती. यावर्षी दहा लाखाची तरतुद केलेली आहे. आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, प्रभाग कार्यालय क्र. ०२, खारीगांव येथे अपूर्ण इमारत आहे. ती पूर्ण करण्यासाठी आपल्याला निधीची आवश्यकता लागेल. तर या ठिकाणी आपण हेडमध्ये दहा लाख एवजी सत्तर लाख तरतुद करावी. कारण आम्ही ७० लाखचे एस्टीमेट तयार केलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, पान क्र. १४ वर स्थायी आस्थापने मध्ये राहिलेल्या चार महिन्यांसाठी ७ करोड ४६ लाख रूपये आहेत. तर सध्या स्थायी आस्थआपनेवर ७ करोड ४६ लाख रूपयांचा खर्च होवू शकणार नाही. आणि वॉर्ड साफसफाई, नालेसफाईमध्ये जवळ जवळ दोन महिन्यांची बिले दिलेली नाही. कारण पैसे नाहीत. तर त्यातील ३ करोड रूपये वॉर्ड साफसफाई, नालेसफाईला वर्ग करावे. आणि पुढील २१ करोड आहेत त्या ठिकाणी २२ करोड करावे. एक करोड वाढवून घ्यावे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, पान क्र. २८, कल्वर्ट बांधकाम व भुयारी मार्ग यावेळेला आपल्याला कल्वर्टचे काम पूर्ण करायचे आहे. आणि भुयारी मार्गाचे सुध्दा काम होईल असे मला वाटते. त्याच्यासाठी त्याच्यामध्ये चार करोडची तरतुद केलेली आहे ती सहा करोड करावी.

**शशिकांत भोईर :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब, पान क्र. १८, इसपर ५ नंबर मे रस्ते देखभाल दुरूस्ती ७ करोड है। ६ मध्ये रस्ते दुरूस्ती ९ करोड है। यह दोनो हेड एक किया जाए।

**मा. उपायुक्त (मु.) सो., :-**

पान नं. १६, पाच व सहा हेड एकत्र करावे. आणि प्रभाग कार्यालयासाठी जी १० लाखांची तरतुद आहे, ती ७० लाख करावी. साफसफाईसाठी सुधारीतमध्ये ३ कोटी नवीनमध्ये १ कोटी.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब, पान क्र. १८. त्याच्यामध्ये इंड्रस्ट्रीयल रस्ते दुरूस्तीमध्ये ९ कोटी २० लाख, एवढी त्या खर्चासाठी गरज आहे का?

**दिप्ती भट :-**

इंडस्ट्रीयल एरियामध्ये अर्ध्या-अर्ध्या फुटचा खड्डा आहे.

**प्रशांत पालांडे :-**

पण एवढे एका वर्षात खर्च होणार आहेत का? साहेब, माझी एक सुचना आहे. ते ९ कोटी २० लाख एका वर्षात खर्च करण्यापेक्षा नाट्यगृह आणि स्टेडिअमसाठी आपली अजिबात तरतुद नाही. त्या ठिकाणी थोडी थोडी करायला गरज आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

स्टॅंडींग कमिटीने त्याच्यावर विशेष चर्चा करून अविकसीत एरिया आहे. त्यांच्याकडून खूप टॅक्स येतात. ह्या हेडखाली ते वाढवले होते.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, एवढा खर्च एका वर्षात होणार नाही.

(सभागृहात गोंधळ )

**जुबेर इनामदार :-**

साहेब, चर्चा केली होती. एवढे पैसे ठेवायला सांगितले नव्हते. त्याची तरतुद कमी करा.

**मा. महापौर :-**

पाच करोड.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, पेज नं. २०, नं. ०५, शालेय क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, महापौर चषक मेरेथॉन स्पर्धा. २००६-०७ मे ६० हजार था। २००८-०९ मे २०,००० हो गया और अब ५,००० हो गया। क्यों? बच्चों के स्पर्धा को मिरा भाईंदर नगरपालिकामे कम किया जा रहा है क्या? मा. महापौर साहब, उसे पिछले साल जितना किया जाए।

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आपला जो प्रभाग समितीचा निधी असतो. त्याचे नक्की काय होते? म्हणजे त्याच्यामध्ये गेल्यावर्षी किती तरतुद होती? आणि यावर्षीपण केलेली असेल. जर प्रभाग समिती स्थापनच झाली नाही तर निधी आम्हाला नगरसेवकांना आमच्या निधीमध्ये सारखा वाढून दया.

**मा. उपमहापौर :-**

वाटून दिलेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

गेल्या वेळी कुठे झाला?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. प्रभात समिती फंड किती आहे?

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, यावर्षी जर प्रभाग समित्या स्थापन झाल्या नाहीत तर तो निधी सर्व नगरसेवकांना सारखा वाटून दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

प्रभाग समिती कन्स्टीट्युशनल आहे. ते ठेवावे लागतील कन्स्टीट्युट झाल्या नाहीत तर तो निधी मा. स्थायी समितीच्या, मा. महासभेच्या .....

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, तो नगरसेवकांना उपलब्ध करून दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

होईल.

**राजेश वेतोसकर :-**

मा. महापौर साहेब, पान नं. २८, अनुक्रमांक १२, मैदाने विकासासाठी गेल्यावर्षी ५० लाखाची तरतुद होती. यावेळेस ५० लाखाचीच तरतुद करा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही प्रभाग समितीच्या बाबतीत आदेश दया. जर झाले नाहीच तर सर्व नगरसेवकांना.....

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आदेश दया.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, प्रभाग समिती जर बनत नसेल आम्ही पत्र कधी दयायचे की, त्या पैशातून आमच्या वॉर्डमध्ये काम करा? कारण साहेब, असे वर्ष लोटेल. सगळे पैसे लॉस होतात. त्याचा काही फायदा होत नाही. आमच्या प्रभागामध्ये त्या पैशाचे काही काम तरी झाले पाहिजे की नाही? तर तसे आम्हाला सांगा की, प्रभाग समिती बनली नाही तर या महिन्यामध्ये तुम्ही पत्र दया. तसे रूलिंग दया.

**शरद पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, पान क्र. २० वाचनालयाची मी सुचना मांडली होती. ईस्टला वाचनालय व्हायला पाहिजे. म्हणून त्याच्यामधून तरतुद करून ठेवा.

**सलीम शेख :-**

पान क्र. ३०, नवीन शाळा इमारत बांधकाम....

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, जे महिला बालकल्याणचे ५८ लाख रूपये ठेवले आहेत. तर गेल्या वर्षी ३४ लाख रूपये होते. ते गेल्या वर्षीचे पैसे वापरले, लॅप्स झाले, काय झाले?

**सलीम शेख :-**

मा. महापौर साहेब, ५० च्या जागी ७५ करा. आमच्या वॉर्डमध्ये नवीन शाळा बनवायची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

समिती नव्हती.

**नयना म्हात्रे :-**

समिती नव्हती हे मला मान्य आहे. मग ते पैसे लॅप्स झाले की, कुठे वापरले? काय झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

वापरले नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

वापरले नाहीत, मग आपण मुलांना जे कम्प्युटरचे, ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देतो. ते कोणाला दिलेच नाही का? ते आपण महिला बालकल्याणच्या बजेटमधून देतो ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

मा. आयुक्तांच्या मान्यतेने जे प्रशिक्षण संस्थेला दिलेले आहेत. त्यांच्यावर तो खर्च झालेला आहे. पण समिती कामकाजातून खर्च झालेला नाही. मा. आयुक्तांच्या अधिकारात खर्च झालेला आहे.

**सलीम शेख :-**

श्री. खतगांवकर साहेब, पान क्र. ३० वर नवीन शाळेसाठी ५० लाखाची तरतुद केली आहे ते ७५ लाख करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, जी नवीन शाळा इमारत आहे. त्याच्यामध्ये बऱ्याच शाळा बांधायच्या राहिल्या आहेत. एक राईची शाळा आहे. एक माशाचा पाड्याची शाळा आहे. आणि आत्ता श्री. सलीम शेख यांनी सुचवली ती आणखीन एक शाळा. म्हणजे आपल्याला शाळा बांधायला १ कोटी लागणार आहेत.

**सलीम शेख :-**

एक करोड करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

सभागृह धोरणात्मक निर्णयाला यायला पाहिजे. इंडीविज्युअल सुचविले तर त्याचे ताळमेळच बसणार नाही. आणि उदया तुमच्या नोदी झाल्या नाहीत तर आमच्या अमुक नोंदी आल्या नाहीत असे होईल. यामध्ये धोरणात्मक निर्णय व्हायला पाहिजेत. सर्वच वैयक्तिक निर्णय अमलात येतील याची गॅरेन्टी आम्ही देऊ शकणार नाही. शेवटी सन्मा. सभागृह नेते साहेबांनी शिल्लक मांडलेली आहे. टोटल मांडलेली आहे. तर याची नोंद घेऊन आपण..

**सलीम शेख :-**

श्री. खतगांवकर साहेब. हे करा. आम्हाला याची गरज आहे.

**एस्.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, पेज नं. २७, उदयाने विकास २५ लाखात त्याच्यामध्ये काय होणार आहे? १ कोटी करा.

**उमा सपार :-**

मा. महापौर साहेब, पान क्र. २७ वर माझी गार्डनसाठी रिझर्व्हेशन जागा आहे. ते विकसीत करण्यात यावे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

पान नं. २५, संगणक विभाग, त्याच्यामध्ये संगणक प्रणाली नेटवर्किंग सुरू करणे. संगणक हार्डवेअर साहित्य खरेदी करणे, इतर आवश्यक कामे. आणि नगरसेवकांना लॅपटॉप देणे. आणि दिड करोड आहेत त्याचे दोन करोड करा.

**मर्लिन डिसा :-**

पेज २८, पॉईंट ७, नवीन गटारे.

**जुबेर इनामदार :-**

खरे तर आजच्या या अंदाजपत्रकावर चर्चा झाली पाहिजे होती. धोरणात्मक निर्णय पाहिजे होता. सन्मा. सभागृह नेते यांनी त्या विषयावर ठराव मांडला. कमीत कमी जे सुधारित अंदाजपत्रक आहे, त्याची प्रत प्रत्येक सदस्यांना पाठवावी अशी माझी सुचना आहे.

**मर्लिन डिसा :-**

मा. महापौर साहेब, पेज २८, पॉईन्ट ७, नवीन गटारे उसमे इस बार ॲटलीस्ट एमटीएनएल का गटर बना देना। फॉर्म २००६ इट इझ पेडिंग प्रोविझऩ ऑफ ३ करोड. २०० है, ३ और लगा दिजीए। एमटीएनएल गटर मस्ट बी कम्पीटेड उसे २०३ किजीए।

**मुसरर्त बानु :-**

पेज नं. १५, पॉईंट नं. ८, औषधे खरेदी, इस साल अपना म्युनिसीपल हॉस्पीटल की ओपनींग होगी तो यह एक करोड के बजाय देड करोड किया जाए।

**मिलन पाटील :-**

पान क्र. २९, मुद्दा क्र. ०६, स्टेडिअम, क्रिडांगण संकुलन, मैदाने आरक्षण. २५ आहेत तिकडे ३५ करा.

**उमा सपार :-**

मा. महापौर साहेब, माझ्या वॉर्ड क्र. ५२ मध्ये आरक्षित जागा १६७ सर्व्हे नं. ५४२, हिस्सा नं. २ तेथे गार्डन विकसीत करण्यांत यावे. पेज नं. २७.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

गार्डनमध्ये श्री. इनामदार साहेबांनी एक कोटीची सुझाव दिलेली आहे. त्याच्यामध्ये ॲडजस्ट करून घेऊ. उद्याने विकासमध्ये ऑलरेडी एक कोटी वाढवलेले आहेत. त्याच्यात ते येईल.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, रस्ते दुरूस्ती के बारे मे मेरी एक सुचना है। रस्ते दुरूस्ती के अंदर वार्षिक ठेका की निवीदा मंगायी जाए। उस सुचना को उसमे सामील किया जाए।

**प्रफुल्ल पाटील :-**

पेज नं. ७, शाळा इमारत भाडे, मागच्या वर्षी ५६२ लाख दाखवले होते. ते जवळ जवळ सहा कोटी. यावर्षी ते कमी राहणार, ४ कोटी? तुमचे भाडे वाढायला पाहिजे ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

एक कोटी मिळालेले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

दरवर्षी तुमचे रिकरिंग होते, त्याचे काय?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

आपली मागची बऱ्याच दिवसांची बाकी होती. त्याच्यामधील एक कोटी आलेल आहेत आणि बाकीचेपण तीन कोटी रूपये येतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक कोटी आले ते याच्यामध्ये लिहिले नाही.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

ते आत्ता आले. बजेट बनवल्यानंतर आले.

**प्रफुल्ल पाटील :-**

दरवर्षी रिपीट होते ते किती आहेत?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

जुनी बाकी होती ना?

**प्रफुल्ल पाटील :-**

दरवर्षी नवीन येते त्याचे काय?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

वार्षिक फक्त ४० लाख आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग तुम्ही चार कोटी कसे दाखवता.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

जवळपास पंधरा वीस वर्षांची बाकी होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

५६२ होते त्याच्यामध्ये १ कोटी आले. मग तुमचे ४६२ +४० लाखाची चालू मागणी झाली. पाच कोटी व्हायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

त्याच्यामध्ये ७२ ची दुरूस्ती करून घेऊ.

**विजया वैती :-**

पान नं. ३१, स्मशानभूमी. १० आहेत तिथे १५ करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

पान नं. ७, शाळा इमारत भाडे जे ४ कोटी आहेत. ४ कोटी ७२ लाख आपण अपेक्षित करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान नं. २१, शाळा, कॉलेज, संस्थांना शैक्षणिक अनुदान १ कोटी प्रोव्हीजन करा. पैसे तर काही देत नाहीत आणि तुमची मुले आम्ही घेतो. शिक्षण अधिकारी, तुम्ही काही सांगत नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

मिनीमम २५ लाख तर करायलाच पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही १ कोटी करा ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

काहीच केले नाही. तिकडे १ कोटी करा. पान क्र. २१ शाळा कॉलेज, संस्थांना शैक्षणिक अनुदान. २७-२१ मध्ये १ कोटी.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. २८, गोडदेव तलाव सुशोभीकरण, ॲडीशनल ७० टाका. कारण ऑलरेडी ६० लाखाचे तुम्ही मंजुर केले आहे. त्याच्यात ऑलरेडी २० आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

नऊ नंबरला, सार्वजनिक तळी, विहिरी सुशोभीकरण करणे.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याच्यात गोडदेव तलाव सुशोभीकरण, ७० टाका.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, पेज नं. २२ महापौर निधी. इस बार सहायता निधी कम क्यो की गयी है?

**प्रशांत पालांडे :-**

तो दहा केला आहे तो २५ ठेवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

१० च्या ठिकाणी २५ केले.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, जेएनएनयुआरएम अंतर्गत भुयारी गटार योजनेची निवीदा मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या मंजुर निविदांनुसार होणाऱ्या खर्चात वाढ तशी दुरूस्ती करावी अशी माझी सुचना आहे.

**विजया वैती :-**

मा. महापौर साहेब, पेज नं. २७, मार्केट बांधकाम. हटकेश उद्योगनगर मध्ये मार्केटसाठी प्रोव्हीजन आहे. तुम्ही त्याच्यात जास्तीचे प्रोव्हीजन करा. मी माझे पत्र दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

मार्केटसाठी बांधकामासाठी ५ लाखाची तरतुद आहे.

**विजया वैती :-**

२५ करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

पेज नं. २७, मार्केट बांधकाम. ५ च्या ऐवजी २५ करायचे.

**एस्.ए.खान :-**

पेज नं. २८, आयटम नं. १२, मैदाने विकास. १० च्या ठिकाणी ५० करायचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, माझी फक्त अशी सुचना आहे की, आपण आत्ता जे सुधारित अंदाजपत्रक करतो आहे. ते सुधारित पत्रक आपल्या प्रत्येक सदस्यांना पाठवावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

दिले जाईल.

**जुबेर इनामदार :-**

देत नाहीत. गेल्या वर्षी आम्हाला आलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

लेखा विभागाने नोंद घ्यावी.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आले नाहीत. ते गेल्या वेळेचे आम्हाला मिळालेलेच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

हे सुधारित आणि मंजुर अंदाजपत्रकांच्या प्रती सर्व सदस्यांना दयायच्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, पान क्र. २०, अनुक्रमांक ५, शालेय क्रिडा स्पर्धा वगैरे २० चे ५ केले आहेत ते पुन्हा २० करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

शालेय क्रिडा स्पर्धा, त्याला २५ केलेले आहेत.

**प्रकरण क्र. ९९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२००९ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १२०, ठराव क्र. १०९)

**ठराव क्र. ९४ :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. ९९, मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००८/२००९ चे सुधारित व सन २००९/२०१० च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरण पत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र. १०९ दि. ३/२/२००९ विचारात घेउन सविस्तर चर्चा करून मा. सदस्याचे सूचनेनुसार शासनाकडून मिळालेले रस्ता अनुदान, मे. रियालयन्स, महानगर गॅस, एमटीएनएल, रिलायन्स एनर्जी यांचेकडून रस्ता नुकसान भरपाई पोटी मिळालेली रक्कम रस्ते दुरूस्ती देखभाल यासाठी वाढीव खर्च या सूचनेसह व आवश्यक त्या दुरूस्तीसह सन २००८-०९ चे सुधारित व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. सुधारित व मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे .

**सन २००८-०९ चे सुधारित अंदाज व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक (आकडे लाखात)**

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+ “वृक्षप्राधिकरण”+ “महिला व बालकल्याण” + “JNNURM” + “P” एकूण जमा | 42381.89 | 52256.57 |
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+ “वृक्षप्राधिकरण”+ “महिला व बालकल्याण” + “JNNURM” + “P” एकूण खर्च | 39096.75 | 52251.07 |
| अखेरची शिल्लक | 3285.14 | 5.50 |

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००८/२००९ सुधारित व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ११० दि. ३/२/०९ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००८/२००९ चे सुधारीत व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1039.60 | 1326.00 |
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 105.00 | 225.00 |
| एकूण खर्च | 1144.60 | 1551.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर :-**

हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२००९ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १२१, ठराव क्र. ११०)

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००८/२००९ सुधारित व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ११० दि. ३/२/०९ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००८/२००९ चे सुधारीत व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1039.60 | 1326.00 |
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 105.00 | 225.00 |
| एकूण खर्च | 1144.60 | 1551.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, मी वृक्षप्राधिकरणाचा ठराव मांडतो. मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००८/२००९ सुधारित व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. ३/२/०९ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००८/०९ चे सुधारीत व सन २००९/१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 195.50 | 190.00 |
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तातंरण | 106.00 | 137.00 |
| एकूण खर्च | 300.50 | 326.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२००९ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. १११)

**ठराव क्र. ९६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००८/२००९ सुधारित व सन २००९/२०१० चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. ३/२/०९ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००८/०९ चे सुधारीत व सन २००९/१० चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| तपशिल | 2008/09 (सुधारित अंदाज) | 2009/10 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 195.50 | 190.00 |

| | | |
|---|---|---|
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 106.00 | 137.00 |
| एकूण खर्च | 300.50 | 326.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

अंदाजपत्रक मंजूरीच्या अनुषंगाने विषयपटलावर खालील तीन प्रस्ताव आलेले आहेत.

**प्रकरण क्र. :-**

रस्ते देखभाल व दुरुस्ती निवीदा मागविणेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणे.

**ठराव क्र. ९७ :-**

सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीमधून कामे करुन घेण्याकरीता वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. :-**

भुमिगत गटार योजनेच्या निवीदेबाबत.

**ठराव क्र. ९८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भुमिगत गटार योजनेच्या निविदेस मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२००९ ठराव क्र. ११६ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर मंजूर निविदा नुसार सदर योजनेस रु. ४९१,९८,५२,५०९/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर योजनेच्या सदर सुधारीत खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सदर योजनेकरीता घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या परत फेडीकरीता रु. ३,००,००,०००/- एवढी रक्कम दर महिन्यास ठेवण्यात यावी.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. :-**

पावसाळ्यापूर्वी नालेसफाई व खोदाई कामकरीता व आर.सी.सी. पाईप पुरवठा करुन टाकणे कामाकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.

**ठराव क्र. ९९ :-**

लोकसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार पावसाळ्यापूर्वी करावयाच्या नालेसफाई व खोदाई कामाकरीता तसेच आर.सी.सी. पाईप पुरवठा करुन टाकणे कामाकरीता दरवर्षाप्रमाणे निविदा मागवून पावसाळ्यापूर्वी कामे करुन घेण्यास व अपेक्षित रु. १.८० कोटी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब, पेज नं. ३९ बघा.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, हे जे नवीन गटार आहे. त्याच्यामध्ये आपण जे फ्लाय ओव्हर ब्रीज उतरतो. तिकडे एक गटार राहिलेले आहे बघा. त्याची प्रोव्हीजन करायला सांगा. ६० फुट रोडला आपण जे उतरतो तिकडे लेफ्ट साईडचे गटार अख्खे बाकी आहे. त्या गटाराची प्रोव्हीजन नवीन गटारामध्ये करायला सांगा.

**प्रशांत पालांडे :-**

अनुक्रमांक ७ बघा. मीटरची कार्यशाळा हा आपला हेड दरवेळी असतो. आणि गेल्यावेळी आपण दिड करोडची तरतुद केलेली पण ती कार्यशाळा सुरू होत नाही त्याचे कारण काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

यावर्षी त्याच्यासाठी १ कोटीची तरतुद आहे.

**प्रशांत पालांडे :-**

गेल्यावर्षी दिड कोटी असूनसुध्दा.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

कामच झाले नव्हते.

**प्रशांत पालांडे :-**

यावर्षी झाली पाहिजे असे बघा.

(सभागृहात गोंधळ)

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, नगरचना विभाग, बांधकाम परवानगी जोत्याचा दाखला, सुधारीप्लान मंजुर वापर परवाना इत्यादी परवानगी देत आहेत. परवानगी देताना विकास कर देखील वसुल करीत आहेत. महानगरपालिकेने मोकळ्या जागेवर कराची आकारणी केलेली आहे. मोकळ्या जागेवरील मालमत्ताधारक हे बांधकाम व्यावसायिक व बांधकाम करणारे आहेत. मोकळ्या जागेवरील कराची वसुली बांधकाम परिणामकारक होण्याच्या दृष्टीने बांधकाम परवानगी विषयक सर्व परवानग्या ह्या नगरचना विभागाशी संबंधित आहेत. मोकळ्या जागेवर कर आकारणी देखील इमारत बांधकाम विषयक असल्याने ही बाब नगररचना विभागाशी संबंधित असल्याने मोकळ्या जागेवरील कराची वसुली करण्याची जबाबदारी नगरचना विभागाकडे देण्यात यावी. जेणेकरून कराची वसुली केल्यानंतर नगरचना विभाग इतर परवानग्या देऊ शकेल. दुसरी, बाजार लिलाव घेतलेल्या ठेकदारांनी दुकानदारांवर जबरदस्ती व फेरिवाल्यांकडून नियमापेक्षा जास्त वसुली केल्यास त्यांच्या तक्रारीची नोंद घेऊन ठेकेदाराने जास्त वसुल केले हे सिध्द झाल्यास ठेकेदारांकडून दहापट वसुली करावी,. रस्ता खोदाई परवानगी दिल्यानंतर सदर रस्ते किती मीटर खोदाईसाठी दिले आहेत याची माहिती संबंधित नगरसेवकांना पत्राने कळविणे व सदर काम पूर्ण झाल्यावर ताबडतोब रस्ता बांधकाम करून पॅचवर्क करावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

तुमची जी पहिली सुचना आहे. त्यामध्ये आकारणी नगरचनाने करावी असे अपेक्षित आहे. पण वसुली कर निर्धारक व संकलक करेल.

**कल्पना म्हात्रे :-**

चौथी अनधिकृत बांधकाम सिध्द झालेले व सदर बांधकाम महानगरपालिके तर्फे जमिनदोस्त केल्यानंतर विकासकर्त्याकडून अनधिकृत बांधकाम तोडणे दंड वसुली न केल्यास सदरची रक्कम अधिकाऱ्यांच्या मानधनातून वसुल करावी अशी सुचना मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

ऑडीटर साहेब, पान क्र. ३१, नवीन स्ट्रीट नाईट २५ केले आहेत ते ५० करा.

**मा. उपमहापौर सो., :-**

आत्ता वाचलेले सर्व ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

पेज नं. ७, ७०० आहे. नालेसफाई १००० आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

नवीन रस्ते बांधकाम ७०० आहे. नाले साफसफाई २०० आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

ते वाढवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

७०० हे नवीन रस्ते बांधकाम आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नवीन रस्ते बांधकाम आहे त्यासाठी हजार करा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, स्ट्रीट लाईटची आत्ता काय आवश्यकता आहे. सगळ्या झोपडपट्टयांमध्ये लागतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

ते वाढवले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

झोपडपट्टयांमध्ये स्ट्रीटलाईटचे पोल लावून झालेले आहेत. आत्ता वाढवून कुठे लावणार आहेत?

**मिलन पाटील :-**

वाढवू नका. काही वाढवायची गरज नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

ठिक आहे. आहेत ते ठेवू.

**धुव्रकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, फक्त १५ लाख वाढवले आहेत. ५० लाख करा.

**मिलन पाटील :-**

स्टॅंडींगमध्ये होते तेव्हा का वाढवून घेतले नाहीत?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

झोपडपट्टयांमध्ये स्ट्रीट लाईट लावून झालेल्या आहेत. आत्ता लावणार कुठे ते सांगा.

**मिलन पाटील :-**

स्ट्रीट लाईट अजिबात वाढवू नका.

**सिसीलीया बावीघर :-**

तिकडे वाढवा. आमच्या उत्तनसारख्या भागात स्ट्रीट लाईटची गरज अहो. तिकडे ५० पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

सार्वजनिक स्ट्रीट लाईटवर सन्मा. सदस्य श्री. धुव्रकिशोर पाटील साहेबांनी ५० लाखांची वाढ सुचवली. श्री. मिलन पाटील साहेबांनी आक्षेप घेतलेला आहे. तर सर्वांनी ते फायनल करावे. श्री. मिलन पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे.

**सिसीलीया बावीघर :-**

५० पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

कमी केलेले आहे.

**सिसिलीया बावाघर :-**

ते वाढवा. तिकडे ५० पाहिजे.

**बर्नट डिमेलो :-**

साहेब, ५० करा.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, स्ट्रीट लाईटचे कमी करू नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

नवीन स्ट्रीट लाईटचा त्यांचा एक आक्षेप होता.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, ते ३५ करा.

(सभागृहात गोंधळ )

**शरद पाटील :-**

आत्ता खर्च वाढवायचे चाललेले आहे. पण बजेटमध्ये जमेमध्ये काही आहे की नाही? नाहीतर आमच्या कल्वर्टला दोन करोड सांगितले ते तिकडच्या तिकडे उडतील.

(सभागृहात गोंधळ)

**जयंत पाटील :-**

सर्व सदस्यांसाठी एक गोड बातमी आहे. आपल्याला सिमलाला जाण्यासाठी एक विषय आलेला आहे आणि तो विषय मी वाचून दाखवतो. ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांच्याकडून ७४ वी घटना दुरूस्ती, महापालिकेच्या कायद्यातील महत्वाच्या तरतुदी, पक्षांतर बंदी, सदस्यत्व, अपात्र संबंधी न्यायालय निवाडे व सभाशास्त्र या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम दि. २४ एप्रिल २००९ रोजी, स्थळ आहे. सिमला, थंड हवेचे ठिकाण, या ठिकाणी आपले मन रूचेल, रमेल, बरे वाटेल. म्हणजे आत्ता आपण अर्थसंकल्पावर चर्चा करून थकले आहात. अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्थेची स्थापना या प्रशिक्षण सत्रामध्ये कुठले विषय आहेत ते महत्वाचे आहेत. महापालिका कायदयातील महत्वाच्या तरतुदी पक्षांतर बंदी कायदा, म्हणजे आत्ता इकडे चालले आहे. इथून तिकडे, तिथून इथे, त्यासंबंधी आपल्याला कळेल. सदर सत्र अपात्र संबंधी न्यायालयीन निवाडे. सभेपुढील विषयपत्रिका, नगरसेवकांकडून आलेले प्रस्ताव विषयपत्रिकेवर आणण्याच्या तरतुदी सभेचे इतिवृत्तांत व गणसंख्या आणि सभेच्या वेळी अध्यक्षांचे अधिकार आणि नगरसेवकांचे अधिकार हा खूप मोठा विषय आपल्या दृष्टीने आहे. हे सगळे अधिकार आपल्याला कसे मिळतील. यासाठी सुचना, उपसुचना व दुरूस्ती सुचना मांडण्याची पध्दती काय आहे. हे सर्व माहितीसाठी आपल्याला सिमलाला जायचे आहेत तारीख आहे २३ एप्रिल २००९ ते २४ एप्रिल २००९. हे दोन दिवस आहेत. पुढची संपूर्ण माहिती आपल्याला सचिव साहेब नंतर देतीलच. प्रश्न एकच निर्माण होईल की, जर या कालावधीमध्ये निवडणुक लागली. तर हा कार्यक्रम पुढे ढकलण्याची शक्यता आहे.

**मा. उपमहापौर :-**

स्पेशल घेता येईल. शोकप्रस्ताव घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी एक महत्वाचा विषय आहे की, काही दिवसांपूर्वी महानगरपालिकेच्या तलावामध्ये काही समाजकंटकांनी जवळ जवळ ४० ते ५० फुट रूंद, ५० फुट लांबीची भरणी करून या ठिकाणी एखादे मंदिर किंवा एखाद्या धर्माचे धार्मिक स्थान आहे असे भासवून अनधिकृत बांधकाम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला म्हणजे बांधकामसुध्दा केले. पोलिसांनी आणि नगरपालिकेने एक संयुक्त कार्यवाही केली, फार मोठी कार्यवाही केली. आणि ते बांधकाम पाडून टाकले. ते बांधकाम पाडल्यानंतर त्याच्या आजूबाजुला जेवढ्या इलिगल टपऱ्या होत्या, एस्.एन्. कॉलेजच्या समोरच्या, त्या काढण्याच्या संदर्भातसुध्दा नगरसेवकांच्या तक्रारी होत्या. त्यानुसार त्या काढण्यात आल्या. त्या काढण्यात आल्यानंतर ज्या समाजकंटांनी त्या ठिकाणी धार्मिक स्थळ आहे असे दाखविण्याचा प्रयत्न करून जे अनधिकृत बांधकाम केले होते ते पाडल्यानंतर चिडून जाऊन तिथे उभ्या असणाऱ्या गोरगरीबांच्या रिक्शा आणि टेंम्पो, म्हणजे त्यांचे फार नुकसान केले. तर त्या सगळ्या रिक्शा आणि टेंम्पो असोसिएशनच्या संघटनेच्या सदस्यांना तत्कालीन मा. आयुक्तांनी आणि मा. महापौरांनी असे आश्वासन दिले की, त्यांना आपण महापौर निधीतून नुकसान भरपाई देऊ. तर ५०० ते १००० च्या दरम्यानच त्यांचे, ते म्हणतात की, आम्हाला जास्त नको आमची मेन पुढची काच फुटलेली आहे, हेडलाईट फुटलेली आहे. तर ५०० ते १००० च्या दरम्यान नुकसान झालेले आहे. तत्वतः असे मान्य केले गेले की, ज्या रिक्शांचे नुकसान झाले आहे त्यांनी एफआयआर दर्ज केला पाहिजे. म्हणजे एफआयआर असेल तर ठिक आहे. नाहीतर बाकीचे रिक्शावाले सुध्दा सांगतील की, आमचे नुकसान झालेले आहे. तर त्या रिक्शावाल्यांना आजच्या प्रसंगी आपण मा. महापौर निधीतून मदत जाहीर करावी. अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा. उपमहापौर :-**

ठिक आहे. ते करून घ्या.

**जयंत पाटील :-**

हे व्हायला पाहिजे. महापालिकेने अतिक्रमण काढले. त्याचा संपूर्ण राग त्या गुंडांनी त्या रिक्शांवर काढला. काही कारण नसताना आणि गोरगरिब रिक्शावाले आहेत.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, महापौर फंडातून पैसे दया.

**मा. उपमहापौर :-**

ते मंजूर केले.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, महापौर निधीशी संबंधीत श्री. पाटील साहेबांनी खूप चांगली सुचना मांडली.

**मा. उपमहापौर :-**

एफआयआर दाखल असलेल्या सर्व रिक्शावाल्यांना ५०० ते १००० रूपये देण्यात यावे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, तुम्हाला माझी एक विनंती आहे. आत्ता शाळेतील लहान मुलांना कपडे दयायचे आहेत. तर प्रत्येत शाळेमध्ये जावून माप घ्या. त्याच्या नंतरच कपडे दया. कारण असेच कपडे देतात. एखादा मुलगा माझ्यासारखा उंच असतो. एखादा बुटका असतो. तसे व्हायला नको.

**प्रभात पाटील :-**

महापौर निधीशी संबंधीत माझी सुचना आहे. आपण महापौर निधीतून सहाय्य जाहीर केले. पण आपल्या माहितीसाठी सांगते. जरा श्री. खतगांवकर साहेबांनीपण इकडे लक्ष दयावे.

**श्री. सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

पहिली ते सातवीची जी मुले आहेत. तर पहिली ते सातवीची मुले आपल्याकडे असतात. एक ते चार या कॅटेगरी सॅम्पल चेकींग करून त्याप्रमाणे ड्रेस शिवले जातात. प्रत्येक मुलांचे माप घेऊन ड्रेस शिवले जात नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

किती ड्रेस देणार?

**श्री. सोनार :-**

त्यांना दोन ड्रेस देणार.

**नयना म्हात्रे :-**

त्यांना बुट वगैरे दया. आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये जी मुले येतात त्यांना बुट वगैरे दया. त्याना बुट वगैरे का देत नाही? प्रायव्हेट शाळेला नियम केले आहेत की, बुट दया. तर आपणपण त्यांना बुट देऊ.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, महापौर निधीचा विषय यांनी काढला म्हणून बोलते की, आपल्याकडे महापौर सहायता निधी आहे. श्री. खतगांवकर साहेब, आपण ऐका. किती फाईल पडून आहेत. ज्यांना आपण आरोग्यासाठी देतो. म्हणजे डेंग्युसारखे रोग आहेत. त्याच्यासाठीच्या फाईलसुध्दा आपल्याकडे पेन्डींग आहेत. त्या निकाली काढा. आपण नव्याने देण्याचे प्रस्ताव करतो. पण मागच्या फाईल पडून आहेत. सद्या होत नाहीत. माझ्या माहितीनुसार चेक तयार आहेत.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, २५ लाख आहेत तिकडे ३० करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

२५ लाखाची तरतुद आहे. त्याच्यामध्ये फक्त ड्रेसेस होऊ शकतात असे त्यांनी सांगितले. बुट होऊ शकत नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

म्हणूनच ३० करा.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, यावर्षीचे गणवेश त्यांनी वाटले आहेत का?

**नयना म्हात्रे :-**

पैसे लॅप्स झाले असतील ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

ते जूनमध्ये वाटणार आहेत म्हणजे येणाऱ्या आर्थिक वर्षासाठी ते झाले.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मग त्याच्यामध्ये पैसे वाढवा.

**मर्लिन डिसा :-**

प्रत्येक विद्यार्थी का माप कैसे नही ले सकते? जिसको आपने ऑर्डर दिया है। वह खुद स्कुल मे जाकर माप लेगा। जो स्टुडन्ट है उनका माप लेना जरूरी है।

**नयना म्हात्रे :-**

साहेब, २५ आहेत तिकडे ४० करा. म्हणजे मुलांना बुट देऊ शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

मुख्य लेखापरिक्षक, २५ लाखाच्या ठिकाणी ४० करून बुट दया म्हणतात.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, या सभागृहाचे सदस्य राहिलेले आणि मिरा भाईंदर पूर्वेचे नवघर ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचांपासून नगरसेवक पर्यंत राहिलेले आणि सर्वांचे लाडके, अतिशय लाडके भोळे व्यक्तीमत्व, हुशार आणि ज्यांनी तलावातील म्हणजे आपले फायरब्रिगेड त्यावेळी अस्तित्वात नव्हते, त्यावेळेस तलावातील डेड बॉडी काढणारे आपले एक सदस्य, सर्वांचे अतिशय लाडके, या शहरातील लाडके, श्री. केसरीनाथ जगन्नाथ पाटील उर्फ बादशहा, वय वर्षे ७० च्या आसपास. यांचे आपले मा. महासभा पर्वाची जी अर्थसंकल्पाची २१ तारीख होती. २१/०२/२००९ रोजी त्यांचे दुखद निधन झाले. खरे म्हणजे त्या दिवशी जर मा. महासभा नसती तर संपूर्ण सदस्य प्रेतयात्रेला येऊ शकले असते. आपल्या सर्वांतर्फे आपण त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली वाहावी असा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

अनुमोदन आहे.

**चंद्रकांत वैती :-**

घोडबंदर येथील सोनाबाई मुकूंद वैती यांचे ही आज निधन झालेले आहे. त्यांचाही मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**दु:खवटा ठराव क्र. १०० :-**

नवघर गावचे, तसेच या सभागृहाचे सदस्य राहिलेले कै. केसरीनाथ जगन्नाथ पाटील ऊर्फ बादशाह यांचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे तसेच घोडबंदर येथील सोनाबाई मुकूंद वैती यांचेही आज निधन झालेले आहे. त्यांचाही मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी जागेवर दोन मिनिटे उभे राहून मृतात्यांना श्रध्दांजली वाहायची आहे.

**मा. उपमहापौर :-**

सर्व सदस्यांनी बजेटसाठी केलेल्या सुचना, जमा बाजू विचारात घेऊन अंमलात आणल्या जातील. सर्वांसाठी मंजूर करून कायम करण्यात येत आहे. तसेच आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ४.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**